# महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद, नाशिक

## प्रथम आहवाल १९२०

294



देहे कष्टवीती । उपकारें ॥

294
MAH
879

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00989


श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य मठ करवीर, संकेश्वर

# महाराष्ट्रीय हिंदुधर्म–परिषदेचे कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रा. ब. | गणेश रामकृष्ण दातार | अध्यक्ष |
| २ | श्री. | वासुदेव बापूजी अकूत | उपाध्यक्ष |
| ३ | ,, | विश्वनाथ गंगाधर केतकर | उपाध्यक्ष |
| ४ | ,, | पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन | खजिनदार |
| ५ | ,, | एकनाथ धोंडदेव जामखेडकर | चिटणीस |
| ६ | ,, | गंगाधर विश्वनाथ गोखले | चिटणीस |
| ७ | ,, | भाऊसाहेब ओक वकील | |
| ८ | ,, | विष्णु रावजी रहाळकर | |
| ९ | ,, | भाऊसाहेब सुकेणकर | |
| १० | ,, | रघुनाथ हरि गद्रे | |
| ११ | ,, | रामचंद्र गणेश प्रधान | |
| १२ | ,, | भागाप्पा विठोबाप्पा गुळवे | |
| १३ | वे.शा.सं. | हरिशास्त्री गर्गे | |
| १४ | ,, | सीतारामशास्त्री महाशब्दे | |
| १५ | श्री. | विठ्ठल पांडुरंग उपाध्ये | |
| १६ | ,, | नीळकंठ पांडुरंग पाटणकर | |
| १७ | शेट | मोतीलाल माणेकचंद | |
| १८ | ,, | जमनालाल बजराज | |

294

शि. प्र. मंडळी
879



परिषदेचे अध्यक्ष व स्व

के. म
३२९
२९४/
ग्रोथांक
किंमत 23/11/92

# प्रस्तावना.

महाराष्ट्रीय धर्म परिषदेनें केलेलें कार्य प्रस्तुत आहवालाच्या रूपानें जनते-
मांडलें आहे. परिषदेचा हेतू सफल करण्याकडे महाराष्ट्र जनतेचा विचार-
वळण्यावरच कार्याची यशस्विता अवलंबून राहणार !

थंत कार्यमग्न असताहि श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं उपोद्घात
ा याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावें ! श्री. शंकरराव
ी यांनीं व त्यांच्या चित्रशाळेतील मंडळींनी अगदीं घरच्याप्रमाणें, मोठ्या
छापण्याचें काम करून दिलें, याबद्दल आम्हीं त्यांचेहि ऋणी आहोंत.

पुणें ता. २२।१५।२०.

रा. गो. भिडे.
गं. वि. गोखले.
चिटणीस—म. धर्मपरिषद्.

प्रकाशक—रा. रा. गंगाधर विश्वनाथ गोखले,
३२० शनवार पेठ, पुणें.
मुद्रक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

879

# महाराष्ट्रीय हिंदु-धर्म परिषद कार्यालय

पुणें ता. १६ ।३।१९२१

रु. सा. न. वि. वि.

या पत्रासोबत अलाहिदा बुकपोस्टानें, गेल्या सप्टेंबर महिन्यांत नाशिक येथें झालेल्या महाराष्ट्रीय हिंदु-धर्मपरिषदेचा प्रथम आहवाल पाठविला आहे. अलीकडे हिंदु-धर्मावर भिन्नमतानुयायी लोकांकडून होत असलेले हल्ले, हिंदु समाजांतील अस्पृश्य वर्गाचा प्रश्न, पतितपरावर्तन, जगद्गुरूंच्या पीठाची समाजाविषयीं कर्तव्यें विशेषतः ब्राह्मण अब्राह्मण यासंबंधीं उत्पन्न झालेला तीव्र वाद वगैरे प्रश्नासंबंधीं काहींतरी निश्चित धोरण ठरवून हिंदुधर्माला योग्य व सुसंघटित स्वरूप कोणत्या रीतीनें देतां येईल याचा विचार करण्याकरितां परिषदेचा उपक्रम करण्यांत आला, ही गोष्ट आपणांस ज्ञात आहेच. परिषदेपुढें भिन्न भिन्न मतांच्या लोकांकडून सूचना आल्या त्यांचाहि समावेश आहवालांत केलाच आहे, हे आपल्या अवलोकनांत येईलच. आतां विनंति येवढीच कीं परिषदेच्या कार्याची पूर्तता होण्यासाठीं, उपरिनिर्दिष्ट केलेल्या प्रश्नासंबंधीं आपण आपला स्पष्ट अभिप्राय कळविल्यास परिषदेनें आरंभिलेलें कार्य सुलभ रीतीनें पार पडेल. व येत्या परिषदेपुढें या प्रश्नासंबंधीं काहींतरी निश्चित योजना मांडतां येईल. तरी कार्याचें महत्त्व व उपयुक्तता लक्षांत घेऊन आपला अभिप्राय वरील पत्यावर शक्य तितक्या लौकर कळविल्यास आम्ही आपले अत्यंत आभारी होऊं. तसदी बद्दल माफी असावी. कळावे कृपा लोभ असावा ही विनंति.

आपले.

**गंगाधर विश्वनाथ गोखले**
**रामकृष्ण गोपाळ भिडे**
कार्यदर्शी, महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद

# उपोद्घात.

जगांतील सर्व धर्मांचीं मूळभूत तत्त्वें त्रिकालाबाधित व सर्वमान्य अशींच आहेत. व हीं तत्त्वें प्रत्यक्ष आचरणांत आणण्याकरितां कांहीं विधायक योजना व प्रतिबंधक निर्बंध प्रत्येक धर्मांत घातलेले असतात व याच योजना व निर्बंधामुळें प्रत्येक धर्मास त्याचें विशिष्टत्व प्राप्त झालेलें असतें. आपल्या सनातन वैदिक अगर प्रचलित रूढ भाषेंत बोलावयाचें म्हणजे आपल्या हिंदु धर्माचीहि उभारणी अत्यंत पवित्र, उदात्त, व ईश्वरी तत्त्वांवर केलेली आहे व हीं तत्त्वें योग्य व व्यवस्थित रीतीनें आचारांत आणली जावी म्हणून विशिष्ट योजना व निर्बंध घालण्यांत आले. पूर्वकालीन वेदवेत्या ऋषींनीं व धर्माचार्यांनीं वरील योजना व निर्बंध यामध्यें कालस्थलाप्रमाणें योग्य ते फेरफार केले. व ते तसे करावयास पाहिजे याबद्दलहि मतैक्य आहे.

बुद्धाच्या कालानंतर श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं वरील प्रघाताप्रमाणेंच पुनः एकवार आपल्या सनातन वैदिक धर्माच्या आचारविचारपद्धतीची संचालना करून आपल्या धर्माची तत्कालीन विसकटलेली घडी पुनःएकवार बसविली व चारी दिशांना नवीन धर्मपीठें स्थापन करून

‘ वर्णाश्रमसदाचारा अस्माभिर्ये प्रसाधिताः ।
रक्षणीयास्त एवैते स्वे स्वे भागे यथाविधि ॥ ”

या शब्दांनी वर्णाश्रम व सदाचार यांचें संरक्षण करण्याची आज्ञा पीठांना दिली. व यथाशक्ती व यथाबुद्धी कमीज्यास्ती प्रमाणानें तीं कामें पीठाकडून केलीं गेलीं.

आपल्या भरतखंडांत इंग्रजशाही सुरू झाल्यानंतर साहाजिकपणेंच धर्माचार्यांच्या मागचा राजसत्तेचा पाठिंबा नाहींसा झाला. त्याबरोबरच पाश्चिमात्य संस्कृतीचे राजसत्तेच्या तेजांत उज्वल दिसणारें स्वरूप नवीन शिक्षण पद्धतीनें एतद्देशीय लोकांच्या डोळयांत अधिक भरूं लागले. राजकीय पारतंत्र्याबरोबर राष्ट्रीय सद्गुणांचा, पराक्रमाचा व बुद्धिवैभवाचा लोप होऊन वैयक्तिक, सामाजिक व धार्मिक बेबंदशाही सुरू झाली, श्रद्धा कमी झाली; अधिकारबंधनेंहि नाहींशी होऊन सर्वच बाबतींत राष्ट्र परप्रत्ययेन बनलें. व हीच दुरवस्था कमी अधिक प्रमाणानें या नाहीं त्या तत्त्वाच्या पांघरुणाखालीं अद्याप कायम आहे.

अशा परिस्थितींत योग्य मार्ग काढून पुनः एकवार समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था शंकराचार्यांच्याच धर्मपीठानीं लावावी अशी जनतेची इच्छा असणें साहजीकच आहे. हा अधिकार राजांचा असून शंकराचार्यांचा नाहीं असा एक आक्षेप काढण्यांत येतो, पण हा आक्षेप युक्तिसिद्ध नाहीं. प्रथम राजसत्ता ही कार्यकारी असते. वैराग्य व निस्पृहता यांचें अधिष्ठान राजसत्तेंत असतेंच असें नाहीं. त्यांतून प्रस्तुतच्या इंग्रजशाहींत तर स्वधर्मीय राजसत्ता स्वतंत्र अशी अस्तित्वांतच नाहीं. अर्थात हा अधिकार थोडाबहुत जर कोठें केंद्रीभूत होत असेल तर तो शंकराचार्यांच्या पीठांतच होतो हें स्पष्ट आहे.

त्याबरोबरच एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हें विसावें शतक लोकसत्तेचें, सामुदायिक अधिकाराचें आहे. व म्हणूनच प्रस्तुतच्या काळीं वैयक्तिक राजसत्ता वा धर्मसत्ता टिकणें शक्य नाहीं. हाच विचाराचा ओघ लक्षांत घेऊन आचार्य पीठाकडून धर्मोन्नतिसाठीं काय उपाय योजावे तसेंच निरनिराळ्या समाजाच्या अंगामध्यें सलोखा कसा राहील याचा विचार व्हावा व मार्ग निश्चित व्हावा या उद्देशानें श्रीमत् शंकराचार्यांनीं विद्वान, व्युत्पन्न, कर्तव्यनिष्ठ, तज्ज्ञ, समाजहितेच्छु, अशा सर्व लोकांची परिषद नाशिक येथें भरविण्याचा उपक्रम केला हें एक मोठें धर्मकार्य केलें असें म्हणणें प्राप्त आहे.

प्रस्तुतचा उपक्रम कितपत यशस्वी झाला हें परिषदेच्या पुढील अहवालावरून कळेलच पण एक गोष्ट खरी कीं, जे उद्देश श्रींनीं डोळ्यांपुढें ठेवले आहेत ते सिद्धीस जाण्यास अशा परिषदा हाच एक उपाय आहे. सदरहू तऱ्हेच्या परिषदा जितक्या अधिक भरतील तितक्या त्या कार्यक्षम खास होतील, व हल्लींचे गुंतागुंतीचे प्रश्न याच मार्गानें सोडविले जातील असा भरंवसा वाटतो.

पुढील अहवाल याच दृष्टीनें वाचला जावा अशी सर्वांची विनंति करून श्रीमत् शंकराचार्यांनीं, सदरहु परिषद भरवून योग्य उपक्रम केला, याबद्दल त्यांचें आभार मानून हा लहानसा उपोद्घात संपवितो.

पुणें शहर मार्गशीर्ष शु० १० शके १८४२. } ज. स. करंदीकर.

---

म।२८७८



परिषद् चालू असतांना घेतलेला फोटो.

# महाराष्ट्रीय हिंदुधर्म-परिषद्

## श्रीक्षेत्र नाशिक

## ता. १०-९-१९२०.

## दिवस पहिला

हल्लीं धर्मोन्नतिसाठीं व समाजोन्नतिसाठीं श्रीशंकराचार्यांच्या पीठानीं काय काम केलें पाहिजे, अशी जनतेची अपेक्षा आहे व अलीकडे हिंदुसमाजांतील निरनिराळ्या जातींत वाद उत्पन्न होऊन समाजावर जे अनिष्ट परिणाम होत आहेत ते दूर करून जातीजातींत प्रेम व सलोखा राहण्यासाठीं काय उपाय योजना करावी या संबंधीं महाराष्ट्रांतील भिन्न भिन्न जातींच्या विद्वान पुढाऱ्याशीं विचारविनिमय करून कांहीं तरी निश्चित धोरण ठरविण्याच्या उद्देशानें धर्मपरिषद भरविण्याचा श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांचा फार दिवसांचा मानस होता, त्याप्रमाणें महाराष्ट्रीय हिंदु धर्म परिषदेचें अधिवेशन ता. १० सप्टेंबर १९२० रोजीं श्रीक्षेत्र नाशिक येथें विजयानंद नाटकगृहांत भरलें होतें. सभेच्या कार्यक्रमास सकाळीं ८ वाजतां सुरवात झाली. सभागृह सुंदर ध्वजापताकांनीं सुशोभित केलें असून ठिकठिकाणीं धर्मपर व ऐक्यपर वचनें लटकावलीं होतीं. परिषदेसाठीं महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत, कर्नाटक, मध्यहिंदुस्थान वगैरे दूरदूरच्या ठिकाणांहून निरनिराळ्या संस्थांचे प्रतिनिधि आले होते. निमंत्रित पाहुणे, स्वागतमंडळाचे सभासद व आश्रयदाते यांची बसण्याची व्यवस्था खास उच्चासनावर केली असून स्त्री प्रतिनिधींची सोयहि तेथेंच स्वतंत्रपणें करण्यांत आली होती. परिषदेच्या एकंदर कामाची व्यवस्था बालचमू व भारत मित्रमंडळाचे स्वयंसेवकांनीं उत्कृष्टपणें ठेवली होती. परिषदेचे नियोजित अध्यक्ष श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांची स्वारी बरोबर आठ वाजतां सभागृहांत येऊन दाखल होतांच त्यांना सभासद व प्रेक्षकांनीं एकदम उत्थापन

देऊन श्रींचा प्रचंड जयजयकार केला. उच्चासनावर श्रीमंत सरकार जव्हारकर, श्रीप्रतापशेट अमळनेर, श्रीवल्लभदास, येवले; रा. माधवराव बोडस, मुंबई; डॉ. केतकर, पुणें; वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे, प्राज्ञ पाठशाळा वांई; नारायणराव गुंजाळ, पुणें, रा. ब. भास्करराव जाधव, कोल्हापूर; धोंडशास्त्री ब्रह्मनाळकर; दयानाथ नारायणदास, मुंबई; जगन्नाथराव ढवण, वैश्य ज्ञाति समाज मुंबई; श्री. सीतारामशास्त्री, हरिहरतीर्थ स्वामी नाशिक; श्री. माटे, पुणें; अण्णाशास्त्री नगरकर, संध्यामंदिर इंदूर; रा. पाटणकर अकूत, गद्रे, उपाध्ये वगैरे वकील मंडळी व गांवांतील शेटसावकार, श्री. कु. दुर्गाबाई नेने, कुमारी दुर्गाबाई खर्डीकर, श्रीमती जन्नाबाई वगैरे स्त्रीपुरुष विराजमान झालें होते.

प्रथमारंभीं नाशिकचे सुप्रसिद्ध कवि गोविंद यांनीं परिषदेकरितां मुद्दाम तयार केलेलें खालील पद्य रा. महाबळ व खुशालसिंग यांनीं म्हणून दाखविलें.

---

( चाल—सब दुनियेका पालनवाला. )

**प्रारंभींचे प्रणाम पूजन** ज्यावे त्यांला निवेदन ।
तदीय दर्शन अतीव दुर्लभ परी सुलभ तद्‌याधन ॥ ध्रु० ॥
धर्मसभेचें त्यास निमंत्रण धर्म प्रयोजन तो जाणें ।
प्रसन्न व्हावें येथें यावें स्वयं-प्रसन्नानें त्यानें ॥ १ ॥
सुमंगलांनीं महद्यशांनी ईशाशीर्वादांनीं या ।
स्वधर्म-चंद्रावरी शुभाचें तारामंडळ अंबर व्हा ॥ २ ॥
विश्वराउळीं प्रेमघनांनीं अभिषेकाचें पात्र बना ।
**धर्म-शिवावर** पावित्र्याचें श्रद्धेचे अभिषेक करा ॥ ३ ॥
या हास्यांनी या लास्यांनीं करा मौज या काव्यांनीं ।
तानांचे कारंजें उडवा उत्सवांत या गानांनीं ॥ ४ ॥
**धर्म**-सभेला मूळ मनांच्या मनोतरंगांनीं यावें ।
धर्मोन्नतिच्या विकासावरी प्रकाश सांप्रत पाडावे ॥ ५ ॥
ज्ञानाच्या नौबदी वाजवा कर्ण फुंका त्यागाचे ।
**भो वेदांनीं उपनिषदांनीं** वाजंत्री तुम्हि देवाचे ॥ ६ ॥

श्रोता-देशीं विवेक उधळी समय पातला भाग्याचा ।
सद्भक्ताच्या सभा मंडपीं उत्सव होतो धर्माचा ॥ ७ ॥
श्रीमद्रामायणा भारता अखंड स्वागत तें तुमचें :
तुम्ही आरसे आर्य-मनांच्या धर्माच्या प्रतिबिंबाचे ॥ ८ ॥
धन्य धन्य तुम्हि ऋषी. जनांनों धर्म सूर्य तुम्हि वाढविला ।
त्या सूर्यावर बसवुनि जनगण परम पदाला पाठविला ॥ ९ ॥
श्रीरामाच्या वत्सल बाणा श्रीकृष्णाच्या सुदर्शना ।
भवानि-खड्गा धांव रक्षणा धर्म होय केविलवाणा ॥ १० ॥
स्थिर सिंहासन केलें ज्यानें धर्माच्या साम्राज्याचें ।
अभिनंदन त्या जगद्गुरूचें आद्यशंकराचार्यांचें ॥ ११ ॥
मिरवित दिंडी ये भक्तीची पंढरिच्या पांडुरंगा ।
भूतदयेचा मूर्त कळवळा स्वागत तव गौतमबुद्धा ॥ १२ ॥
गुरु गोविंदा रामदास या धर्म धीर तुम्हि साचार ।
स्वसंरक्षणा दिधली आपण धर्माच्या करिं तरवार ॥ १३ ॥
वीरश्रीची जिवंत दीप्ती धर्माची अन्तःस्फूर्ती ।
शत तोफांची सलामि झुडुं या आले श्रीमान छत्रपती ॥ १४ ॥
प्रचंड चळवळ होमरूलची उदंड खळबळ यत्नाची ।
बोला जयजयकार बंधुहो स्वारी आली टिळकांची ॥ १५ ॥
प्रथित शीख रजपूत मराठे धर्मशूर तुम्हि महशूर ॥
सेनासागर हेलावित या स्वागत तुमचें निरंतर ॥ १६ ॥
उत्पादक या संस्थापक या, या संरक्षक धर्माचे ॥
सुधारकासह उद्धारक या सादर स्वागत सकलांचे ॥ १७ ॥
स्वागत तुमचें चहुं वर्णांच्या सभासदांनों आर्यांनों ।
धर्मरूप तुम्हि देवरूप तुम्हि विनंति ऐका ज्ञात्यानों ॥ १८ ॥
मनोवृत्तिची खळबळ उठणें, उठणें म्हणजे बहुंखद ।
मनोवृत्तिचा निग्रह होणें, होणें म्हणजे आनंद ॥ १९ ॥
मनोवृत्तिचा प्रसार झाला, झाला म्हणजे जीवात्मा ।
मनोवृत्तिची समता बनली, बनली म्हणजे परमात्मा ॥ २० ॥

निग्रह समता ज्ञान ध्यान नव प्रेम समाधी वैराग्य ।
ऐक्य निदर्शक प्रसार ध्वंसक साम्यार्थार्थी हे शब्द ।। २१ ।।
म्हणून समजा विचार युक्तया समता कारक जें कर्म ।
त्या कर्माला त्या मार्गाला म्हणती ज्ञानी जनधर्म ।। २२ ।।
समता धर्मच श्रीवेदांचा उपनिषदांचा सूत्रांचा ।
समता धर्मच श्रीगीतेचा योगांचा स्मृति शास्त्रांचा ।। २३ ।।
समता धर्मच श्रीरामाचा योगेश्वर श्रीकृष्णाचा ।
समता धर्मच छत्रपतीचा आचार्यांचा टिळकांचा ।। २४ ।।
या धर्मानें प्रेम वाढतें प्रेमानें साधें ऐक्य ।
अशक्य ऐक्या असें काय मग ? सिद्ध कार्य तें प्रत्यक्ष ।। २५ ।।
हा ऐक्याचा गणेश झाला प्रसन्न जेव्हां शिवबाला ।
चमत्कार तधिं काय उडाला ठावा आहे सकलांला ।। २६ ।।
गुलामगिरीचा न्हास हवा ना ? शरण रिघा मग समतेला ।
स्वातंत्र्याचा स्वर्ग हवा ना ? शिरीं धरा मग समतेला ।। २७ ।।
भगवंताचा शोध हवा का ? चित्तार्पो मग समतेला ।
आनंदाचा कंद हवा का ? जीव वहा मग समतेला ।। २८ ।।
तदा प्रार्थना धर्म बंधुनो वंदावा शिरीं हा धर्म ।
या धर्माच्या हृदीं जन्मते इहपरलोकींचें शर्म ।। २९ ।।
जगदंबेचा श्रीसमतेचा करा चला जयजयकार ।।
कलहजन्य त्या मूर्ख रूढींचा अतां पुरे हो सत्कार ।। ३० ।।
मूर्ख रूढीनें लिलाव करुनी अमुच्या राष्ट्रिय प्रेमाचा ।।
विकत घेतला गुलामगिरिचा मूर्खपणा बेअब्रुचा ।। ३१ ।।
मनुष्य निमित्त भेद नसावा मानव बंधू-बंधूंत ।
निदान त्यांनीं जनांत येतां त्यागावा तो धर्मार्थ ।। ३२ ।।
हिंदु बंधुनो शांति देविला स्नेहालंकारें नटवा ।
मनोरथावर आपल्या मिरवा स्वात्मपदावर मग बसवा ।। ३३ ।।
विचार सुंदर न्याय मनोहर समता सूत्रीं गुंफून ।
सर्व मनांची मंगल माला करा प्रभुला समर्पण ।। ३४ ।।

---

नंतर स्वागत मंडळाचे अध्यक्ष रा. ब. गणेश रामकृष्ण दातार यांनीं आपल्या स्वागतपर भाषणास सुरवात केली, ते म्हणाले.

ॐ श्री कालात्मने नमः ।

ॐ श्री गुरुभ्यो नमः ।

## स्वागत

अध्यक्ष श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य लोकविख्यात डॉ. कुर्तकोटी, या क्षेत्रस्थ व परस्थ धर्मबंधुभगिनींनों, ज्या कालचक्राच्या प्रभावानें व गुरुंच्या कृपेनें आपल्या दर्शनाचा व भेटीचा सुयोग आज घडून आला आहे त्यांस अनन्यभावें शरण जाऊन, प्रथम आपल्या सर्वांचे व त्यांतहि विशेषतः दूरवरच्या प्रवासाचे कष्ट सोसून, आपला अमोलिक वेळ व द्रव्य खर्च करून, आपले अनेक लौकिक व्यवहार एका बाजूस ठेवून, केवळ धर्मपरायण बुद्धीनें या परिषदेच्या चालकांच्या विनंतीस मान देऊन, या परिषदेस आपल्या आगमनानें शोभा आणणाऱ्या सर्व धर्मबंधूंचें स्वागत मंडळाचे वतीनें स्वागत करण्यास मंडळाला मोठा आनंद वाटत आहे; व म्हणून मी स्वागत कमेटीचा अध्यक्ष या नात्यानें आपले सर्वांचें प्रेमानें साभार स्वागत करितों.

## लोकमान्यांबद्दल दुःखप्रदर्शन.

बांधव हो, ज्या " महाराष्ट्रीय हिंदु धर्म परिषद " या नांवाखालीं आज आपण येथें जमलो आहोंत, व जिच्या प्रथम बैठकीचा पहिला दिवस आपण साजरा करीत आहोंत, तिचा थोडा पूर्वेतिहास, स्वरूप, व हेतू यांबद्दल आपणांस चार शब्द सांगण्यापूर्वी आपल्या केवळ महाराष्ट्रावरच नव्हे, पण अखिल भारतवर्षावर किंबहुना सर्व जगतावर ज्या महापुरुषाच्या अकालीं व आकस्मिक मृत्यूनें मोठा हानिकारक प्रसंग गुदरला आहे; त्या लोकमान्य राष्ट्रसूत्रधार **बाळ गंगाधर टिळकांच्या** निधानाचा उल्लेख केल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं. या सत्पुरुषानें आपल्या सद्वर्तनानें, अलोट बुद्धीनें, व अविश्रांत लौकिक कर्मयोगाच्या आचरणानें आपल्या जन्माची, आपल्या वडिलांच्या नांवाची सार्थकता करून दाखविली आहे. प्रगमनशील इतिहासरूपी गंगाप्रवाहास धारण करणारा जो काळ, ज्यास शास्त्रपुराणांत ईश, काळ किंवा गंगाधर

म्हणतात त्याचे पोटीं जन्म घेणारे तेच खरे बाळ किंवा पुत्र कीं जे जनतेच्या आचरणीय मार्गाचे तिलक किंवा जयपताका अगर जयस्तंभ होऊन चिरःस्मरणीय होतात. जणू काय लोकमान्य टिळकांनीं आपलें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत संस्मरणीय करून ठेविलें आहे हा सर् नारायण चंदावरकरासारख्या विद्वानांचा अभिप्राय **बाळ गंगाधर टिळक** ह्या नांवातच सजीव शरीरांतील जीवनरसाप्रमाणें ओतप्रोत भरून राहिला आहे. ह्या महान् पुरुषाचें चरित्र जनतेस नेहमीं हाच बोध करीत राहील कीं बाप हो, अविश्रांत विद्यार्जनानें व निःपक्षपातबुद्धीच्या विचारसरणीनें जे विचार पवित्र ठरतील तेच आजन्म आपले ध्येय समजून त्यांचे निर्भय प्रतिपादन करणें व देहाची अगर जीवाची पर्वा न करितां निर्लोभपणानें त्यानें आचरण करणें, हा केवळ पुस्तकी उपदेश नसून प्रत्यक्ष करून दाखविण्याची एक व्यावहारिक पण अमूल्य चीज आहे. वैदिकधर्माची प्राचीनता व कर्मयोगाचरणानें व्यवहाराची होणारी धार्मिक धन्यता आपल्या ग्रंथरत्नानें अखिल जगाच्या निदर्शनास आणून देऊन लोकमान्यांनीं वैदिकधर्मावर महदुपकार करून ठेविले आहेत. लोकमान्यांच्या निधनानें जी सार्वजनिक हानी झाली आहे, तिजबरोबर तिचा विशेष वांटा आमच्या या परिषदेकडेहि आला आहे. या धर्मपरिषदेचा पाया बळवंतरावांच्या कर्तबगारीवर नजर देऊनच घातला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. बळवंतरावांच्या अकस्मिक निधनानें त्याला एकवेळ इतका मोठा धक्का बसला होता कीं कार्यकारी मंडळींत बराच वेळ स्तब्धता व शिथिलता उत्पन्न होऊन परिषद भरविणेचा विचार कांहीं काळ लांबणीवर टाकावा अशीं आंतून व बाहेरून औदासिन्यजनक सूचना कार्यकारी मंडळापुढें मांडण्यांत आली होती. परंतु सुदैवानें हातीं घेतलेलें काम मार्गांत येणाऱ्या अडचणीमुळें लांबणीवर टाकणें म्हणजे बळवंतरावजींनीं घालून दिलेल्या धड्याचा त्यांची पाठ या जगाकडे वळतांच अवमान करण्यासारखे आहे या गुरूपदेशाचा पगडा सर्वांचे मनावर बसून एका हातानें डोळें पुशीतच योजिलेलें कार्य शेवटास नेण्याकरितां दुसऱ्या हातानें कंबर बांधून आपणां सर्वांस पूर्वी योजिले प्रमाणें परिषदेस येण्याविषयीं निमंत्रण करण्यांत आले, आणि ही मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं आपण आपले दुःख क्षणभर एका बाजूस ठेवून कर्तव्य परायण बुद्धीनें येथें आला आहांत. शिवाय हल्लींचा योगहि तसाच आहे.

### काल व स्थानमाहात्म्य.

आकाशमार्गात श्रीदेवगुरुचें संक्रमण पराक्रमी सिंहराशींत होतांच त्यानें श्रीगंगौघाच्या महात्म्यास आपली नेहमींची दिशा बदलून दक्षिणेकडे आणिले आहे. त्यामुळें श्रीगोदातीर्थाचें माहात्म्य पुराणप्रसिद्ध नाशिकक्षेत्रीं दुणावले जाऊन हिंदुस्थानांतील चारी दिशांकडून भाविक भागवत जन तेथें एकत्र होत आहेत.

### जगत्गुरु व त्यांचीं पीठें यांचें कर्तव्य व लोकांची सद्यस्थिति.

या प्रसंगानुरूप श्रीजगत्गुरु डॉ. कुर्तकोटी यांचे आगमनहि येथें झाले. धर्मनिग्रहानुग्रह करणें हेंच जगत्गुरु पीठाचें आदिकर्तव्य आहे, व त्या कर्तव्याच्या बजावणीचे कामीं भाग्यवंत कौपीनवंतांनीं बाह्यशरीर रक्षणासाठीं स्वीकारलेली भगवी कौपीन, धर्मरक्षणाची निशाणी म्हणून एका हस्तांत धारण केलेला यतीचा दंड, व धर्मप्रसारार्थ मुखानें सतत केला जाणारा वैदिक धर्माचा उपदेश, व शरीरपोषणाकरितां प्रसंगी स्वीकारलेली भिक्षेची झोळी या स्वतःसिद्ध साधनांच्या चतुष्टया पलीकडे कशाचीहि पर्वा पीठाध्यक्ष तत्त्वतः करीत नाहींत; अशा पीठाध्यक्षांना जनतेच्या धार्मिकोन्नति करितां खर्च न होणारा काळ कष्टमय भासावा हें स्वाभाविक आहे. परंतु कालगतीनें जनतेंत उत्पन्न झालेले कित्येक ठिकाणचे पूर्ण अज्ञान, बहुतेक ठिकाणचे अर्धवट ज्ञान, व कित्येक ठिकाणचे त्याविषयीं विपरीत ज्ञान, शिवाय विधर्मी लोकांकडून केला जाणारा उपहास व विपर्यास, व हिंदुधर्माचें ध्येय केवळ ऐहिक सुख नसून त्याचा पाया पुनर्जन्म व परलोक या वैदिक कल्पनावर असल्यामुळें त्यांतील आचारविचारांची कष्टसाध्यता, व तद्विरुद्ध इतर धर्मांतील दिसून येणारी त्या बाबतींतील शिथिलता. ह्यामुळें स्वधर्माबद्दल येणारा कंटाळा व जीवनकलहामुळें अहर्निश उदरभरण व कुटुंबपोषण ह्याकरितां करावे लागणारे कष्ट यांत चक्काचूर होऊन गेलेली जनता धर्मपराङ्मुख व्हावी इतकेंच नव्हे पण अधर्मचारी, निःसत्त्व व्हावी हे स्वाभाविकच आहे. अशी स्थिति झाली असल्यामुळें लोक धर्मजिज्ञासेनें उत्कंठित होऊन स्वतः गुरुग्रहाकडे धांव न घेतां धर्मगुरुनांच "बापहो, बापहो, सावध व्हा, मजकडे पहा, आपआपसांत भांडू नका, तुम्हांस काय पाहिजे ? मी तुम्हांकरितां काय करावें हें तरी सांगा ?" अशी विचा-

रणा करणें करितां संचार करणेंची व परिषदा भरविण्याची वेळ आली आहे. अशी स्थिति व्हावी हें मनुष्यस्वभावास व सृष्टिक्रमास अनुसरूनच आहे. हा काल महिमा आहे. धर्माचा वेळोवेळीं ऱ्हास व्हावा, त्याचें पुनः पुनः उज्वल पुनरुज्जीवन व्हावें, असाच युगानुयुग धर्माचा इतिहास धर्मग्रंथांतून दिसत आहे. हल्लींच्या युगांतहि हिंदुधर्मानें बौद्ध, जैन, महंमदी, व ख्रिस्तीधर्माबरोबर टकरा खाऊन त्यानें आपलें अस्तित्व कायम राखिलें आहे. हीच गोष्ट आपल्या धार्मिक आचारविचाराच्या स्वाभाविक शक्तीची साक्ष देत आहे; व आपल्या आचारविचारांत फेरबदल करूं इच्छिणारांनीं तो घडवून आणते वेळीं किती सावधगिरी राखिली पाहिजे याचा इशारा देत आहे. या बाबतींत थोडे दिवसांपूर्वी म्हणजे गेले जून महिन्यांत लॉर्ड मेस्टनसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं सर व्हॅलेंटाइन चिरोल यांचे एका प्रसंगीं व्याख्यान झाले त्या वेळीं त्यांच्यासारख्या विधर्मीयांचे मुखांतून निघालेले उद्गार फार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. लॉर्ड मेस्टन त्या वेळीं म्हणाले " परधर्माकडून मिळणाऱ्या धक्कयांस न जुमानतां टिकाव धरणें हें हिंदुधर्माचें गूढ मला चकित करून सोडते. हजारों वर्षें होणाऱ्या जाज्वल्य तडाक्यांतून तावून सुलाखून तो कसा कायम राहिला आहे, व बौद्ध आणि जैन या मोठ्या सुधारणा घडवून आणणाऱ्या धर्मांनाहि मिळून त्यानें आपले स्वत्व कसे कायम राखिले आहे, व धर्मांतर घडवून आणण्याच्या बाबतींत मुसलमानी धर्मासारख्या सत्ताधारी धर्मासहि कसें तोंड दिलें आहे हें मोठें अक्कल गुंग करून टाकणारे कोडें आहे. अशा प्रकारें हजारों वर्षें झगडूनहि लाखोगणती जीवांच्या अंतःकरणातील प्रेम कायम राखणाऱ्या खोल मुळाशीं तसेंच टिकाऊ सद्गुण असल्याखेरीज त्याच्या अस्तित्वाची कल्पना करणें अशक्य आहे, आणि या सद्गुणांतच त्या धर्मांतील आश्चर्यकारक गृहस्थितीची धूर्तपणानें बनविलेली पूर्व कल्पना, आणि अज्ञात व अदृश्य अशा दूरवरच्या परलोकाशीं सतत संबंध राखण्याचा प्रयत्न यांचा अंतर्भाव होतो. "

## परिषदांची आवश्यकता

मित्रहो, कोणी असें म्हणेल कीं हिंदुधर्म जर स्वतःसिद्ध शक्तिमान आहे, तर त्याच्या बचावार्थ या परिषदेसारखे प्रयत्न करणेंची काय अवश्यकता

आहे ? तर त्यास उत्तर असें आहे कीं हल्लींची स्थिति पूर्वापेक्षाहि अधिक कसोटीची आहे. हें युग लोकमत प्राबल्याचें आहे. बहुजनसमाजाच्या मतांशीं शक्य तितके मिळतें न घेणाऱ्या धर्मांचा निभाव लागणें हल्लींचे युगांत फार दुर्घट आहे. धर्म व बहुजन प्रवृत्ति या स्वभावतः विरुद्धगामी गोष्टी आहेत. धर्म हा बंधनरूप व साधारण प्रवृत्तीस अगम्य वस्तूचा बोध करून देणारा आहे. आणि मनुष्यस्वभाव हा निसर्गतः स्वतंत्रताप्रिय व दृष्टफललोभी आहे. याच बाबतींत आतांच सांगितल्या प्रसंगीं लॉर्ड मेस्टन साहेब यांचे उद्गार असे आहेत. " पुष्कळ इंग्रज लोकांना नवीन उदय पावणाऱ्या लोकमत साम्राज्यवादांत व हिंदुधर्मघटनेंत खरा विरोध दिसून येत आहे. धर्ममतें व त्यांना प्रत्येक बाबतींत विरोध करणारी नवीन लोकमतें यांच्या सामन्यांत नवीन मताचा मोड करून अगर त्यांना आपल्या पोटांत घेऊन आपला करण्याचें कामीं कुशाग्र व कुशल ब्राह्मणी बुद्धि आतां कंबर बांधून कशी पुढें येते हें पाहण्यांत मानवी बुद्धीची मोठी मनोवेधक व महत्त्वाची कामगिरी दिसून येणार आहे. "

## हेतु व इतिहास

तात्पर्य, हल्लींची वेळ अणिबाणीची आहे. ब्राह्मणांच्या जानव्यानें आजवर मिळविलेल्या अब्रूची चीज करून दाखविणेची वेळ आहे. नुसत्या नांवानें मोठेपणा मिळणार नाहीं. यावरूनच अशा परिषदेची हेतू आहे, तोच ध्यानीं घेऊन अशी धर्मपरिषद या वेळीं या क्षेत्रांत भरविण्याचा आपला विचार श्रीजगत्गुरु डॉ. कुर्तकोटी यांनीं येथें आल्यानंतर लागलीच आपल्या प्रथमच्या एकदोन व्याख्यानांतच व्यक्त केला. पुढें कांहीं भवतिनभवति होऊन केवळ त्यांच्याच निश्चयानें या परिषदेस आजचें स्वरूप प्राप्त जाहलें आहे. असा या परिषदेचा पूर्व वृत्तांत आपणांपुढें मांडण्यास मला एक प्रकारचा आनंद वाटत आहे

## स्वरूप

आतां या परिषदेच्या स्वरूपाबद्दल आपणांस चार शब्द सांगून मी आपलें भाषण संपवितो.

( अ ) ही परिषद धार्मिक असल्यामुळें व जगत्गुरुपीठाकडे धर्माचे निग्रहानुग्रह असल्यामुळें व त्यांच्याच प्रेरणेनें व निश्चयानेंच ही परिषद भरविली

असल्यामुळें या परिषदेचें अध्यक्षत्व त्यांचेकडे अगर जरूरीप्रमाणें वेळोवेळीं ज्यांचेकडे ते सोंपवितील त्यांचेकडेच ते रहावयाचें आहे.

( ब ) ही परिषद् केवळ चर्चात्मक अथवा मताविष्करणात्मक असल्यामुळें इतर परिषदांप्रमाणें यांत मताधिक्यानुरूप कोणत्याहि प्रकारचे ठराव करण्यांत यावयाचे नाहींत हें या परिषदेचें विशिष्ट स्वरूप आहे. उच्च परलोकाला पोहोंचणारा अगर पोहोंचविणारा हिंदुधर्म एका बाजूस व मृत्युलोकावरील बाह्य विषयाकडे धांवणाऱ्या मानवी मनोवृत्ती दुसऱ्या बाजूस यांचा यथाधिकार मेळ घालून देणारे धर्मगुरु व त्यांची पीठें हे मध्यस्थ आहेत, व ही मध्यस्थी एकतंत्री न होतां ती समाजास शक्य तितकी सुलभ रीतीनें करतां यावी येवढाच या चर्चेचा अगर मताविष्करणाचा हेतू आहे, व हेंच या परिषदेच्या विशिष्ट स्वरूपाचें कारण आहे.

( क ) समाजांतील वेगवेगळ्या हिंदुवर्गांचें प्रेम वाढावें या हेतूनेंच ही परिषद भरविण्यांत आली आहे. सबब येथें होणारी चर्चा व मताविष्करण स्नेहभावानेंच करण्यांत येतील अशीच समजूत सर्व सभासदांची असणार अशा उदार बुद्धीनेंच ही परिषद भरविण्यांत आली आहे, हें सांगावयास नकोच.

याप्रमाणें स्वागतपर भाषण झाल्यावर ठिकठिकाणाहून परिषदेचें **यशश्चिंतन व अभिनंदनपर पत्रें व तारा** आल्याचें परिषदेचे चिटणीसांनीं सांगून श्री. दादासाहेब खापर्डे यांचे पत्र समग्र वाचून दाखविलें तें असें—

श्री.

समरहिल सिमला,

ता. २१–८–२०

श्रीगुरुभक्ति परायण रा. रा. एकनाथपंत कारभारी निसबत श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्य संस्थान मठ करवीर संकेश्वर हल्लीं मुक्काम नाशिक स्वामीचे शेवेसी—

पोष्य गणेश श्रीकृष्ण खापर्डे कृ. श्री. सा. न. वि. वि. श्रीजगद्गुरूचे आज्ञेवरून आपण ता. १५ रोजीं पाठविलेले आज्ञापत्र उमरावतीस जाऊन तेथून परत कालरोजीं प्रविष्ठ होऊन मोठे आनंदास कारण झाले. लो. टिळक कैलासवासी झाल्यामुळें आमचे सर्वच कामाचा घोंटाळा उडाला आहे. प्रभूस त्यांना

आतांच बोलावून घेण्याचे आवडले त्याला उपाय नाहीं. त्यांनीं आणि मी नाशिक येथें होणाऱ्या धर्म परिषदेस हजर राहण्याचें कबूल केलें होतें व तसें करण्याचा मानसहि होता. आतां उभयतां बरोबर हजर राहण्याचा संभवच नाहीं असो. ता. १० ते १२ सप्टेंबर पसंत केल्या आहेत त्या तारखेस मला येथेंच कौन्सिलचे कामासाठीं राहणें जरूर आहे. तेव्हां त्या दिवसांत माझें नाशिकला असणें अशक्य आहे, बरें दुसरी तारिख लिहून पाठवावी तरी ती निश्चित करतां येत नाहीं. श्रींनीं मनांत आणलेलें कार्य मोठें आहे. त्यासाठीं लोकहि पुष्कळ जमा होणार त्याच्या तारखा अनिश्चित ठेवतां येत नाहींत. तेव्हां कसं करावें हें मला सुचत नाहीं मला श्रींची आज्ञा शिरसा मान्य आहे त्यांचेच आज्ञेप्रमाणें सर्व झालें पाहिजे. श्रीपाद पंकजीं माझे अनंत शिरसाष्टांग नमस्कार—

आज्ञांकित
**गणेश श्रीकृष्ण खापर्डे.**

यानंतर प्रो. शि. म. परांजपे, ल. ब. भोपटकर, श्रीधरशास्त्री फाटक, ग. स. मराठे, न. चिं. केळकर, दा. वि. गोखले, ज. स. करंदीकर, सौ. गंगूबाई खेडकर, कमलाबाई देशपांडे, वारुबाई शेवडे महिलाश्रम, पुणें, सरदार, मुतालिक सातारा, कौजलगी वकील विजापूर, सौ. कमलाबाईसाहेब किबे इंदूर, सौ. सरलाबाई नाईक इंदूर, सौ. सुशीलाबाई जयकर, नीलकंठराव कोल्हटकर दादर, डॉ. साव-रकर मुंबई, ताम्हनकर कवि नागपूर, डॉ. नाईक पुणें, काशीबाई कानिटकर बनारस, के. बी. जोशी, चाफेकर, सोलापूर, लक्ष्मण विठ्ठल क्षत्रीय नागपूर यांच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

---

नंतर अध्यक्ष श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांचें खालीलप्रमाणें भाषण झालें.

गेल्या शेंपन्नास वर्षांत आपल्या अध्यात्मिक व सामाजिक ध्येयांची जोपासना करून तीं ध्येयें वाढीस कशीं लावावीं, याचा सर्व बाजूनें ऊहापोह करण्याक-रितां भरविलेली अशी ही पहिलीच "महाराष्ट्रीय धर्म-परिषद्" होय. गेलीं शंभर वर्षें धर्मीविषयीं उदासीन असलेल्या सरकारशींच आपला संबंध आलेला आहे. धार्मिक संघटनेला बळकटी आणून तिला उच्च दर्जास पोहोंचविण्याकरितां

सरकारच्या सहकारितेचा अत्यंत उपयोग झाला असता हें जरी खरें असलें, तरी त्यांच्या औदासिन्यामुळे आपल्याला धार्मिक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य मिळालें, याबद्दल ब्रिटिश राज्यकर्त्यांचे आपल्यावर उपकारच आहेत. धर्मासारख्या अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत जनतेनें दाखविलेल्या औदासिन्यास जरी कांहीं गोष्टी अंशतः कारणीभूत झाल्या असल्या, तरी त्यामुळे आपणांला जनतेची विशेष प्रशंसा मात्र करितां येणार नाहीं. पाश्चात्य मतें व आचारविचार समजून घेऊन आपल्याशीं तीं मतें व आचारविचार कशीं जुळवून घेतां येतील. हें ठरविण्यांतच गेलें अर्धशतक आपणांस घालवावें लागलें. भिन्न समाजरचना, भिन्न चाली रीति, व भिन्न ध्येयें असलेले, मानवी इतिकर्तव्यतेकडे सर्वस्वीं असमान किंबहुना पूर्ण विरुद्धदृष्टीनें पाहणारे, आणि भिन्न शासनपद्धति व शिक्षणक्रम असलेले असे दोन परस्पर विरुद्ध समाज इंग्रजी अंमलाबरोबरच एकत्र आले; आणि एकमेकांवर त्यांचा कोणत्याहि प्रकारें अनिष्ट परिणाम न घडतां ते समाज सहज रीतीनें एकत्र राहूं शकले, हें पाहून कोणाहि इतिहासज्ञास समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं. ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं सामाजिक व आध्यात्मिक बाबतींत आमचा छळ न करितां उदारबुद्धीनें विचार करून तत्संबंधीं आमच्या ध्येयाचें योग्य महत्त्व ओळखलें. आपला समाजहि हटवादी व नवीन विचारांचा विरोधी असा नव्हता. आधुनिक शिक्षणाचें तत्त्व ओळखून आपल्या लोकानीं नूतन युगांतील नवीन ध्येय व मार्ग यांच्याशीं तादात्म्य होण्याचा थोडा फार प्रयत्न केला आहे; पण हें तादात्म्य, हा सलोखा, ही शांतता मिळवितांना आपणांला आपल्या उच्च व उदात्त तत्त्वाकडे दुर्लक्ष्य करावें लागलें, आपल्या धार्मिक आकांक्षांनाहि दडपून टाकावें लागलें, व जुन्या शांततेच्या मार्गाला संकटांत घालावें लागून दिखाऊ सलोखाच मात्र आपणास स्वीकारावा लागला. हें विसरतां कामा नये.

सूक्ष्म रीतीनें विचार करणाराला त्या कर्णमधुर ध्वनींत बेसूरपणा ऐकूं आला होता; व दिवसानुदिवस या दिखाऊ सलोख्यांतूनच हा असरष्ट ध्वनि अधिकाधिक मोठा होऊं लागून केव्हां तरी सलोख्याचे ऐवजीं गोंधळाचा तीव्र ध्वनि निघूं लागणार, असें वाटत होतें; त्याप्रमाणें आज हा असंबद्ध ध्वनि विलक्षण रीतीनें आपल्या कानावर आदळत आहे. दोन परस्पर विरुद्ध संस्कृती एकत्र

झाल्या म्हणजे हा असा असंबद्धतेचा ध्वनि निघणारच. पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृतींचें महत्त्व वस्तुतः परस्पर समान दर्जाचें पण विरोधी आहे. उभय संस्कृतींचा विरोध सध्यां हळुहळु पण स्पष्टरीतीनें दृग्गोचर होऊं लागला आहे. वेळींच जर आपण ह्या वाढत्या प्रवाहाला योग्य व सुरक्षित असें वळण लाविलें नाहीं तर आज ना उद्यां या विरोधाचें भीतीप्रद व विध्वंसक स्वरूप बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहीं, अशी भीति वाटते.

विषयाकडे वळण्यापूर्वी आपल्या मनांतील उदात्त ध्येयांची पुनर्घटना अगर पुनरुज्जीवन समाजानें कोणत्या तत्त्वावर केलें पाहिजे, हें आपण पाहूं. प्रथमतः आपलें शिक्षण व संस्कृति यांचाच प्रश्न आपल्या पुढें येतो. यांचा विचार करितां आपणापुढें एकदम दोन गोष्टी उभ्या राहतात. एक, जुने समजून घ्यावयाचें किंवा तें पूर्णपणे टाकून देऊन सर्व नवीन पत्करावयाचें. हें करितांना आपण एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हल्लीं शिक्षणाचे अगदीं एकदेशी पुरस्कर्ते देखील आपल्या प्राचीन बुद्धिमत्तेची व संस्कृतीची थोरवी ओळखूं लागले आहेत, त्या जुन्या संस्कृतीकडे केवळ परंपरागत मार्गानें न जातां विचाराच्या राजमार्गानेंच गेलें पाहिजे, या बाबतींत एकमत होण्याचा संभव आहे. संस्कृतीच्या या पवित्र मंदिराकडे जाणें, हें एकच जरी आपल्या आयुष्याचें ध्येय असलें तरी तें मंदीर एका पर्वतावर असून त्या पर्वताची उंची व विस्तृतता याविषयीं आपला गैरसमज होऊं नये, हें आपण विसरतां कामा नये. आपल्या प्राचीन संस्कृतींत जीं गूढ व मनोहर प्रमेयरत्नें खोल दऱ्यामध्यें सांठवून ठेविलीं आहेत, तीं शोधून काढून त्यांच्या प्रकाशाचा आणि श्रमपरिहार करणाऱ्या अशा शीतळ जल प्रवाहाचा आपण योग्य उपयोग करून घेतला पाहिजे; नाहीं तर आपणाला आपल्या ध्येयाची प्राप्ती करून घेतां येणार नाहीं; किंवा प्राप्ती झालीच तरी त्यापासून होणारा आनंद अनुभवण्याचा उत्साह आपणांत राहणार नाही. आतापर्यंत संस्कृतीकडेच आपलें लक्ष्य वेधल्यामुळें ज्या तत्त्वावर ह्या संस्कृतीची उभारणी झाली आहे, त्या तत्त्वाकडे आपलें दुर्लक्ष्य झालें आहे. पाश्चात्य विद्वान्, व टीकाकार यांनीं केवळ स्वप्नमय सृष्टींत विहार करण्याऐवजीं त्या उच्च तत्त्वांचे आकलन करण्याविषयीं आपणांत एका अर्थी जी जागृति उत्पन्न केली आहे, त्याचे श्रेय त्यांना देण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

ती स्वप्नसृष्टि नाहींशी झाली असली तरी त्यांतील सत्य अबाधित आहे. कवीनें म्हटल्याप्रमाणें जें नाहीं त्याच्या पाठीमागें लागून आहे तें न सोडतां राष्ट्रीय कार्यांतील आपला भाग ओळखून तें करण्याचा धैर्यानें प्रयत्न केला पाहिजे. जुनें आणि नवें ह्यांतील हा वाद नसून हा झगडा आपल्या राजकीय व सामाजिक जीवितक्रमाविषयीं आहे. केवळ विचार करण्याचा काळ संपला असून आतां राजकीय व सामाजिक गोष्टांत प्रत्यक्ष कार्य करण्याच्या नवयुगास सुरवात झाली आहे. आपल्या राजकीय आकांक्षा कितीहि गुंतागुंतीच्या असल्या तरी त्या साध्य करून घेण्यांत आपल्या उत्साही पुढाऱ्यांनी संपत्ती किंवा बुद्धिमत्ता यांचा व्यय करण्यांत कमतरता केली नाहीं, व्यक्तिगत स्वार्थाकडे लक्ष्य दिलें नाहीं, अगर संकटांना जुमानलें नाहीं, याबद्दल आपणांस अत्यंत अभिमान वाटतो. आपल्या मार्गांतील मुख्य अडचणी आपल्या पुढाऱ्यांनीं नाहींशा केल्यामुळें पुढील मार्ग बराच सुगम झाला आहे, याबद्दल आपण त्यांचेविषयीं अत्यंत कृतज्ञ असले पाहिजे. येथें पुण्यनगरींतील नुकत्याच दिवंगत झालेल्या त्या महाभागाचें, भारतभूच्या त्या अनभिषिक्त भूपतीचें--राष्ट्रसूत्रधार लोकमान्य टिळकांचें— स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. लोकमान्यांनीं या धर्मपरिषदेस स्वतः हजर राहण्याचें कबूल केलें होतें; पण तो योग आपल्या नशीबीं नाहीं. असो.

सामाजिक चळवळींत भाग घेणारे उत्साही लोक बहुधा एकांगी विचाराचे असतात. आपल्या मार्गांत काय अडचणी आहेत, ह्याचा विचार न करतां, ते धडाडीनें पुढें जात असतात. बहुजनसमाज आपल्याबरोबर आहे किंवा नाहीं, त्याकडे सुद्धां ते लक्ष देत नाहींत. किंबहुना आपल्या चळवळीमुळें कोणते गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतात, व त्या प्रश्नांच्या ओढाताणींत समाज कसा हेलकावे खात असतो, ह्याचें त्यांस भानहि राहत नाहीं. अशा परिस्थितींत प्रयत्न करूनहि जर त्यांस नाउमेद व्हावें लागलें, तर त्यांत आश्चर्य तें कोणचें? त्यांच्या चळवळीनें समाजांत विघातक खळबळ उत्पन्न होते, व त्यामुळें कोणत्याहि मार्गानें सुधारणेचें पाऊल पुढें पडत नाहीं. ह्याचें कारण धर्म ही कांहीं तरी दिव्यशक्ति आहे याकडे लक्ष्य न पुरवितां जगांतील साधनावरच त्यांची भिस्त असते.

धर्म हा प्रत्यक्ष राष्ट्राचा प्राणच आहे; आणि धर्माच्या पायावर सुधारणेचे उभारणी केल्याशिवाय राष्ट्राची गति होत नाहीं. हें तत्त्व हिंदु संस्कृतींत विशेष लागूं पडतें, त्याचें कारण समाजांतील नैतिक, सामाजिक व राजकीय प्रश्न धर्म या शब्दांत अंतर्भूत झाले आहेत, हें होय. आमचा धर्म आध्यात्मिकच केवळ नसून आधिभौतिकहि आहे. कोणत्याहि दर्जाच्या स्त्रीपुरुषास आध्यात्मिक मार्गांचीं द्वारें सारखींच खुलीं आहेत; परंतु राष्ट्रीय ध्येय राख-ण्याकरितां सामाजिक बंधनें मात्र अतिशय काळजीपूर्वक घालून ठेविलीं आहेत. इतर धर्मांत आध्यात्मिक बाबतींत दृढ बंधनें आहेत; पण सामाजिक बाबतींत अगदींच बंधनें नाहींत. आपल्या धर्माचा विशेष हा आहे कीं, सामाजिक बाबतींत अतिशय बंधनें असून आध्यात्मिक बाबतींत मात्र अतिशय स्वातंत्र्य आहे. आपल्या धर्मांत शरीराला दृढ बंधनें घातलेलीं असून बुद्धीस पूर्ण स्वातंत्र्य आहे. धर्माच्या अंतरंगांत सूक्ष्मरीतीनें पाहिलें असतां सर्वधर्मांच्या मुळाशीं एकच प्रकारचीं तत्त्वें आढळतात, हें जरी खरें असलें, तरी धर्माच्या बहिरंगाकडे पाहिलें असतां प्रत्येक देशाचा धर्म तेथील परिस्थितीप्रमाणें भिन्न असतो, इंग्लंडसारख्या कित्येक देशांत धर्मसुधारणेच्या युगापासून ( Reformation ) धर्मसंस्था राजकीय संस्थांहून अगदीं वेगळया झालेल्या आहेत. हिंदुधर्माच्या विशिष्ट सामाजिक व धार्मिक घटने-मुळें असला एकांगी मार्ग हिंदुस्थानांत शक्य दिसत नाहीं. हल्लीं हिंदुसमाजघटनेवर राजकारणाचा विशेष परिणाम घडलेला दिसतो. ( उदाहरणार्थ,-सध्यांचा ब्राह्मण व ब्राह्मणेतराचा प्रश्न घ्या ) व त्यामुळें परंपरागत संस्कृति व सुधारणा यांच्या अस्तित्वालाहि धक्का बसण्याचा संभव आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा खोडसाळ भेद करून जातिविशिष्ट प्रतिनिधि निवडण्याचा हक्क सुधारणांच्या कायद्यानें उत्पन्न केल्यामुळें आपल्या सामाजिक व राजकीय संघटनेवर केवढा अनर्थकारक परिणाम झाला आहे, हं पहा ! आपल्या प्राचीन राज्यव्यवस्थेंत आपणाला एक गोष्ट दिसून येईल कीं, चारी वर्णांचे वर्णविहित कर्तव्य भिन्न असलें तरी ते परस्परांना साहाय्यभूत होत असे; पण सध्यां बदललेल्या परिस्थतींत ब्राह्मण ब्राह्मणेतर असा कृत्रिम भेद उत्पन्न केल्यामुळें समाजावर किती अनिष्ट परिणाम झाला आहे, हें आपणांस दिसून

येईल. लिंगायत, क्षत्रिय व वैश्य अशा वरच्या वर्गांना ब्राह्मणेतर वर्गांत घालून इतर वर्गांबरोबर त्यांची योग्यता मानिल्यानें त्यांना वाईट वाटणार नाहीं काय ? ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे वर्गीकरण अर्थातच अत्यंत अयोग्य आहे. ब्राह्मणाशिवाय इतर सर्व वर्गास ब्राह्मणेतर नांवानें संबोधल्यामुळें, पटेल बिलाच्या बाबतींत काय घोंटाळा होतो, तो पहा. पटेलबिल कौन्सिल-पुढें आल्याबरोबर समाजांत किती गोंटाळा उडतो तें आपण पाहिलें आहे. प्रथमतः सामाजिक बाबतींत परधर्मी सरकारला हात घालूं न देतां आपलें संकट आपणच दूर केलें पाहिजे. धर्मगुरु व प्रतिनिधि सभा यांनीं मिळून असल्या प्रश्नांचा निकाल केला पाहिजे. दुसरें, ह्या बिलाचें समर्थन करितांना किती काल्पनिक मुद्दे पुढें आले होते, हें आपण पाहिलेंच असेल. ते मुद्दे किती निरर्थक आहेत, हें दाखविण्याचें हें स्थल नव्हे, पण असल्या विषयांत परस्पर सहकारिता दाखवून ह्या विषयाचा किती काळजीपूर्वक विचार केला पाहिजे, हें दाखविण्याकरितांच मी या विषयाचा येथें उल्लेख केला आहे. प्राचीन संस्कृति व सुधारणा धर्माच्या भक्कम पायावर पुनः प्रस्थापित कर-ण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न जरी बाजूस ठेवला, तरी अस्पृश्यतानिवारण, पतितपरावर्तन वगैरे सध्यां थोडे दिसणारे पण कालांतरानें खात्रीनें वाढणारे प्रश्न कमी महत्त्वाचे नाहींत. या विषयाकडे आपण अत्यंत काळजीपूर्वक लक्ष्य पुरविलें पाहिजे.

पूर्वी धर्मगुरूंना राजेलोकांची सहानुभूति व आश्रय मिळत असे. उभय-तांच्या सहकारितेनें जनसमूहाचा मार्ग सुलभ होत असे, पण सध्यां तशी स्थिति नाहीं. सरकार परकीय व धर्मगुरुविषयीं उदास आहे. जनतेला मिळणारें सध्यांचें शिक्षणहि असे आहे कीं, त्यामुळें लोक धर्मालाच नव्हे तर धार्मिक बुद्धीलाहि पारखे झाले आहेत. सध्यांच्या सदोष शिक्षणपद्धतीनें नवीन पिढीच्या धार्मिक समजुतीवरच घाला घातला आहे; व त्यामुळें नवीन पिढी कर्तव्यशून्य, असंस्कृत, कमकुवत व देशाभिमानरहित झाली आहे. परकीय राजकर्त्यांकडून आपणांस सहानुभूति मिळणार नाहीं हें अगदीं उघड आहे. अशा स्थितींत जर आपली प्रगति करून घ्यावयाची आणि आपल्या प्राचीन सुधारणेचा झेंडा मिरवावयाचा असेल तर आपण राष्ट्रीय कार्यांकरितां वादविवाद

वाद करून, विचारविनियम करून परस्परांची अधिक ओळख पटवून घेऊन सहकारितेनें कार्यास सुरुवात करावयास नको काय ?

म्हणूनच आपणां सर्वांची कळकळीची सहानुभूति आणि सक्रिय सहकारिता पाहिजे अशी या प्रसंगीं मी इच्छा करितों. सर्व धर्मगुरूंनीं एकत्र जमून लोकांना धार्मिक बाबतींत आपलें कर्तव्यकर्म करण्याकरितां मार्ग आंखून द्यावा असें मला वाटतें. यापुढें धार्मिक संस्थांची व्यावहारिक बाबतींत नवीन पद्धतीवर रचना झाली पाहिजे. भिक्षुकवर्गाची सुधारणा करण्याकरितां कांहीं तरी व्यवस्था करावी लागेल. जेथें शास्त्री व पंडित यांना अर्वाचीन विद्वानांच्या सहाय्यानें आधुनिक पद्धतीप्रमाणें संशोधन करून जुन्या तत्त्वांचें महत्त्व दाखवितां येईल अशा प्रकारच्या विद्यापीठांची आवश्यकता आहे. धर्मगुरु आणि जुन्या व नव्या तऱ्हेचे विद्वान् ज्यांत एकत्र होतील, अशा प्रकारची प्रातिनिधि सभा स्थापावी लागेल, आणि तेथें आपल्या चालीरीती व आचार ह्यांचा विचार करावा लागेल. प्रांतोप्रांतीं धर्मशिक्षण देणारे प्रचारक नेमण्याची अत्यंत जरूरी आहे. धर्मगुरूंच्या सभेमध्यें जुन्या आणि नव्या मताचे पुरस्कर्ते एकत्र जमून जर खल करतील तर जुन्या-नव्याची सांगड घालणें फारसें कठीण होणार नाहीं. धर्मगुरु हें काम हातीं घेतील व लोक त्यांच्याशीं तत्परतेनें सहकारिता करतील, तर हें कार्य फार कठीण नाहीं; व हल्लींच्या काळांत ह्या सर्व गोष्टींची आवश्यकता असल्यानें हा " धर्मपरिषदे " चा उपक्रम केला आहे. परमेश्वरकृपेनें हा प्रयत्न व्यर्थ जाणार नाहीं, अशी आशा आहे.

आतां आपल्या भाषणाची पुरवणी म्हणून जें काय सांगावयाचें आहे, तें सांगितलें नाहीं तरी चालण्यासारखें आहे. परंतु परिषदेबद्दलचा कांहींच्या मनांतील गैरसमज दूर करण्यासाठीं चार शब्द सांगितलें तरी अस्थानीं होणार नाहीं.

आपल्या परिषदेबद्दल केसरी, लोकसंग्रह, उदय, लोकशाही वगैरे राष्ट्रीय वर्तमानपत्रांनीं अनुकूल असा अभिप्राय दिला आहे. हिंदुमिशनरी वगैरे वर्तमानपत्रांनीं प्रतिकूल मत व्यक्त केलें आहे, ह्यांत कांहीं नवल नाहीं.

केसरीच्या स्फुटांत, आपली ही परिषद झाल्यावर पांचचार दिवसांनीं पंढरपूर येथें दुसरी एक धर्मसभा भरविण्यांत येत असल्यानें, असें न करितां एकच संयुक्त परिषद भरविली असती तर बरें होतें असा अभिप्राय आला आहे, तो अगदीं सयुक्तिक आहे. पुष्कळ दिवसांपासून येथें ही परिषद भरविण्याचा हेतु होता, आणि ही गोष्ट पांच सहा महिन्यांपासून बेळगांव, सातारा, सोलापूर वगैरे जिल्ह्यांत संचार करीत असतां आणि खुद्द पंढरपूर येथें गेल्या वेळीं मी जाहीर करीत आलों. येथें चातुर्मास्यासाठीं येतांच ही गोष्ट प्रसिद्ध करण्यांत आली होती. परिषदेचे उद्देश, कार्यकारी मंडळाची निवडणूक वगैरे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यानंतर कित्येक दिवसांनीं पंढरपुरास सभा होण्यासंबंधीं हकीकत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली, आणि तेव्हांच ती आम्हांला समजली. पंढरपुरकरांचा हेतु आम्हांस अगोदरच कळला असता तर, अशा दोन परिषदा न होतां एकच संयुक्त परिषद होण्याबद्दल आम्हीं अनुकूल होऊन शक्य ती मदत केली असती. असो. आतां दोन्ही परिषदांची एकमेकांशा सहानुभूति व सहकारिता झाल्यास त्या निरनिराळ्या झाल्याबद्दल कोणास कांहीं वाटणार नाहीं. आणि पंढरपुरच्या सभेच्या मंडळीकडून मुद्दाम प्रतिनिधि ह्या परिषदेस आल्यामुळें सर्वांना सहकारितेची खात्री वाटते.

आतां हिंदुमिशनरीबद्दल चार शब्द सांगणें भाग आहे. त्यांनीं आपल्या परिषदेबद्दल तीन अंकांमध्यें लेख लिहिले आहेत. त्या लेखांतील प्रत्येक मुद्दा घेऊन त्याची सयुक्तिकता कितपत आहे हें पहाणें हा आतांचा आपला विषय नाहीं. परिषदेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक पहिले सभेत होऊन पुढल्या सभेत चर्चा करून ठरविण्यासाठीं उद्देश वगैरेचा जो मसुदा करण्यांत आला त्याची हकीकत ता० १३ जुलैच्या केसरींत प्रसिद्ध झाल्याचें पाहून हिंदुमिशनरीनें ता. १९ जुलैच्या अंकांत टीका केली आहे. पहिल्यानें योजलेल्या परिषदेच्या नांवांतील " वैदिक धर्म " ह्याच्या ऐवजीं " हिंदुधर्म " अशी संज्ञा त्यांनीं सुचविली. ज्या आद्य श्रीशंकराचार्यांची स्तुति हिंदुमिशनरी करितो त्यांच्याच गीताभाष्यांतीलः—

" ब्राह्मणत्वस्य " हि रक्षणे रक्षितः स्यात् वैदिको धर्मः "

इत्यादिक वाक्यांवरून वैदिक धर्म हें नांव प्रथम स्वीकारण्यांत आलें होतें दुसऱ्या सभेंत चर्चा होऊन " हिंदुधर्म " असें परिषदेला नांव देण्यांत आलें.

आणि ही हकीकत ता. १६ जुलैच्या लोकसंग्रहांत प्रसिद्ध झाली आहे. त्या नंतर तीन दिवसांनीं निघालेल्या हिंदुमिशनरीच्या अंकांत तेंच " हिंदुधर्म " असें नांव सुचविण्यांत आलें. ह्यावरून हिंदुमिशनरीकारांना प्रचलित गोष्टीबद्दल किती माहिती असते, हें व्यक्त होतें. अशा प्रकारचा त्यांचा गैरसमज ते समक्ष परिषदेस हजर राहिल्यानें दूर होईल म्हणून त्यांना परिषदेला बोलाविलें होतें. त्याला त्यांजकडून, " हिंदुधर्म " परिषदेचें आपलें आमंत्रण पोंचलें. त्याबद्दल मी आपला आभारी आहें. सभेचें कार्य व व्यवस्था मला मान्य नाहीं, म्हणून सभेला येण्याचा माझा विचार नाहीं. मी आपले विचार हिंदुमिशनरींत प्रगट करून अंक आपल्याकडे पाठविले. पोंचल्याचें कळलें नाहीं. " असें उत्तर आलें. त्यांनीं मुद्दाम पाठविलेले हिंदुमिशनरीचे अंक पोंचले आणि त्यांत त्यांनीं जें काय लिहिलें ते आम्हांला पटलें नाहीं म्हणूनच परिषदेंत चर्चा करण्यासाठीं त्यांना आमंत्रण पाठविलें होतें. परिषदेचें कार्य वगैरे मान्य नसल्यास त्यांनीं येथें येऊन आपलें मत मांडावयास पाहिजे होतें. प्रत्येक मनुष्याबरोबर वर्तमानपत्रांत चर्चा करीत राहिल्यानें लागणारा अधिक वेळ वांचविण्यासाठींच परिषदा भरविण्यांत येत असतात; परंतु जेथें हजर न राहून आपलें म्हणणेंच यथार्थ असा ग्रह धरून बसणारांस कोणी काय करावें ? ख्रिस्ती झालेल्या कांहीं उच्च वर्गातील हिंदुलोकांना पश्चातापानें पुनः हिंदु होण्याची इच्छा झाली असूनहि सर्वसंमत नसलेल्या हिंदुमिशनरी-कारांमार्फत मिळणारें हिंदुत्व त्यांना नको असल्याच्या उदाहरणांवरून तरी केवळ आपल्याच मतानें चालविलेलें काम किती योग्य आणि यशस्वी होत आहे हें त्यांनींच पहावें.

याप्रमाणें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर परिषदेपुढें आलेल्या निबंधांची वर्गवारी व वक्त्यांचा क्रम ठरविण्याकरितां वक्त्यांनीं व प्रतिनिधींनी काकिर्डे वाड्यांत सायंकाळीं ४ वाजतां जमावें अशी विनंति चिटणीसांनीं केली. व परिषदेचें आजच्या दिवसाचें काम खलास झाल्याचें जाहीर केलें.

---

# दिवस दुसरा.

## ता. ११।९।२०

परिषदेस प्रारंभ दुपारीं बरोबर दोन वाजतां झाला. सभागृह तत्पूर्वीच प्रेक्षकांनीं व प्रतिनिधींनीं चिकार भरून गेलें होतें अध्यक्षांची स्वारी स्थानापन्न होतांच मुलामुलींनीं खालील सुस्वर पद्यांत सर्वांचें स्वागत केलें.

### पद–

स्वागत देवाचें। प्रभूचें। स्तवन त्याचें, करुं प्रथमचें, भुवन नमनाचें। हरीचें ॥ ध्रु० ॥ मागूं मग वाचे। शुभाचे। प्रसाद साचे तत्करुणेचे आशिर्वादाचे। सुखाचे ॥ १ ॥ घेई घननीळा। दयाळा। त्वच्चरणावरि वाहियल्या। नमनांच्या माळा। दयाळा ॥ २ ॥ पावें स्नेहाळा। दयाळा। जनगण मंगल होण्यासाठीं। उत्सव हा केला। दयाळा ॥ ३ ॥ उत्सव हा असला दयाळा। हेतू हा कीं, प्रभु उघडाव्या। उन्नतिच्या शाळा। दयाळा ॥ ४ ॥ शिक्षणबाग नवा। फुलावा। जनहृदयाला ज्ञानफुलांचा बहर तो यावा। खुलावा ॥ ५ ॥ सुगंध पसरावा। गुणांचा। विद्वत्तेच्या छायेमध्यें जनकोकिळ गावा। नटावा ॥ ६ ॥ वसंत उमलावा। प्रगतिचा। ऐक्यपूर्ण चंद्रोदय व्हावा। मयूर नाचावा। सुखाचा ॥ ७ ॥ कुर्वाळुनि बाळां। दयाळा। ज्ञानामृत तें सरस्वतीनें पाजावें सकळां। दयाळा ॥ ८ ॥

---

नंतर श्रीमज्जद्गुरु शंकराचार्य म्हणाले—आपली धर्मपरिषद केवळ चर्चात्मक आहे. यांत कोणताहि निर्णय करणें आपणांला शक्य नाहीं धर्मसंबंधीं परस्पर विरुद्ध लोकांचीं मतें एकमेकांनीं ऐकून घ्यावीं त्यावर विचार करावा त्यांचे भाषणांतील मुद्दे जनतेसमोर चर्चेसाठीं यावे व अखेर सर्वांनीं मिळून कांहीं तरी तडजोडीचा मार्ग काढावा म्हणून आपण सर्वजण एकत्र जमलों आहोंत. येथें विरुद्ध मतवाद्यांचीं भाषणें होतील; कोणी प्रिय बोलेल, कोणी अप्रिय

बोलेल सर्वांचें म्हणणें आपण शांतपणें ऐकून घेतलें पाहिजे, तरी पण सर्व वक्त्यांना मी असें सांगतों कीं, कोणीहि लोकांच्या मनाला लागेल, कोणाचेंहि मन दुखेल अशा तऱ्हेची कठोर शब्दरचना आपल्या भाषणांत आणूं नये. अप्रिय विषय गोड भाषेंत सांगणें यांतच वक्त्याचें शहाणपण दिसून येतें. तरीं सर्वांनीं त्याप्रमाणें वागावें. आतां कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें वे. शा. सं **वामनशास्त्री दातार** आपलें म्हणणें सभेपुढें मांडतील. असें सांगितल्यावर रा. दातार पुढें येऊन म्हणाले—'माझा विषय धर्मपरिषदेचें साध्य' हा आहे. संस्कृति, इतिहास, परंपरा, राजकारण, व सत्ता वगैरे गोष्टींवर राष्ट्राचें राष्ट्रीयत्व अवलंबून असतें संस्कृति कायम राखण्याकरितां आचार विचार शुद्ध राखले पाहिजेत, आचारपरंपरा तुटेल तर अधोगति ठेवलेलीच आहे. आचारभिन्नत्वामुळें आपल्या धर्मांत विविधता उत्पन्न झाली आहे. मतांतरांमुळें दोन पक्ष झाले तरी माझ्या मतें या धर्मपरिषदेचें जर कोणतें कर्तव्य असले तर तें धर्माधिकारी वर्गांतील मतामतांचा माजलेला गलबला शांत करणें होय. प्रथम सर्व जगद्गुरूंचें एक मत होणें जरूर आहे. निरनिराळ्या पंथांच्या जगद्गुरूंशीं सहकारिता करून त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन सर्वानुमतें एक धर्ममहामंडळ नेमावें. त्या मंडळानें पूर्वपरंपरा न तोडतां सध्यांच्या बदललेल्या काळास अनुसरून आचारांत फरक करावा; असा फरक पूर्वी बुद्धाच्या वेळीं आद्य शंकराचार्यांनीं केला आहे, येणेंप्रमाणें शंकराचार्यांनीं जर आपसांत एक मार्ग ठरवून दिला तर धर्माभिमानी जनता त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानील. यानंतर पुण्याचे डॉ. **श्रीधर व्यंकटेश केतकर** म्हणाले धर्माध्यक्षांनीं जर आपलीं कर्तव्यें चोख बजावलीं असतीं तर जातीजातींत तंटाच उत्पन्न झाला नसता. आतां या सर्व गोष्टींचें निराकरण करण्याकरितां सर्व जनतेचें मिळून एक चातुर्वर्ण्यसंरक्षक पीठ उत्पन्न करावें. धार्मिक शिथिलतेमुळें आपल्या चातुर्वर्ण्याची घडी विसकटली आहे. चातुर्वर्ण्य नको म्हणणारांना मी असें सांगतों कीं, चातुर्वर्ण्य नाहीं कोठें? तें सर्वत्र आहे. पण इतरांचें चातुर्वर्ण्य संस्कारयुक्त नाहीं व आपलें संस्कारयुक्त आहे, त्यांचें चातुर्वर्ण्य क्रियायुक्त आहे. भगवंतांनीं गीतेंमध्यें देखील गुणकर्मविभागयुक्त चातुर्वर्ण्य प्रतिपादिलें आहे. वर्णनिर्णय संस्कारांवर न ठेवतां क्रियेवर ठेवावा. या सर्व गोष्टींची चर्चा येथें

व्हावयास पाहिजे होती. जगद्गुरूंचे अधिकार व आज्ञा हल्लीं कोणी मानीनातसे झाले आहेत. तसें होऊं नये म्हणून श्रींना दंडधारित्वाचा अधिकार राजाकडून मिळावा. सध्याच्या लोकशाही युगांत श्रीनीहि आपलें धोरण उदारतेचें ठेवले पाहिजे. चारी वर्णांतील लोकांचें एक कौन्सिल नेमाव; व त्यांच्या सल्ल्यानें काम करावें व त्यास जगद्गुरूपीठाऐवजीं चातुर्वर्ण्यसंरक्षक पीठ असें सार्थ नांव द्यावें. नंतर मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजमधील प्रोफेसर **चंद्रात्रे** यांनीं आपली पीठाच्या कर्तव्याविषयींची अत्यंत उपयुक्त सूचना व पीठासंबंधीं तरुण पिढीचें कर्तव्य यासंबंधीची योजना पुढे मांडून तरुणांच्या दृष्टीनें सध्यांच्या आचारांत व शिक्षणक्रमांत काय फरक केले पाहिजेत, आपली दिशाभूल कोणी मार्गदर्शक नसल्यामुळें कशी होतें, धर्म व व्यवहार यांची आम्हांस ओळखहि नसल्यानें समाज कसा वाहवत चालला आहे वगैरे गोष्टींचें सुंदर विवेचन केलें. आपला धर्म संग्राहक असल्यानें हिंदुत्वाची व्याख्या तरी काय असा प्रश्न उत्पन्न होतो. धर्मगुरू, धर्माचें स्वरूप व अंमलबजावणी यांमध्यें अवश्य सुधारणा झाल्या पाहिजेत. त्याकरितां गांवोगांव हिंडून जागृति करून ठिकठिकाणीं धर्मसभा स्थापाव्या, तेथें धार्मिक शिक्षण द्यावें वगैरे मुद्यांसंबंधीं उत्तम भाषण केलें. पुढें मुंबई कोंकणस्थ वैश्यसमाजाचे प्रतिनिधि रा. **जगन्नाथराव ढवण** यांनीं हिंदुधर्मीयांच्या पुढील धोरणासंबंधीं सांगितले कीं, जातीजातींतील तंटे यापुढें विकोपास जाऊं नयेत व असलेले निर्मूल व्हावेत यासाठीं आपण सर्व हिंदुधर्मीयांनीं उदारतेचें धोरण स्वीकारलें पाहिजे. आपण आपसांत कितीहि भांडलों तरी आपण सर्व हिंदु आहोंत, हिंदुत्व आपल्यांत कायम आहे, तें नष्ट झालें नाहीं तोंपर्यंत आपण एकमेकांत प्रेम उत्पन्न केलें पाहिजे, सर्वांचें एकीकरण केलें पाहिजें. तें करणें म्हणजे सबगोलंकार करणें नव्हे; तर सर्वांची दृष्टि एकाद्या उच्च ध्येयाकडे वळविली पाहिजे. आचारांत कांहीं फेरबदल होणें इष्ट आहे, पण चातुर्वर्ण्यसंस्था मोडतां उपयोगी नाहीं. याबद्दल जगद्गुरूंनीं सर्व पंथांच्या पुढाऱ्यांची एक धर्मसभा स्थापन करावी, म्हणजे सर्वांसच आपलेपणा वाटूं लागून जो तो धर्माच्या ऊर्जितावस्थेकरितां झटून प्रयत्न करील. नंतर **गणेश प्रभाकर दीक्षित** म्हणालेः–गुणकर्माप्रमाणें आचार विचार प्राचीन ऋषींनीं ठरवून दिले आहेत त्याप्रमाणें प्रत्येकानें वागावें. सर्वच जण बंडखोरी

करूं लागतील तर धर्मांत बेबंदशाही माजेल, वर्णभेदामुळेंच आपला धर्म जीव धरून आहे. तरी सध्यांची व्यवस्थाच योग्य आहे. पुढें श्रींनीं **धोंड-शास्त्री ब्रह्मनाळकर** यांना पाचारण केलें, तेव्हां ते म्हणालेः–देशकाल-वर्तमानानुरूप धर्मांत व आचारांत फेरबदल केला पाहिजे. घर मोडकळीस आलें म्हणजे आपण त्याची डागडुजी करतों; त्याप्रमाणें तसें न करतां जर आपण घराचा पाया बळकट आहे म्हणून स्वस्थ बसलों, तर सर्व घर अंगावर कोस-ळून अनर्थ ओढवेल. आपण फेरबदल केले नाहींत तर परिस्थिति आपणांस तसें करावयास लावील. अशा आशयाचें या सर्वतंत्रस्वतंत्र शास्त्रीबुवाचें मोठें मार्मिक व विनोदात्मक भाषण झाल्यावर वे. शा. सं. **सीतारामशास्त्री** व **रामनारायणशास्त्री गौड** या दोघां विद्वान पंडितांचीं परस्पर ऐक्य-वर्धन व धर्माची व्यापकता या विषयांवर समतोल व विद्वत्ताप्रचुर अशी भाषणें हिंदींत झाली. नंतर नाशिकचे **विठ्ठलराव गाढवे** म्हणाले कीं,–धर्मांत कांहीं तरी घोंटाळा उत्पन्न झाला आहे म्हणून ही परिषद भरविणें प्राप्त झालें. रोग झाला म्हणजे औषध घ्यावें लागतें. हा घोंटाळा म्हणजे जातीजातींतील भांडणें होय. या जाती पूर्वीं नव्हत्या. वर्णव्यवस्थेंत जातींचा उल्लेख नाहीं. जाती मनुष्यनिर्मित आहेत. आम्हीं मानवांनीं ७ कोटी दुसऱ्या मानवांना अस्पृश्य कोटींत टाकलें आहें. हा अन्याय त्यांना सहन कसा होणार ? त्यांना आपलेपणानें वागावलें तर परस्पर प्रेम वाढेल व धर्मांतील घोंटाळे एक दिलानें नाहींसे करतां येतील. पुढें **श्रीराम बाळकृष्ण गोसावी** या तेरा वर्षें वयाच्या विद्यार्थ्याला श्रींनीं बोलण्यास आज्ञा दिली. त्यानें पुढीलप्रमाणें आपली योजना सभेपुढें मांडली.

धर्मशिक्षण मिळण्यासाठीं एक धर्ममठ होणें अत्यंत अवश्य आहे. आणि त्यांत इतके विषय संग्रहीत केले पाहिजेत.

१ संस्कृत भाषेचें शिक्षण देणें.

२ धर्मशिक्षण मिळण्याची व्यवस्था करणें.

३ धार्मिक कृत्यें करवून घेणें.

१ संस्कृत भाषा शिक्षणः—आपलें सर्व धर्मशास्त्र संस्कृत भाषेमध्यें अस-ल्यानें ती भाषा अवगत होणें अत्यंत अवश्य आहे. आणि शास्त्रांतील मर्म

कळण्यासहि त्या भाषेचें ज्ञान होणें अत्यंत अवश्य आहे, आणि तें नवीन पद्धतीनें शिकवण्याची तजवीज केली पाहिजे.

२ धार्मिक शिक्षणः—आपला धर्म कोणकोणत्या तत्त्वांवर उभारला आहे, त्यांत जीं कृत्यें करण्यास सांगितलीं आहेत, तीं कोणत्या उद्देशानें सांगितलीं आहेत इत्यादि ज्याच्या योगानें आपल्या धर्माची यथार्थ कल्पना येईल अशा तऱ्हेचें धर्मशिक्षण त्या मठांत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आणि त्यांचें सर्व अध्ययन करण्याची ज्यांची इच्छा असेल तीहि पुरविण्याची त्यांत व्यवस्था होणें अवश्य आहे.

नंतर पुण्याचे रा. **श्री. म. माटे** यांनीं पुढील आशयाचे भाषण केलें हिंदुधर्मांतील अस्पृश्य मानलेल्या जातींचे अस्पृश्यत्व निघाले पाहिजे व ते निघण्यासाठीं सर्वांत उच्च दर्जाचा उपाय म्हणजे परमेश्वराचे पायापाशीं सर्व वर्णांना एकत्र जमण्यास मुखत्यारी असावी. अळंदी, पंढरपूर इत्यादि ठिकाणीं हजारों हिंदुधर्मांत राहणाऱ्या महार मांगांची भक्ति लागली आहे. त्या ठिकाणच्या देवळांत तरी त्या लोकांचा प्रवेश होण्यास पीठांकडून संमति मिळावी व ही गोष्ट अमलांत आणण्याविषयीं पीठानें खटपट करावी. याप्रमाणें आपण उदार धोरण ठेवून त्यांना आपलेसें केलें म्हणजे धर्म त्याग करावा असें त्यांना कल्पांतीहि वाटणार नाहीं. दुष्काळांत फंड उभारून गरीब हिंदु लोकांवरील परधर्म प्रवेशाचे संकट टाळावे म्हणजे धर्मास बळकटी येईल हे कार्य श्रींनीं प्रथम हातीं घ्यावें.

याप्रमाणें भाषण झाल्यावर परिषदेचा आजच्या दिवसाचा कार्यक्रम संपल्याचे चिटणीसांनीं जाहीर केलें तिसऱ्या दिवसाचें काम सकाळीं ८ वाजतां सुरू होईल तरी सर्व वक्त्यांनीं व प्रेक्षकांनीं त्या वेळीं हजर रहावें अशी विनंति केल्यावर श्रींच्या जयजयकारांत समारंभ आटोपला.

---

# दिवस तिसरा

## ता. १२-९-२०

काँग्रेस आटोपून परतलेले महाराष्ट्राचे मोठमोठे राजकीय पुढारी मुद्दाम परिषदेकरितां नाशिक येथें उतरणार व त्यांचीं भाषणें परिषदेंत होणार या आशेनें परिषदेच्या कार्यक्रमास सुरवात होणें पूर्वीच सर्व सभागृह प्रेक्षकांनीं भरून गेले होते. अध्यक्षांची स्वारी येतांच सभेच्या कामास सुरवात झाली. प्रथमतः चिटणीसांनीं, कल्याणचे रा. व. चिंतामणराव वैद्य, सौ. गिरजाबाई केळकर वगैरे मंडळींच्या परिषदेस हजर राहणे अशक्य असल्या बद्दलच्या, दिलगिरी प्रदर्शक तारा वाचून दाखविल्या. नंतर इंदूरचे रा. **काशीकर** यांना श्रींनीं भाषण करण्यास पाचारण केलें, ते म्हणाले, सध्यांच्या आचारांत परिस्थित्यनुरूप आपणांला पुष्कळ बदल करावा लागेल, त्यासंबंधीं सर्वांची एकवाक्यता जरी नसली तरी बहुमत तरी पाहिजे. श्रींनीं अशा सभा गावोगांव भरवून लोकांचे मत अजमावून पहावें. हिंदु मिशनरी संस्थेप्रमाणें एकाद्या उपटसुंभानें हा बदल करावयाचा ठरविला तर त्याला फारसा पाठिंबा मिळणार नाहीं. जें करणें ते योग्य मार्गानें झालें तरच गोड होईल. पुढें **नारायणशास्त्री फाटक** यांनीं आपलें विचार थोडक्यांत पण फारच मुद्देसूद रीतीनें सांगितले व सध्यां होत असलेल्या मत भेदाचे कारण जनतेंतील अज्ञान असून जर अज्ञाननिराकरणाचा मुख्य मार्ग जो निरभिमान तो पतकरला तर लौकरच सत्ययुग सुरू होईल, नंतर श्री. **सदाशिवराव बर्वे** यांनीं सांगितलें कीं, आचार शिथिल झाल्यामुळें समाजांत धरबंद राहिला नाहीं. चारी वर्णांनीं परिस्थित्यनुरूप आचार धर्म पाळावा म्हणजे तंटे होणार नाहींत. नंतर वे. शा. सं. **भास्कराचार्य ज्योतिषी** बेळगांव, यांचे भाषण झालें, ते म्हणाले, " आमच्या वैदिक धर्माचे चातुर्वर्ण्य हे खांब आहेत. तेच स्थिर राहून हिंदुधर्म देवालय मजबूत राहील अशी काळजी घेतली पाहिजे. प्रत्येक वर्णानें आपल्या सहज कर्माप्रमाणें आचरण केलें असतां समाजांत अनास्था न माजतां तो समाज सदैव श्रेष्ठपदींच राहील. यासाठीं धर्म शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. "

यानंतर नाशिक येथील **डॉ. काळे** यांचे ब्रह्मकर्म हेंच आरोग्याचें मूळ या विषयावर भाषण झालें. ते म्हणाले, आपल्या प्राचीन ऋषिवर्यांनीं नित्य-कर्मांची जीं बंधनें घालून दिलीं आहेत तीं मनुष्यमात्राच्या आरोग्यास अत्यंत उपयुक्त व इष्ट अशीच आहेत; त्याप्रमाणें वागल्यास इहपरलोकीं सुखच मिळेल. आजकाल ती परंपरा सुटल्यामुळें आपण अशा अवनत स्थितीस येऊन पोहों-चलों, तेव्हां त्या परंपरेचा पुनरुद्धार श्रींच्या पीठाकडून व्हावा.

श्रीक्षेत्र सप्तशृंग ( नाशिक ) येथील वे. मू. **महादेवशास्त्री क्षेम-कल्याणी** हे आपल्या भाषणांत म्हणाले " राजाकालस्य कारणं या न्यायानें हल्लीं धर्मविषयीं जरी सर्वत्र औदासिन्य उत्पन्न झालें असलें तथापि या बाब-तींत यापुढें प्रयत्न केल्याखेरीज राहतां उपयोगी नाहीं. धार्मीक बावतींत कोणी तरी शास्ता पाहिजे. व श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं जी मठ स्थापना केली त्यांनींच हा प्रश्न हातीं घेऊन धर्मशिक्षणाचा प्रसार केला पाहिजे."

**रा. प. या. निफाडकर धुळें.** हे आपल्या भाषणांत म्हणाले, " धर्म प्रसाराबरोबर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीसंबंधानें जागृति उत्पन्न करून देणारे मठ ठिकठिकाणीं झाले पाहिजेत. मठ श्रीसमर्थांच्या धर्तीं-वर असावेत व त्यासाठीं एक सल्लागार मंडळ स्थापन करून धर्म प्रसाराचें कार्य श्रीनीं हातीं घ्यावें तेथें चातुर्वर्ण्याला बाध न येतां सर्व जातींना समसमान पण निराळे हक्क असावेत. या प्रकारें अज्ञान नाहीसें झालें म्हणजे अस्पृश्य वाद राहणार नाहीं,

नंतर श्री, **गणेशशास्त्री गाडगीळ** यांनीं सांगितलें कीं, ब्राह्मणानीं आपल्या हातांत धार्मिक सत्ता घेतली म्हणून लोक ओरडतात पण यांत बिघ-डलें कोठें ? इंग्रज सरकारच्या कायद्याप्रमाणें सर्वांना वागलेंच पाहिजे; पण कायदा म्हणजे काय हे कोणाला तरी माहित आहे काय ? ते ज्ञान फक्त वकि-लानांच असते. असें असणे ही जगाची रहाटीच आहे. धनुर्वेद फक्त क्षत्रियच जाणत होते, अशी ही ईश्वरी वांटणी आहे, नंतर श्री; **जगदीशानंदजी** यांचे चातुर्वर्ण्य या विषयावर हिंदींत भाषण झालें, त्यांनीं चातुर्वर्ण्याची आवश्य-कता, गुणकर्मानें झालेले विचार, उत्तम समाज रचना कोणती वगैरे विषयांचे आधारासह सुंदर रीतीनें विवेचन केलें व सध्यांचे कालीं उत्पन्न झालेली ही

चळवळ म्हणजे समाजविध्वंस करण्याकरितां, दैत्य दानवांनीं चालविलेले प्रयत्न होत; असें सांगून यांचा विनाश शेवटीं प्रत्यक्ष परमेश्वरच करील असें सांगितलें पुढें एक गुजराथी वृद्ध तपस्विनी **जमनाबाई** म्हणाल्या प्राचीनकाळीं स्त्रियांना वेदाचा अधिकार होता; त्यावेळीं त्या सुशिक्षित व विद्वान् होत्या तो काल जर आतां असता तर हल्लींच्या बिकट परिस्थितीत स्त्रियांनीं आपापल्या पतींना सर्व कार्यांत मदत केली असती. आज अज्ञानानें आम्हाला सर्व संस्कार बंद आहेत. आम्ही स्वयंपाक बनवणारी चालती बोलती यंत्रे आहोत 'कुकर' आहोत. अशी पुरुषांची कल्पना झाली आहे; पण आपण पुराणांतल्या स्त्रियांच्या पराक्रमाचीं वर्णनें वाचा. ज्या संस्कारानें सीता-सावित्रीसारख्या स्त्रिया उत्पन्न झाल्या ते संस्कार व अधिकार आमचे आम्हाला परत द्या म्हणजे सध्यांसारखी विकट स्थितीहि येणार नाहीं व परिषदा भरविणेचे कारणच पडणार नाहीं. नंतर **नारायण रेवती मिस्त्री** यांनीं पूर्वींप्रमाणें संस्कृत ग्रंथाधारें शिल्पशास्त्र शिकविण्याकरितां कलानिपुण अध्यापकांची सोय आमच्या जातीकरितां श्रीनीं करावी असें सांगितलें. यानंतर वक्ते बरेच असल्यानें व वेळ फार थोडा राहिल्यानें पुढील वक्त्यांनीं अगदीं थोडक्यांत आपले मुद्दे सांगावे अशी अध्यक्षांनीं सर्वांस विनंति केल्यावर रा. **दिवाकर दामोदर बापट**, अमरावती, यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें सध्यांची विषम परिस्थिति पालटण्याकरितां राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता कशी आहे याचे विवेचन केलें नंतर रा. **उडपीकर** इगतपुरी यांनीं कांहीं हिंदींत व कांहीं अशुद्ध मराठींत भाषण करून जातिभेद नाहींसा झाल्याशिवाय उन्नति होणार नाहीं असें सांगितलें नंतर संध्यामंदिर संस्थेचे रा. **अण्णाशास्त्री नगरकर** यांनीं धर्मगुरूस सत्तेची आवश्यकता कां आहे याबद्दल सर्व साधकबाधक प्रमाणें देऊन फारच मुद्देसूद रीतीनें सिद्ध करून दाखविलें. नंतर **काशिनाथ रामचंद्र उंबरकर** यांचें चातुर्वर्ण्याची आवश्यकता यावर भाषण होऊन सव गोलंकार करून हिंदुस्थानास धार्मिक बाबतींत युरोप करूं इच्छिणारांचें चांगलेच खंडण केले. चातुर्वर्ण्यामुळेंच आज आपण जगलों आहोंत नाहीं तर युरोपांतील बोल्शेविझमसारखें सामाजिक रोग आपल्यांत उत्पन्न होऊन आपण केव्हांच रसातळाला गेलों असतों हें सिद्ध करून दाखविलें. नंतर वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध वे. शा. सं. **लक्ष्मणशास्त्री चंद्रात्रेय**

त्यांनीं आपले विचार पुढें मांडतांना स्वीकारलेले उदारतेचें धोरण, तडजो-डीची आतुरता, सर्वत्र एकोपा व्हावा या विषयींची तीव्र इच्छा वगैरे उदात्त विचार त्यांचें भाषणांत जागोजाग आढळून आले. त्यांचें भाषण पूर्वीच्या निस्पृह व निस्वार्थी ब्राह्मणाला साजेसेच झालें. ब्राह्मण शब्दाची व्याख्या सांगून अनुपम स्वार्थत्यागाचें रहस्य त्यांनीं सभेस ऐकविलें. नव्याजुन्यांचा उत्कृष्ट सांधा त्यांनीं सांधला. वितंडवाद करून हेकेखोरपणा वाढविणें हा तामसगुण आहे, परिस्थिति न ओळखतां हटवादी धोरण स्वीकारणारें लोक तामसी आहेत, खरा ब्राह्मण देशकालवर्तमान पाहूनच वागेल व पूर्वीचें स्मृति-कार त्याप्रमाणें वागले आहेत. कालमानाप्रमाणें स्मृति व शास्त्र बदलावें लागते, ते जर आम्हीं आजवर बदलले नसतें तर आम्हीं ब्राह्मणच राहिलो नसतो. ब्राह्मण राहायचें असेल तर वृत्ति संकुचित करूं नका. शमदमतपाचा आश्रय करा, मन कोते कराल तर ब्राह्मण्यापासून च्युत व्हाल. लाखों संकटें आलीं हजारों अनाचार वाढले तरीं ब्राह्मण्य बुडणार नाही. ते चिरकालिक आहे. तुम्ही तामसी व्हाल तर दुसरे लोक ब्रह्मपदाला पोंचतील म्हणून परं-परा सोडूं नका ब्राह्मण्याचा अभिमान बाळगून शहाणें व्हा व इतरांनाहि ज्ञानी करा. ब्रह्मसूर्य तुमच्या ( ब्राह्मणाच्या ) कृतीनें मलिन झाला आहे त्यामुळें इतर लोक अंधारांत वाट चुकून चांचपडत एकमेकांना धक्के देत आहेत तुम्हीं सत्वगुणानें युक्त व्हा, मन विश्वायेवढें मोठें करा व आपल्या तपस्ते-जानें प्रकाशमान व्हा मग सर्वच आपापल्या मार्गानें चालू होतील. याप्रमाणें त्यांचें भाषण होत असतां सर्व सभा चित्राप्रमाणें तटस्थ होऊन एकाग्र-मनानें त्यांचें भाषण ऐकत होती. नंतर रा. **नारायण रामचंद्र करमर-कर** यांनीं स्वतः तयार केलेलें पद्यमय भाषण अभिनयासह वाचून दाखविलें. पुढें दुपारीं दोन वाजतां सभेस सुरुवात होणार असून त्या वेळीं कोल्हा-पुरच्या रा. ब. जाधव वगैरेंचीं भाषणें होणार असल्याचें चिटणीसांनीं जाहीर केल्यावर तिसऱ्या दिवसाचें सकाळचें काम आटोपलें.

---

# दिवस तिसरा, दुपार

आज कोल्हापूरच्या मंडळींचीं भाषणें होणार असें सकाळींच चिटणीसांनीं जाहीर केल्यामुळें प्रेक्षकांत विशेष उत्सुकता दिसून येत होती. तसेंच कांग्रेसहून बेळगांवचे श्री. गंगाधरराव देशपांडे, साताराचे श्री. दादासाहेब करंदीकर, कल्याणचे श्री. फडके, महाजन वगैरे मंडळी मुद्दाम नाशिकला उतरल्याचें समजल्यावरून सभास्थानीं प्रेक्षकांचा एकच तोबा उडून राहिला होता. स्वयंसेवकांनीं सर्वांना व्यवस्थितपणें बसविल्यावर कांहीं वेळानें स्वागताध्यक्षासह अध्यक्षांची स्वारी दाखल होतांच एकदम प्रचंड जयजयकार झाला. कार्यक्रमाला सुरुवात करण्यापूर्वी अध्यक्ष म्हणाले:-आज आपणांला कांहीं विरुद्ध मतवाद्यांची भाषणें ऐकावीं लागणार आहेत. त्या वेळीं आपण अत्यंत शांतपणानें वागलें पाहिजे. त्यांचें म्हणणें-विरुद्धपक्षाचे म्हणणें-ऐकून घेऊन कांहीं तडजोड करण्याकरितांच आपण येथें जमलों आहोंत; आमच्या आमंत्रणाला मान देऊन हे थोर गृहस्थ मुद्दाम येथें आले हें आमच्या कार्यांत एक सुचिन्हच आहे. दुरून विरोध दाखविणारे भिन्न मताचें लोक आज आमच्या जवळ येऊन निर्भीड चर्चा करूं लागलें; उद्यां शंका निरसन होईल, पर्वा आम्हीं सर्वजण पूर्वींप्रमाणें एक होऊं. पारमार्थिक भाषेंत सांगावयाचें म्हणजे आज समीपता व पुढें क्रमाक्रमानें सलोकता, सरूपता व सायुज्यता असें खास होणार, हें आपण पक्कें लक्षांत ठेवावें. आजचे व्याख्यातें रा. जाधव हे चांगले विद्वान आहेत त्यांचा व माझा चांगला परिचय आहे तरी आपण त्यांचे विचार ऐकून घ्यावें. अशी विनंति करून रा. ब. जाधवांनीं आपले विचार पुढें मांडावे म्हणून श्रींनीं आज्ञा केली. तेव्हां रा. ब. **भास्कर राव जाधव** म्हणाले. माझा विषय पीठाची अनवश्यकता हा आहे. शंकराचार्यपीठ ही संस्था मनुकालीं नव्हती, ती आद्य शंकराचार्यांनंतर अस्तित्वांत आली या आचार्यांचेकडे धर्माचे निग्रहानुग्रह करण्याचे काम नव्हतें. तें काम पेशवाईनंतर यांनीं आपणांकडे घेतलें. तोंपर्यंत धर्माचा सर्व व्यवहार राजा पहात असें, पूर्वी हे आचार्य राजाच्या पदरीं वेदादि विद्या शिकविण्याकरितां

879



आहेत. असत. एका राजानें आपले उपाध्येपण शंकराचार्यांकडे दिले होतें असें म्हणतात. ऐतिहासिक कालांतसुद्धां या पीठांचा कोठेंच मागमूस लागत नाहीं धर्मसंबंधींच्या भानगडींचें निकाल राजानींच दिले आहेत. या पीठांना श्रुतिस्मृतींत आधार नाही. धार्मिक अगर सामाजिक उन्नतीसाठीं शंकराचार्यांची जरूर नाहीं, वगैरे मुद्यांवर त्यांनीं वेगवेगळ्या कालांतील उदाहरणें दाखवून ही पीठें रक्षण करणेची असतील तर त्यांची आंखणी विद्यार्थीगृहाच्या धर्तीवर करून त्यावर लायक माणसाची नेमणूक होणें इष्ट आहे. असें सांगून आपलें भाषण संपविलें. नंतर करवीर पीठाचें सर्वाधिकारी रा. **गुंडोपंत पिशवीकर** हें म्हणाले, हिंदु हा शब्द कोणत्याहि ग्रंथांत नाहीं आणि ही तर हिंदु धर्म–परिषद आहे. असो. पूर्वींच्या काळीं धर्मविचारासाठीं ब्राह्मणांच्या परिषदा भरत पण सुधारणा करण्याचे काम त्यांचेकडे नसे. समाजोन्नति करण्याचे काम समाजाकडेच आहे ब्राह्मण आचारवान राहिले असते तर त्यांना सूचना करायचा अधिकार होता; पण सध्यां तोहि गेला आहे. प्रायश्चितादिविधि ज्याचा त्यानें करावा वगैरे गोष्टींचें पुनः पुनः चर्वण करून गुंडोपंतानीं आपलें भाषण संपविलें. मध्यंतरी प्रेक्षक वर्गांत फारच चलबिचल होऊन गोंगाट झाल्यामुळें अध्यक्षांनीं उठून सर्वांस शांत राहण्याची आज्ञा करतांच सर्व समाज पुनरपि सावधानतेनें ऐकूं लागला. नंतर रा. **गणपतराव कदम** यानीं युरोपियन पद्धतीवर समाज रचना केल्यानें आज कसे फायदे होतील, विषमता मोडून सर्वत्र एकोपा व समता झाल्यानें राष्ट्रवर्धन होऊन देशसमृद्ध होईल, तसेंच कोणाचेहि सामाजिक वर्चस्व राहणार नाहीं वगैरे मुद्दे सांगून फार वेळ लांबलेले आपण भाषण संपविले नंतर मराठावर्गाचे पुढारी पुण्याचे रा. **नारायणराव गुंजाळ** टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत बोलावयास उठले, ते म्हणाले कांहीं विघ्नसंतोषी लोकांच्या चिथावणीवरून निवळ द्वेषानें आपल्यातील कोत्या बुद्धीचे कांहीं लोक कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या नात्यानें सध्यां धार्मिक व राजकीय प्रगतीस विनाकारण अडथळे आणीत आहेत, दुष्ट व दुबळ्या लोकांना दुसऱ्याचा उत्कर्ष पहावेनासा झाला म्हणजे आजच्यासारखी स्थिति उत्पन्न होते. हे असल्या प्रकृतीचे लोक द्वेषाच्या भरांत आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्यासहि मागें पुढें पहात नाहींत.

याला नजिकचें उदाहरण म्हणजे आजकाल बोकाळलेला सत्यशोधक समाज हा होय. सत्यशोधनाच्या नांवाखालीं हे लोक वाटेल ती असत्य विधानें करतात, पंढरीच्या विठोबाच्या भागवत धर्माची टवाळी करतात (धिक्कार दर्शक गलबला) इतकेंच नव्हें तर स्मृति पुराणांना सुद्धां हे मानीत नाहीत (पुनः धिक्कार) अशा प्रकारचे हे लोक नास्तिक मतवादी पाखांडी आहेत. धार्मिक बाबींत मत देण्याचा यांना अधिकार नाहीं कारण हे लोक हिंदु देवतांना हिंदु आचारविचारांना तुच्छ मानतात व हिंदुधर्म नको असें अप्रत्यक्षपणें सांगतात. मी आपणांस असें सांगतो कीं हे असले समाजकंटक आपण शक्य तितकें दूर लोटले पाहिजेत, यांच्यावर बहिष्कार घातला पाहिजे. सभ्य गृहस्थहो, जरा आपणांस सामाजिक अगर धार्मिक सुधारणा करणें असेल तर प्रथमतः यांच्यापासून सुरवात करा. या अपस्वार्थी व कुपमरकरे लोकांपासून तुटकपणानें वागा धर्माची अगर समाजाची अथवा देशाची जेवढी धूळधाण उडेल तेवढी यांनं पाहिजे आहे, हे समाज विध्वंसक आहेत, या मताचा नायनाट केल्याशिवाय जातीजातींतील तंटे मोडणार नाहींत. हे नव्हते तोपर्यंत सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या सर्व जाती एकोप्यानें राहात होत्या. पंढरपूरचे वाळवंटावर सर्व हरिदास संत महंत उच्चनीच भेदभाव विसरून समरस झालेले आपणांस आजहि पहावयास सांपडेल. उदारपणा स्वीकारून एकोप्यानें राहणें हेंच आपल्या धर्माचें बीज आहे. आपण खोटा भेदभाव विसरून जाऊन भूलोकीच्या वैकुंठीचे स्वराज्य मिळविण्याकरितां एक दिलानें अहर्निश खटपट करूं या, पांडुरंग आपणांस खात्रीनें यश देईल. (टाळयांचा प्रचंड गजर) नंतर पंढरपूरचे रा. **चिप्र शास्त्री** यांनी-खरे ब्राह्मण अथवा इतर वर्ण कांहींहि आपत्ति कोसळल्या तरी तें जसें आहेत तसेंच राहतील सर्व जग ख्रिस्ती झालें तरी आपण आहों असेंच राहूं असें सांगितलें. पुढें रा. उपाध्ये वकील व अभ्यंकर वकील यांनी समयोचित भाषणें केल्यावर प्राज्ञ पाठशाळेचे प्रचारक रा. महादेव शास्त्री दिवेकर यांनीं आपली योजना सभेपुढें मांडली ती अशी—

१ हिंदु आणि हिंदु-धर्माचें लक्षण लोकमान्य टिळकांनीं केलेलें चित्रमय जगत् जानेवारी १९१५ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे तें स्वीकारावें. या लक्षणावर उत्तरहिंदुस्थानांतील पंडितांनीं आक्षेप घेतले. त्यांचें असें म्हणणें

पडलें कीं, जैनसुद्धां हिंदू आहेत, हिंसाविधायक वेदभाग सोडून बाकी सर्व ते मान्य करितात; उत्तरहिंदुस्थानामध्यें जैनांचे व हिंदूंचे रोटी बेटीव्यवहार होतात; श्वेतांबर जैन गोपाळ—कृष्णाचे उपासक आहेत; काठेवाडांतील बहुतेक जैन द्वारकाधीश भक्त असतात. तात्पर्य, जैन व हिंदु यांच्या आचारविचारामध्यें पुष्कळ साम्य आहे. त्यांचा दायविभागहि हिंदू लोकांप्रमाणें होतो, एवंच जैनाश्चापि हिंदवः असेंच म्हटलें पाहिजे. यास्तव हिंदुधर्माच्या व्याख्येनें त्यांची अव्याप्ति होऊं नये अशी व्याख्या करावी.

२ सर्व हिंदू स्त्री पुरुषांना कांहीं सामान्य संस्कार असावेत आणि ते जातकर्म, उपनयन, विवाह व अंत्येष्टी हे असावेत. हे संस्कार श्रौतस्मार्त पुराणमंत्रांनीं यथाधिकार असे करावेत. उपनयन म्हणजे विद्येला आरंभ करण्यापूर्वीचा फक्त अर्ध्या तासांत होणारा केवळ सौत्रसंस्कार होय व तो तसा असावा.

३ सर्व हिंदू स्त्रीपुरुषाच रोजचें सामान्य धार्मिक आन्हिक असावें, त्यामध्यें स्नान, संध्यावंदन अगर ईश्वरोपासना आणि उपास्य दैवतदर्शन एवढ्यांचा अवश्य समावेश व्हावा.

४ सर्व हिंदूंना सर्वमान्य अशीं दोन दैवतें आहेत, एक पंढरिनाथ अगर श्रीकृष्ण आणि हनुमंत. या देवतांचे उत्सव प्रत्येक गांवांत सार्वजनिक व्हावेत. अर्थात वरील देवतांचीं देवालयें हीं सार्वजनिक असावीं. या देवतांचें दर्शन सर्वांनीं एका विशिष्ट मर्यादेपासून अंतरावरून घ्यावें. गाभाऱ्यांत पूजाऱ्याखेरीज कोणाचाहि प्रवेश नसावा. अर्चन, पादसेवा करण्यास प्रत्येकाच्या घरीं किंवा त्या त्या ज्ञातीचीं देवालयें असावीं. त्यांत इतरांनीं ढवळाढवळ करूं नये.

५ सर्व हिंदू स्त्रियांनी पाळलीं पाहिजेत अशीं फक्त दोन व्रतें—वटसावित्री आणि हरितालिका हीं असावींत.

६ सर्व हिंदू स्त्रीपुरुषांना एका समान भूमीवर येतां येण्यासारखे फक्त दोनच सण असावेत. हे सण प्रत्येक हिंदूनें पाळलेच पाहिजेत. ते सण म्हणजे वर्षप्रतिपदा व विजयादशमी हे होत.

७ त्रैवर्णिकांना वेदाचा अधिकार आहे. 'अर्धं भार्या मनुष्यस्य' या न्यायानें स्त्रियांना हा अधिकार येतो काय ? स्त्रियांना वेदाधिकार नाहीं, त्यांनीं

वेद ऐकूं नयेत हें मत युक्त नाहीं. कारण अग्निहोत्र्यांच्या स्त्रिया वेदमंत्र म्हणतात आणि इतरांच्या निदान ऐकतात तरी खास. तेव्हां परिस्थिति लक्षांत घेऊन स्त्रियांच्या पराक्रमाचा, बुद्धिसामर्थ्याचा, आणि स्त्रीधर्माचा जेवढा भाग असेल तो वेद, उपनिषदें, भारत, रामायण, भागवत यांतून निराळा काढून तो त्यांना मुद्दाम शिकविण्यांत यावा.

८ ' कलावाद्यन्तयोः स्थितिः ' या न्यायानें क्षत्रिय, वैश्य गेले काय ? गेले म्हणावे तर उत्तर–हिंदुस्थानांत अविच्छिन्न परंपरेचीं क्षत्रिय व वैश्य घराणीं अद्यापि आढळतात. समाजामध्यें चातुर्वर्ण्य पाहिजे कीं नको ? पाहिजे असेल तर त्याचें पुनरुज्जीवन करावें व नसेल तर स्थापन करावें. महाराष्ट्रांत क्षत्रिय कुलावतंस कांहीं घराणीं आहेत काय ? महाराष्ट्रांतील मराठ्यामध्यें अस्सल मराठे व लेकवळे असे दोन भेद आहेत यांत वाद नाहीं. जे अस्सल मराठे मानले असतील त्यांच्या घराण्याचा इतिहास पहावा, संशोधन करावें व तशीं घराणीं किती आहेत हें पाहून हिंदुस्थानच्या सर्व क्षत्रियांची एक सभा बोलवावी. त्या सभेमध्यें जे स्वतःस क्षत्रिय म्हणवितात त्यांच्या अधिकारांचा विचार करून त्या सभेनें क्षत्रियत्वाबद्दल मान्यता द्यावी व ती सर्वांनीं कबूल करावी. याप्रमाणें झाल्यास वेदोक्ताचा व ब्राह्मण–ब्राम्हणेतरांचा तंटा मिटेल.

९ अस्पृश्यासंबंधानें पाण्याचें वगैरे होणारे अन्याय लवकर दूर करावेत, स्वच्छता व अस्वच्छता हीं जगांत जोंपर्यंत राहील तोंपर्यंत अस्पृश्यता ही रहाणारच; तथापि

> दीर्घकाष्ठे शिलापृष्ठे नौकायामापणे तथा ।
> देवागारे तथा टाळे स्पर्शदोषो न विद्यते ॥

इत्यादि शास्त्रवाक्याचा हेतु पाहून उत्सवामध्यें, हरिकीर्तनामध्यें, सार्वजनिक सभादि कार्यांत ' स्पर्शदोषो न विद्यते ' असें म्हटल्यास काय हरकत आहे ? आपण सर्व अस्पृश्य एकच आहेत असे समजतो. परंतु ढोर म्हारांना शिवत नाहीं, महार मांगांना शिवत नाहीं. हें बदलण्याला शिक्षण म्हणजे, रात्रींच्या शाळा वगैरे आणि ज्ञातिशिष्टांच्या सभा हींच तूर्त त्यांच्या उन्नतीचीं साधनें होत. प्राचीन इतिहासावरून आर्य म्हणजे त्रैवर्णिक; आर्यानार्य म्हणजे शूद्र व केवळ अनार्य म्हणजे अस्पृश्य असें दिसतें. आर्यांनीं आपल्या सहवासांत

अनार्यांना राहूं दिलें व त्यांची उन्नति केली ही गोष्ट सत्य आहे. परंतु सहा हजार वर्षांच्या सहवासानंतर आर्यांनीं अनार्यांशीं म्हणजे आजच्या अस्पृश्य वर्गांशीं शूद्र वर्गाप्रमाणें वागण्यांत खरें भूषण आहे.

१० चातुर्वर्ण्य हें जन्मत: तर पाहिजेच, पण गुणकर्मांचाहि विचार व्हावा. जन्मत: चातुर्वर्ण्य नसेल तर अस्सलपणा जाईल व केवळ गुणकर्मांचा विचार केला तर त्यांचा समावेश कशामध्यें करावयाचा ही पंचाईत पडेल. स्वभावसहज कर्मावरून किंवा स्वभावनियत कर्मावरून आर्यांनीं बाह्यांचा त्रैवर्णिकामध्यें जातिद्वारां समावेश केल्याचीं उदाहरणें ठळक अशीं एकदोन तरी देतां येतील. तूर्त चातुर्वर्ण्य हें ध्येय ठेवून हळूहळू सर्व पोटजाति मोडण्याचा पुढाऱ्यांनीं प्रयत्न करावा व पोटजातींत रोटीबेटी-व्यवहार सर्रास सुरू करावा.

११ शास्त्राधार नसतां " शास्त्रात् रूढिर्बलीयसी " म्हणून ज्या रूढी पडत आहेत त्या बंद व्हाव्या. कन्याविक्रय आणि वरविक्रय ( हुंडा ) ह्या रूढींना कोणत्या शास्त्रांत आधार आहे ? पुनर्विवाहाची रूढि पाडावी म्हणून कायदा पास करूनहि यश येत नाहीं असें दिसेल. ज्या लोकांत पाटाची चाल आहे त्यांना कमी लेखण्यांत येतें. एवंच, आर्यस्त्रियांना पुनर्विवाह हें पाप असेंच वाटतें. पुनर्विवाहाचा प्रश्न ज्यामुळें उपस्थित होतो तें कारण नाहींसें करण्याकरितां प्रौढ विवाहाचा पुरस्कार व पुरुषांच्या पुनर्विवाहाचा निषेध केला पाहिजे. स्मार्त धर्माप्रमाणें पुरुषांचा पुनर्विवाह निषिद्ध आहे म्हणून वधूवरांच्या वयोमर्यादा कमींत कमी १२ व जास्तींत जास्त ३५ या असाव्या.

१२ आर्यसंस्कृतीवर आज जशा प्रकारचा हल्ला होत आहे तसा आजवर आला नव्हता. ' जसास तसें ' किंवा ' शठं प्रति शाठ्यं ' या न्यायानें फसगतीनें-अज्ञानानें-जे मिशनऱ्यांच्या कळपांत जात असतील त्यांना परत घेण्याचा उपाय केला पाहिजे जुलमानें मुसलमान झालेल्या मराठ्यांना त्या वेळच्या राजांनीं पुन: हिंदू केलें अशी इतिहास साक्ष देत आहे नुसतें पाणी पिऊन किंवा भाकरींत बिस्कुटाचा तुकडा होता म्हणून आम्ही बाटलों या भावना नाहींशा करून तुला गिळून सुद्धां मी हिंदू राहतो असें म्हणण्याचें धैर्य लोकांत आलें पाहिजे. श्रींनीं प्रथमत: गेल्या तीन वर्षांत जे पतित झाले आहेत त्यांना प्रायश्चित्त देऊन हिंदू करावें. त्यांची जात ' पतित हिंदू ' हीच

असावी. कालानें तेहि वर येतील. शंकराचार्य एकदां हें कर्तव्य करूं लागले कीं मिशनऱ्यांच्या नाड्या थंडावतील.

आचार्यांच्या पीठाची योजना कशी असावी याबद्दल लोकशिक्षण, आचार्य, आणि आत्मोद्धार या मासिकांत चर्चा झाली आहे ती श्रींनीं पहावी व तसें करावें. कांहीं गोष्टी फारच जिव्हाळ्याच्या आहेत असें मला वाटतें. देशबांधवांशीं सहकार्य व सरकारशीं असहकारिता करण्याचा हा काळ आहे हें लक्षांत घेऊन महाराष्ट्रबांधव वरील प्रश्नांचा आस्थेनें विचार करितील अशी आशा आहे.

नंतर अध्यक्षांनीं वेळ बराच झाल्याचें व परिषदेंतील चर्चा अंदाजाबाहेर वाढल्याचें सांगून कांहीं राहिलेल्या वक्त्यांचीं भाषणें ऐकून घेण्याकरितां परिषद उद्यांचा दिवस भरवावीं लागत आहे सबब सर्व दूरदूरच्या पाहुण्यांनीं आतांपर्यंत जशी तसदी घेतली तशीच उद्यां पुनः घेऊन चालकांस ऋणी करावें असें सांगितलें. नंतर रा. गं. वि. **गोखले** यांनीं राहिलेल्या वक्त्यांचीं व स्त्रियांचीं नांवें वाचून दाखविलीं व उद्यां सकाळच्या एका बैठकींतच सर्व कार्यक्रम समाप्त होणार असल्याचे सांगितलें. याप्रमाणें भाषणें झाल्यावर तिसऱ्या दिवसांचा कार्यक्रम आटोपला.

---

# दिवस चौथा

## ता. १३।९।२०

परिषदेच्या चारहि दिवसांचा समारोप खुद्द श्रीशंकराचार्यांच्या तोंडून होणार, आजपर्यंत निरनिराळ्या वक्त्यांनीं आपापल्या भाषणांतून सभेपुढें मांडलेल्या सूचनांना श्रींकडून उत्तर मिळणार अगर कांहीं तरी निश्चित अशी योजना ऐकावयास मिळणार या भावनेनें ठिकठिकाणाहून पुष्कळ लोक आले होते. सभागृहांत बिलकूल जागा नसल्यानें प्रेक्षकांची तिकिट विक्री बंद करावी लागली; तरीसुद्धां लोक मोठ्या उल्हासानें दाराबाहेर उभे राहून ऐकत होते. कार्यक्रमास बरोबर आठ वाजतां सुरवात झाली. परिषदेसाठीं अगदीं प्रथम

पासून ज्या स्त्रियांनीं खटपट केली, व पुढें प्रत्यक्ष कार्यांत ज्यांनीं भाग घेतला आहे अशा स्त्रियांचे विचार आपण ऐकून घ्यावेत अशी श्रोत्यांस अध्यक्षांनीं विनंति केल्यावर स्त्री प्रतिनिधींपैकीं कु. **दुर्गाबाई खर्डीकर** यांना भाषण करण्यास श्रींनीं अनुमति दिली:—कुमारी दुर्गाबाई यांनीं आपलें भाषण संस्कृतमध्यें लिहिलें असल्यानें सर्वसाधारण लोकांस तें कळणें अशक्य होतें म्हणून त्यांनीं त्याचा सारांश मराठींत सांगितला व स्त्रियांचे बाबतींत होणारे अन्याय दूर करण्याचे प्रयत्न मठाकडून होणें जरूर आहे. तसेंच स्त्रियांना सर्व प्रकारचें उपयुक्त शिक्षणहि देण्यांत यावे वगैरे सांगून त्यांनीं आपला विद्वत्ता-पूर्ण निबंध श्रीचरणीं ठेविला. ( हा निबंध संस्कृत मध्येंच परिशिष्टामध्यें छापला आहे. ) पुढें कुमारी **दुर्गाबाई नेने** यांनींहि थोडेसें भाषण करून बाकीचे सारे लेखी भाषण परिषदेपुढें सादर केलें.

नंतर अमरावतीच्या श्री. **बारूबाई कागलकर**, श्री सौ. **राधाबाई जहागीरदार** वगैरे स्त्रियांनीं धीटपणें आपले विचार सभेसमोर मांडून आर्य स्त्रियांची विद्वत्ता व परंपरेचा अभिमान लोकांच्या चांगलाच नजरेस आणला.मध्यं-तरीं **दिवाणबहादूर व्ही. पी. माधवराव** व सौ. **अवंतिकाबाई गोखले** यांचीं सहानुभूतिवर आलेलीं पत्रें चिटणीसांनीं वाचून दाखविल्यावर नाशि-कचे रहिवाशी रा. **भागाप्पा विठोबाप्पा गुळवे** यांनीं आपल्या भाष-णांत सांगितले कीं, जातिजातींत तंटा माजणें हें केव्हांहि हानिकारकच आहे. तशांत देवाच्या पुजेसाठीं वादविवाद होऊन तें प्रकरण न्याय कोर्टापर्यंत येणें अगदीं गैर आहे. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरांच्या पूजेसंबंधीं ब्राम्हणांत व लिंगायतांत भांडणें होत आहेत; त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं आहे, पुष्कळ ठिकाणीं लिंगायत देवाची पूजा करतात. पण त्र्यंबकेश्वरीं आम्हांस मज्जाव आहे. आम्हांस चातुर्वर्ण्य मान्य आहे. चारी आश्रम मान्य आहेत आम्ही अहिंसाप्रधान आहोंत इतकेंच नव्हे तर लिंगायतास त्र्यंबकेश्वर देवाची पूजा करण्यास हरकत नाहीं असे पेशव्यांच्या वेळचे लेख असून सुद्धां केवळ दुरभिमानानें व अज्ञानानें आम्हांवर जुलुम होत आहे तो श्रींनीं स्वतः एक आज्ञापत्र काढून दूर करावा. पुढें पंढरपूरचे **काशिनाथशास्त्री पराडकर** यांनीं जगद्गुरूमधील कांहीं जुना वाद उकरून काढून वकिली डावपेंचाचे व खाचाखोचीचें भाषण

करून व्यक्तीवर शितोडे उडविण्याचा प्रयत्न केला, नंतर पुण्याचे पं. **रघुनाथशास्त्री ज्योतिषी** यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, " शुद्ध पंचांग प्रचारांत आणून आर्य ज्योतिषशास्त्राची उच्च प्रगति घडवून आणून हें शास्त्र पाश्चात्यांच्या तोडीचें करणें ही गोष्ट लो. टिळक फार-महत्त्वाची समजत होते व त्यांनीं आरंभिलेलें हें कार्य तडीस नेण्याची जबाबदारी श्रीजगद्गुरुकडे आलेली आहे. त्यांनीं ज्योतिष परिषदेंत मान्य झालेल्या--पंचांगाचा प्रसार होण्यास शक्य ती मदत करावी. "

नाशिकचे रा. **कळवणकर** मास्तर यांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा मठातर्फे काढाव्या व त्यांतील सर्व शिक्षण धर्माच्या पायावर रचलेलें असावें असें सांगितले. नंतर रा. **गोपाळ मुरलीधर धर्मोपदेशक** यांनीं सध्यांचे कालीं धर्मरक्षण कसें होईल याचे थोडक्यांत विवेचन केलें. पुढें रा. **गणपतराव मगर** या ब्राह्मणेतर गृहस्थांनीं तात्कालिक स्फुर्तीनें श्रींचे आज्ञेनुसार भाषण केलें. ते म्हणाले, सध्यां बोकाळलेला वाद आमच्यांत नाहीं व मला खात्री वाटते कीं जोपर्यंत आपण मूड झालो नाहीं तोपर्यंत हा असला घातकी द्वेष आमच्या जातींत वाढणार नाहीं. ब्राह्मणांनीं आम्हांस अज्ञानी ठेवूं नये. आम्ही जर आडरानांत शिरूं लागलो तर जबरीनें तेथून खेंचून आणून चांगल्या मार्गाला लावावे. ते आमचे परंपरागत गुरू आहेत त्यांचे न ऐकतां जर आपण स्वैर वागूं लागलो तर वेड्याकोंकराप्रमाणें आम्ही परस्पर दुष्ट लांडग्याच्या तावडींत मात्र सांपडूं. आजचे अध्यक्ष चातुर्वर्ण्याचे स्वामी आहेत. आम्ही त्यांची लेकुरें आहोंत त्यांच्या समोर आम्ही काय बोलावें ! आमची उन्नति त्यांनीं करावी. असें सांगितल्यावर रा. **भाऊराव सांगळे** हे दुसरे ब्राह्मणेतर गृहस्थ म्हणाले, आमच्या जातीचा बाणाच आहे कीं, कुळधर्म सोडायचा नाहीं. वाडवडिलांनीं जो कित्ता घालून दिला तोच गिरविणें आपलें काम आहे. त्यांनीं कष्ट सहन करून बरेचसे कडू वाईट अनुभव घेऊन आम्हालेकरांकरितां जो आचार घालून दिला तो जर आम्ही टाकला तर वडिलांची आज्ञा मोडल्याचे पाप लागेल. आमचे कल्याण व्हावें म्हणूनच त्यांनीं नियम केले. बाप नेहेमीं मुलाच्या कल्याणाचीच गोष्ट करील आम्हाला बंड करावयास शिकविणारे लोक उपरे आहेत त्यांना जातगोत नाहीं. कुळधर्म आचार कांहींच

नाहीं अशा रीतीनें ते लांडाकोल्हा झाल्यानें इतरांसहि तसेंच होण्यास ते शिकवित आहेत तरी कोणीहि त्यांचेवर विश्वास ठेऊं नये; येवढीच माझी सर्वांस विनंति आहे. नंतर रा. **परदेशी मास्तर** यांनीहि चातुर्वर्ण्य न मोडण्याबद्दलचे आपलें मत सांगितले. **पाटणकर वकील** यांनीं सांगितलें कीं, धार्मिक सुधारणेपैकीं कांहीं क्षुल्लक बाबीसंबंधीं कांहीं लोक प्रेमभावनेनें रुसले आहेत त्यांचा रुसवा श्रींनीं मोठें मन करून काढून टाकावा. अस्पृश्यवाद, विशिष्ट मर्यादेपर्यंत पुनर्विवाह वगैरे सध्यां रूढ होत चाललेल्या गोष्टीसंबंधीं कांहीं हटवादी लोक वगळले असतां सर्वांचें एकमतच आहे अशा गोष्टी कांहीं दिवस चर्चेसाठीं ठेऊन त्याला धर्मसंमति द्यावी वगैरे सांगून त्यांनीं आपले भाषण संपविलें.

नंतर **ग. वि. केतकर** बी. ए. सेक्रेटरी श्रीहरिकीर्तनालय मुंबई, म्हणाले श्रीहरिकीर्तनालयाच्या मतें धर्मगुरूंनीं समाजांतील दुही नाहींशी करून ऐक्य प्रस्थापित करावें व तें चिरकाल टिकवण्याचा प्रयत्न करावा. याला धर्मशिक्षण हें एकच साधन व तें सरकारी शाळांतून मिळणें शक्य नाहीं. त्यासाठीं कीर्तन-प्रवचन-व्याख्यानद्वारां देशकाल परिस्थित्यनुरूप धर्मोपदेश करणारे श्रद्धावान् सुशिक्षित उपदेशक तयार करण्याच्या संस्था स्थापन केल्या पाहिजेत. या उपदेशकांनीं सर्व धर्मांस संमत अशा पातिव्रत्य, दया, क्षमा, शांति ब्रह्मचर्य, औदार्य, परोपकार, नम्रता इत्यादि सर्व सामान्य नीतितत्त्वांवर विशेष भर द्यावा. सर्वांस हें तत्व पटवावें कीं, प्रत्येकानें स्वधर्मांतील किंवा स्वपंथांतील नीतितत्त्वांप्रमाणें आचरण करावें व भेदाच्या तीव्रतेचें कारण जो परस्परांच्या उत्कर्षाबद्दलचा मत्सरभाव काढून टाकावा म्हणजे धर्मभेद व जाति भेद समाजोन्नतीस आड येत नाहींत. हें कार्य श्रीहरिकीर्तनालयानें चालविलें आहे.

नंतर रा. **अनंत रावजी कावळे** वकील सिन्नर ( नाशिक ):—यांनीं पुढील हकीकत सांगितली. " ता. १४ फेब्रुवारी १९१४ रोजीं सिन्नर येथेहि फार प्राचीन व भव्य श्रीगोंदेश्वराचें देवालय पंजाबी पलटण २० यांनीं शिरून भ्रष्ट केलें. व देवालयांतील पंचायतनाचा विध्वंस केला सिन्नर गांवच्या प्रमुखमंडळींनीं योग्य अधिकाऱ्यांच्या नजरेस ही गोष्ट तावडतोब आणली तेव्हां अधि-

कार्‍यांनीं फक्त दिलगिरी प्रदर्शित केली व आर्किऑलॉजिकल खात्याकडून खुलासा करण्यांत आला कीं, " हें देवालय प्राचीन वस्तुसंरक्षक खात्याचें ताब्यांत आहे व फोडलेल्या मूर्ती सिमेंट लावून दुरुस्त कराव्या असा ठराव झाला आहे. " त्याप्रमाणें मूर्ती जोडून ठेवल्या आहेत. परंतु हिंदूंच्या भावनेप्रमाणें फोडलेल्या मूर्तींची पुन्हां नवीन स्थापना केल्याशिवाय पवित्र होत नाहीत. व यामुळें येथील महाशिवरात्रीचें वगैरे उत्सव बंद पडलेले आहेत. तेव्हां धर्म-परिषदेनें हा प्रश्न हातीं घेऊन, मुंबईसरकाराकडून नुकसानीची योग्य ती भरपाई व नवीन मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यास होणारा खर्च भरून मिळेल अशी व्यवस्था करावी. "

[ या बाबतींत सरकारशीं झालेला सर्व पत्रव्यवहार श्री. कावळे यांनीं परिषदेपुढें मांडला. ]

पुढें रा. **तुकाराम बाबूराव काळे** यांनीं अस्पृश्यता काढून टाकावी म्हणून कळकळीनें सांगितलें.

नंतर सुप्रसिद्ध वकील **वासुदेव बापूजी अकूत** सर्वांचे आभार मानावयास उठले. ते म्हणाले लोकमान्य गेल्यामुळें परिषद होती किंवा नाही अशी शंका मध्यंतरी उत्पन्न झाली होती. पण श्रींनीं आम्हां नाशिककरांस उत्तेजन दिल्यामुळें व आपण सर्व जणांनीं आमच्या विनंतीस मान देऊन येथपर्यंत येण्याचें व परिषदेस प्रत्यक्ष मदत करण्याचें श्रेय घेतल्यामुळें व श्रींसारखे अध्यक्ष लाभल्यामुळे परिषद यशस्वी झाली आहे. श्रींचा मुक्काम नाशिक येथें पडल्यापासून रा. **महाबळ, खुशालसिंग, महादेवराव गाडगीळ** वगैरे लोकांनीं आम्हां नाशिककरांच्या तर्फेनें श्रींची योग्य बरदास्त ठेवली व सर्व प्रकारची झीज सोसून ही परिषद पार पाडली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. तसेंच येथील शाळेतील मास्तर मंडळींनीं परिषदेत फारच परिश्रमपूर्वक कामें केलीं आहेत. **बॉयस्काउट**मधील स्वयंसेवकांनीं अत्यंत हौसेनें सभागृहाचा योग्य बंदोबस्त ठेवल्यामुळें कोणाचीहि गैरसोय झाली नाहीं. थिएटरचे मालक रा. **शंकर बाळशेट** यांनीं मोठ्या आनंदानें परिषदेसाठीं थिएटर देण्याचें कबूल केल्यामुळें व रा. **धारणकर पेंटर** यांनीं थिएटर-संबंधीं इतर व्यवस्था केल्यामुळें आपणां सर्वांस प्रशस्त व सुशोभित अशी

जागा व आसनें मिळाली याबद्दल आपण सर्वच जण त्यांचे ऋणी आहों. याशिवाय नाशिकच्या व इतर गांवच्या धर्माभिमानी लोकांनीं भरपूर द्रव्य-सहाय्य केले त्यांचे उपकार कोरड्या आभारानें थोडेच फिटणार आहेत ? आणखी किती तरी थोरथोर गृहस्थ आहेत त्यांचे सहाय्य इतकें अमोलिक आहे कीं, त्यांचा नामनिर्देश करायलासुद्धां मी लायक नाहीं. कोणी मोटारी देऊन कोणी आपला वाडा वापरण्यास देऊन कोणी कांहीं, कोणी कांहीं, अनंत लोकांनीं अनंत हस्तांनीं मदत केली म्हणूनच परिषदेचे हें दृश्य स्वरूप आपणाला दिसले आहे. रा. ब. **बापुसाहेब दातार** यांनीं कार्यकारी मंडळाचें अध्यक्षत्व पत्करून आमच्या शिरावरील जोखीम आपणांकडे घेतली व आम्हांस चिंतामुक्त केलें. त्याप्रमाणें पुण्याचे रा. **गंगाधरराव गोखले** यांनीं मुद्दाम पुण्याहून २ महिनें अगोदर येऊन सर्वच बाबतींत उत्साहानें मदत केली, किंबहुना सर्वच कामें त्यांनीं रात्रीं बेरात्रीं जागत बसून उरकली त्यामुळें परिषदेचा मार्ग अगदींच खुला झाला व त्या मार्गानें बिनघोकपणें चालत आज आपण येथपर्यंत येऊन पोंचलो आहो. मध्यंतरीं आपणा सर्वांच्या श्रमपरिहारार्थ येथील म्युनिसिपालीटी, ब्रह्मानंद थिएटरचें मालक, केतकर टौनहॉलचे चालक, यशवंत व्यायामशाळा, हिंदुस्थान फिल्म कंपनीचे मॅनेजर रा. कोठेकर, वगैरे थोरथोर गृहस्थांनीं आपल्या सक्रिय सहानुभूतीची व परिश्रमाची दाट छाया आपणांवर धरली ही गोष्टहि आपण विसरतां कामा नये. व अगदीं ऐन वेळीं पुण्याचे रा. **रामकृष्ण गोपाळ भिडे** यांनी जी मदत केली त्याबद्दल आम्ही नाशिककर त्यांचे सदैव ऋणी आहो. आमच्या या खडतर मार्गांत आमच्याबरोबर अव्वलपासून अखेरपर्यंत चिकाटीनें नेट धरणाऱ्या आमच्या भगिनी सौ. पार्वतीबाई गाडगीळ कु. दुर्गाबाई नेने, वगैरेचें आपणाला कौतुक केलें पाहिजे या शिवाय ज्या ज्या संस्थांनीं आम्हाला दुरून धीराचें निरोप पाठविले त्या संस्थांचा नामोच्चार करणें अनवश्यक होणार नाहीं. आतां अत्यंत महत्वाचे व शेवटचें सांगणें हेंच कीं आमचे मित्र रा. रा. **बाळासाहेब वैशंपायन** यांची कामगिरी इतकी बहुमोल आहे कीं माझे शब्द त्या कामगिरीच्या पासंगालासुद्धां पुरणार नाहींत. मामुली वहिवाटीप्रमाणें नामोच्चार करून त्यांच्या उपकार ऋणांतून मुक्त होऊं म्हटलें

तर ते करणें कृतघ्नपणाचें होईल, माझ्यासारख्या निष्क्रिय माणसाच्या आटो-क्याबाहेर हें काम आहे. उत्तरोत्तर परिषदेला मिळणारें यशच त्याच्या कार्याचा गौरव करील असो. आतांपर्यंत आपण आम्हा नाशिककरांच्या घरगुती सुख-दुखाच्या गोष्टी माझ्याकडून ऐकून घेतल्यात व आमच्या सुखदुखांत आपण समरस झालांत या तुमच्या आपलेपणाबद्दल पुनः एकदां मी सर्वांचे आभार मानून जड अंतःकरणानें परत फिरतो. नंतर पुढील परिषद दादर येथें भर-वावी अशी दादरकरांतर्फे रा. नीलकंठराव कोल्हटकरांनां विनंति करून सर्व लोकांस प्रेमाचे आमंत्रण दिलें. नंतर पुण्याचे गूढविद्या संशोधक मंडळाचे सेक्रे-टरी रा. विष्णुपंत गोडबोले यांनीं पाहुण्यांची योग्य बरदास्त ठेवल्याबद्दल व परिषद यशस्वी केल्याबद्दल सर्व पाहुण्यातर्फे नाशिककरांचे आभार मानले.

---

येणेंप्रमाणें परिषदेचा कार्यक्रम पार पडल्यावर परिषदेचे अध्यक्ष श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांचे उपसंहारादाखल पुढीलप्रमाणें भाषण झालें:—

" परम कारुणिक परमेश्वराच्या कृपेनें परिषदेचें सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पडलें; परिषद यशस्वी होण्यासाठीं, स्त्री, पुरुष, बालवृद्ध, या सर्वांनीं—अंत्यजां-नींहि—अत्यंत उदारपणानें हातभार लावला; साधू सत्पुरुष यांनी प्रत्यक्ष भाग घेतला, एवंच, सर्वांनीं आस्थापूर्वक मदत केली म्हणून परिषद यशस्वी झाली. आजची परिषद केवळ चर्चात्मक असल्यामुळें, कांहीं निश्चित मत देऊं शकली नाहीं तथापि, भिन्न भिन्न मतें ऐकून ती एका मंडळापुढें ठेवून मगच त्यांचा निर्णय होणें इष्ट आहे.

परिषदेपुढें असलेल्या प्रश्नांपैकीं पहिला प्रश्न धर्मगुरूंनीं काय करावें ? हा आहे त्याबद्दल जाधव म्हणतात कीं, धर्मगुरूंनीं सामाजिक बाबतींत हातच घालूं नये, त्यावर मी असें विचारतो कीं, सामाजिक बाबतींत जर प्रत्येक व्यक्तीला हात घालतां येतो. तर ज्यांनीं केवळ लंगोटी घालून समाजासाठीं आपलें सर्व आयुष्य वेंचण्याचें ठरविलें त्यांना तो हक्क नाहीं कीं काय ? पूर्व-कालीं राजदरबारांत धर्मगुरू व राजा हे दोघेहि मिळून समाजोन्नतीचें कार्य करीत, बुद्धानंतर राजपीठ व धर्मपीठ हीं वेगळालीं स्थापलीं गेलीं, कोणतेंहि वाईट कार्य करूं देऊं नये हा राजाचा धर्म व असत्कर्मांकडे समाजाची प्रवृत्तीच

न जाऊं देणें हें धर्म गुरूंचें कर्तव्य आहे. त्या काळीं राजा हा जरी मुख्य मानला गेला असला तरी तो केवळ लोकमतानुरूप लोकसेवा करण्यासाठींच आपल्या अधिकारावर असे हें विसरतां कामा नये. कोणत्याहि वाईट कर्मा-कडे जनतेची प्रवृत्तीच होतां उपयोगी नाहीं अशा प्रकारचें काम धर्मगुरूंनीं करावयाचें असतें. वाईट असतें तें करूं नये म्हणून राजसत्ता व नेहमीं चांग-लेंच करण्याची बुद्धि व्हावी म्हणून धर्मसत्ता. एकायानें चोरी करूं नये म्हणून राजसत्ता व चोरी करण्याची प्रवृत्तीच होऊं नये म्हणून धर्मकार्य. परस्परांच्या सलोख्यानेंच कार्यसिद्धि होते. आतां परिस्थितीप्रमाणें फरक पडत असला तथापि इतिहासाची पुनरावृत्ति होत असतेंच. मराठी राजांची धर्म रक्षणाच्या कार्याला मदत झाली असली तरी मुसलमानी अंमलांत जो त्रास झाला त्यांतून हें राष्ट्र सांवरलें नाहींच.

नवीन युगाच्या कल्पनेप्रमाणें लोकसत्तेशिवाय कांहीं कार्य होणार नाहीं असें ठरलें, व त्यामुळें ही परिषद भरवावी लागली. माझे उद्दिष्ट हेतू सफल करण्यासाठीं मी आपल्या मदतीनें शिकस्त करीन व त्यानंतरहि माझ्या हातून कांहींच कार्य होत नाहीं असें आढळलें तर मी राष्ट्राच्या उन्नतीसाठीं दुसरें कोणतेंहि कार्य हातीं घेईन. लोकांस माझें कार्य पसंत असेल तर मी लोकांचा आहे. लोकांच्या इच्छेविरुद्ध मी कांहींच कार्य करूं इच्छित नाहीं. लोकांस या परिषदेची आवश्यकता भासते त्यावरूनच तिची उपयुक्तता लक्षांत येते. परिषदेचें कार्य आज जरी प्रत्यक्ष पुढें नसलें तरी तिच्या कार्याचा व्याप पुढें मात्र खचित दृष्टीस पडेल. परिषदेपुढें आलेल्या मतांत तीन प्रकारचीं मतें पुढें आलीं,

१ जुनें असावें असें म्हणणारा एक वर्ग—

२ नवें असावें असें म्हणणारा दुसरा वर्ग—

३ नव्या जुन्यांचें मिश्रण असावें असें म्हणणारा तिसरा वर्ग.

परिषदेनें कशाबद्दलहि निश्चित निर्णय दिला नसला तरीं आज वाद कशाबद्दल हें समजलें. भांडण कशाबद्दल आहे हें समजलें कीं, भांडणच मिटलें म्हणून समजावें. परस्परांची स्थिति न समजल्यामुळें भांडण होतें व भांडणांतील समन्वय करणाराला सर्वांची स्थिति समजावी लागते. वरील वर्गांपैकीं विरोध

फक्त १ व २ या वर्गांतच आहे. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जग परिवर्तनशील आहे. लहान मुलगा मोठा मनुष्य झाला म्हणजे त्याच्यांत न ओळखण्यासारखा फरक होतो. परंतु हा जरी फरक असला तरी, ज्याचा तोच तो असतो हें ओळखलें पाहिजे. जुनें व नवें हें दोन्ही शब्द सापेक्ष आहेत.

एकांगी कल्पनेच्या माणसांचें पुष्कळ हल्ले परिषदेवर होत आहेत. व परिषदेच्या कार्यक्रमांत विरुद्ध मताच्या मंडळीस जास्त वेळ दिला याचें कारण त्यांचें म्हणणें ऐकून घेणें हें इष्ट असतें. समोर येऊन जो आपलें म्हणणें स्पष्टपणें मांडील त्याला तशी सवड देणें आवश्यक आहे परंतु त्याबरोबर कांहींनीं हेंहि लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें कीं ही सभा पांडित्य प्रदर्शनाची सभा नव्हती कांहींचा असा आक्षेप आहे कीं, परिषदेंत शास्त्रीय विषयांची चर्चा झाली नाहीं. लहानापासून सर्वांस समजेल अशा रीतीनें विषयांची मांडणी करणें यासच शास्त्र म्हणत.त. राजवाड्यापासून झोंपडीपर्यंत धर्म प्रसारासाठीं चर्चा करण्यास सर्वांसच सवड मिळाली पाहिजे. एकमेकाशीं चर्चा केल्यावर गैरसमज दूर होतात; स्वभावो दुरतिः क्रमः असा नियम असला तरी पण फायदा झाल्याखेरीज राहणार नाहीं व या दृष्टीनें; पुष्कळ परिषदा भरवाव्या लागतील. व अशा रीतीनें एकत्र जमणें म्हणजेच गैरसमज दूर करणें होय! सर्वांचें शंका समाधान आद्य शंकराचार्यांच्या हातूनहि झालें नाहीं, व तसें होणें शक्यहि नाहीं; तथापि कार्य करीत राहिलेंच पाहिजे—परिषदेपुढें झालेल्या कार्याबद्दल व ध्येयाबद्दल माझें पुढीलप्रमाणें मत आहे. तें माझें व्यक्तीचें मत आहे, परिषदेचा अगर मठाचा त्याच्याशीं संबंध नाहीं. चातुर्वर्ण्य नको असें म्हणणारांकडे अगोदर पाहूं! समाजांत चैतन्य उत्पन्न होणें केव्हांहि इष्ट असतेंच. सर्व क्रान्ति घडवून नवीन रचना करावी अशा कल्पनेचा प्रसार जास्त होत आहे. त्याजकडे दुर्लक्ष करून उपयोगी नाहीं. वस्तुस्थिति समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे, शिव्या देणारांनीं खूप शिव्या द्याव्या, पण त्याजपासून लोकांवर वाईट परिणाम होऊं लागला तर मात्र त्यांची उपेक्षा करून उपयोगी नाहीं. सनातन धर्म नष्ट होत नाहीं ही अगदीं निर्विवाद गोष्ट आहे. ब्राह्मण मारावें मारावें असें म्हणणारांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ज्या वेळीं, ब्राह्मण खावें खावें असें दैत्य म्हणत असतांना सुद्धां त्या वेळीं ब्राह्मण जगलेले आहेत.

तरीपण जागृति झाली आहे. तेव्हां आपलें कर्तव्य करणें आपणांस प्राप्त आहे. विरुद्ध बाजूची समजूत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व चातुर्वर्ण्य मान्य आहे अशा मंडळींच्याहि मध्यें आपण जागृति केली पाहिजे, आजची स्थिति सदैव कायम राहील असें नाहीं, शत्रुभावानें वागणारांची उपेक्षा करून उपयोगी नाहीं

जनतेचा प्रतिनिधि म्हणून काम केल्याखेरीज धर्मगुरूंचें भागणार नाहीं. काम करणारे आपल्यांतलेच असतात त्यांचे कार्य पाहून लोक त्यांच्यामागें जातात. त्यांच्या परंपरेला जनता त्याचप्रमाणें मानील असें नाहीं. काम करण्यासाठींच जे कोणी उद्युक्त होतात, त्यांचे श्रम यशस्वी होतात, त्यांनीं जनतेच्या मताप्रमाणें वागलें पाहिजे, तेव्हांच ते यशस्वी होतील. पूर्वींहि राजे लोक लोकांचे प्रतिनिधि म्हणून काम करीत, इंद्र, बृहस्पति, दशरथ, वशिष्ठ यांच्या उदाहरणावरून, राजे ज्या वेळीं चुकत त्या वेळीं त्यांस ताळ्यावर आणण्याकरितां धर्मगुरूंची आवश्यकता लागे. हें लक्षांत येईल. राजा ज्या वेळीं, लोकमतानुयायी असतो त्या वेळीं, पीठांचें कामच नव्हतें. बुद्धानंतर शंकराचार्यांचें पीठ स्थापन झालें, लोकांनीं त्यांना निर्माण केलें व राजांनीं त्यांना मान्यता दिली. धर्मगुरू ज्या वेळीं अपात्र असतील त्या वेळीं जनता— राजाकडून तो जनतेचा पुढारी म्हणून काम करवून घेई. व त्यांच्या अभावीं आज प्राज्ञपाठशाळेसारख्या संस्था सर्वस्वीं लोकांस चालवाव्या लागतात. आमचें काम मत देण्याचें नाहीं. आमचें काम काय तें लोकांनी ठरवावयाचें आहे.

आमचे राज्यकर्ते धर्माबद्दल उदासीन आहेत असें म्हणतात, परंतु ते हात घालीत नाहींत असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ, सतीचा कायदा घ्या. चिरोल यांनीं मेस्टनच्या अध्यक्षतेखालीं दिलेल्या व्याख्यानांत सांगितलें, कीं धर्मगुरूंचे हक्क हिरावून घ्या. हिंदू लोक भावनाप्रधान आहेत म्हणून त्यांनीं प्रथमच त्यांत हात घातला नाहीं. पण हळूहळू त्यांत ते हात घालूं लागले आहेत. त्यांचा हात निदान आपल्या धर्मांत तरी शिरकूं नये अशाबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे.

ज्याप्रमाणें राजाचें प्रजेला ऐकावें लागते त्याप्रमाणें राजालाहि प्रजेचे ऐकावें लागतेंच. व तोच खरा राजा व प्रजाधर्म. याच न्यायाप्रमाणें धर्मगुरू

म्हणजेहि लोकांचेच प्रतिनिधि होत. धर्मपीठ म्हणजे लोकमताप्रमाणें वागावयाचें व लोकांस धर्माप्रमाणें वागविण्याचें स्थान होय ! आपणांला लोकांकडे जावें लागेल मग लोक आपणांकडे येतीलच. लोकोद्धारासाठीं प्रत्यक्ष परमेश्वरालासुद्धां यावें लागतें. त्याचप्रमाणें समाजाचा उद्धार करणारांना समाजाकडे जाणें प्राप्तच आहे. याचप्रमाणें राजा व प्रजा हा संबंध समजावा. एका मध्यबिंदु जवळ दोघांस मिळावें लागतें, व तो मध्यबिंदू कोठें आहे हेंच शोधून पाहिलें पाहिजे. तो बिंदू सांपडला, तें मध्यवर्ती बंधन काय आहे हें समजलें कीं कार्यभाग झाला.

आपण स्वतः आचरण करून त्याप्रमाणें लोकांकडून आचरण करविणारा तो खरा आचार्य. गुजराथेंत प्रत्येक स्वयंपाक्यास महाराज म्हणतात, म्हणजे एकाद्या संस्थानचा महाराज ज्याप्रमाणें आचारी नसतो, त्याचप्रमाणें वरील व्याख्ये व्यतिरिक्त ते आचार्यच नव्हत. समाज संघटनेच्या बहुविध शाखा आहेत, त्या प्रत्येकासाठीं, समाजाचें काम करण्यासाठीं वेगवेगळ्या आचार्यांची जरूरी असते. धर्मविषयक कार्य आपणांकडून होत नाहींत म्हणून धर्म आचरून तो आपणास शिकविणारा आचार्य असणें इष्ट आहे. लोकांच्या आकांक्षा न समजतां काम करणारा मनुष्य लायखच नाहीं. जेथें घाण झाली असेल तेथें ती घाण काढून टाकण्याबद्दल आग्रह धरणें हेंच इष्ट आहे. व अशी घाण कोठें आहे हें उघडपणें सांगण्यास संधि देणें हेंहि उक्तच आहे. मुलें चांगलीं निपजण्यासाठीं त्यांजवर सक्ति केल्यानें तीं असंतुष्ट राहणारच ! सर्वांचा अभिप्राय एकच कीं धर्मपीठ सुधारा. व तो अत्यंत उपयुक्त असाच आहे. शिरवीकर म्हणतात ' पीठाला चांगलें करणारें पीठ पाहिजे. ' ते म्हणतात ब्राह्मणांनीं पूर्वींप्रमाणें नदीतीरीं जाऊन रहावें. वगैरे. ब्राह्मण पूर्वीप्रमाणें जाऊन जंगलांत राहतील. पण तेथेंहि त्यास फॉरेस्ट कायद्याचा प्रतिबंध आहेच. पूर्वींप्रमाणें राजानींहि राजधर्माप्रमाणें वागलें पाहिजे. प्रजेचें राजधर्माप्रमाणें प्रतिपालन केलें पाहिजे. धर्माच्या बाबतींत आमची सत्ता नाहीं असें म्हणणारे आजचे पक्षपाती राजे, देशी राजेहि त्याचप्रमाणें, अशी स्थिति असल्यावर पांच हजार वर्षापूर्वींच्या ऋषि प्रमाणें वागा असें म्हणण्यांत काय अर्थ आहे.

कांहीं वैशिष्ट्याकरितां चातुर्वर्ण्य राखणें अत्यंत आवश्यक आहे. हें श्रुति स्मृति प्रमाणानें व युक्तिवादानें सिद्ध करण्यास मी तयार आहे. परिषदेंत शास्त्रीय चर्चा होईल अशी आमची अपेक्षा होती असें कित्येकांचें म्हणणें आहे परंतु प्रत्येक गोष्टींची शास्त्रीय चर्चा सदैव उपयोगी पडतेच असें नाहीं शास्त्रीय चर्चा ज्यांस शास्त्र समजतें अशांच्या उपयोगी. बहुजनसमाजास पटेल व समजेल अशाच दृष्टीनें त्यांजपुढें विवेचन केलें पाहिजे.

पीठाच्या कार्यासंबंधानें माझी अपेक्षा आहे कीं, लोकांनीं धर्मगुरूंचा हात धरून त्यांस विचारलें पाहिजे कीं, तुम्ही आमच्यासाठीं काय करतां ? हल्लीं राजसत्ता धर्मसत्तेशीं टक्कर देऊं पाहते. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं धर्मगुरु पाहिजेत. धार्मिक हक्कांबद्दल सरकारशीं सनदशीर रीतीनें भांडणें हें धर्मगुरूंचें कर्तव्य आहे. हें काम मी आपल्या सर्वांच्या सहाय्यानें करण्यास सिद्ध आहे. माझ्यानें हें काम न होईल तर मी दुसरें कोणतेंहि राष्ट्रीय काम करीत फिरेन. धर्मपीठांचा लोकांवर विनाकारण बोजा पडूं नये अशी माझी उत्कट इच्छा आहे. परंतु ज्यांच्या अंगांत चैतन्य नाहीं अशा माणसाबरोबर काम करणें मात्र नको. त्यापेक्षां तरुण स्वयंसेवकांबरोबर काम करणें मला आवडतें व त्यांच्यांत चैतन्य उत्पन्न करावे ही माझी इच्छा आहे.

या सर्व कार्यासाठीं महाराष्ट्रीय धर्म महाविद्यालयाची संस्थापना होणें अत्यंत आवश्यक आहे. जनतेच्या सहानुभूतीवर नाशिकसारख्या पुण्यक्षेत्रीं अशा प्रकारचा उपक्रम लवकर सुरू होईल अशी आशा आहे.

ॐ शांतिः शांतिः शांतिः

येणेंप्रमाणें परिषदेचे अध्यक्ष श्रीजगद्गुरू यांचे उपसंहारात्मक भाषण झाल्यावर, परिषदेच्या पुढें आलेल्या सूचनांचा विचार करून कांहीं तरी निश्चित योजना, पुढील परिषदेपुढें मांडण्यासाठीं खालील गृहस्थांचें एक मंडळ परिषदेनें निवडलें:—

अध्यक्ष श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे अमरावती, उपाध्यक्ष श्री. नरसिंह

चिंतामण केळकर पुणें, रा. ब. गणेश रामकृष्ण दातार नाशीक, सभासद श्री. माधवराव अणे यवतमाळ, डॉ. बा. शि. मुंजे नागपूर, रा. ना. रा. बामणगांवकर अमरावती, प्रो. शिवराम महादेव परांजपे पुणें, श्री. जनार्दन सखाराम करंदीकर पुणें, श्री. त्र्यंबक हरी आवटे पुणें, श्री. श्रीधरशास्त्री पाठक पुणें, श्री. नारायणशास्त्री मराठे वाई, श्री. हरीशास्त्री गर्गे नाशीक, श्री. सितारामशास्त्री महाशब्दे नाशीक, श्री. वामनशास्त्री दातार नाशीक, श्री. वासुदेव बापुजी अकूत नाशीक, श्री. रघुनाथ पांडुरंग करंदीकर सातारा, श्री. गंगाधर बाळकृष्ण देशपांडे बेळगांव, डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर मुंबई, रा. जगन्नाथ गणपत ढवण मुंबई, श्री. नारायणराव गुंजाळ पुणें, श्री. मोतीलाल माणेकचंद अमळनेर, शे. वल्लभदास येवले, शे. जमनालाल बचराज वर्धा, रा. गंगाधर विश्वनाथ गोखले पुणें, व रा. रामकृष्ण गोपाळ भिडे पुणें, चिटणीस. व शेवटीं राष्ट्रीय गीत होऊन सभेचें काम समाप्त झालें.

[ **टीप**—परिषद झाल्यानंतर एक महिन्याचें आंतच श्रींच्या उत्कट इच्छेनुरूप नाशिकपासून चार मैलावर गोदातटाकीं श्रीक्षेत्र गंगापूर येथें श्री. गोपिकाबाईसाहेब पेशवे यांच्या वाड्याची जागा महाराष्ट्रीय विद्यापीठ, व श्रींचा मठ यासाठीं मिळाली आहे. त्या स्थानाचें पूर्वीचे ऐतिहासिक महत्त्व व प्रस्तुत उभारल्या जागाऱ्या विद्यापीठाचें महत्त्व लक्षांत घेऊन महाराष्ट्रांतील धर्माभिमानी राष्ट्रप्रेमी लोक विद्यापीठ उभारण्याच्या कामीं यथाशक्ति मदत करतील अशी आशा आहे. विद्यापीठासाठीं पाठविली जाणारी मदत श्रींकडे अगर परिषदेच्या चिटणिसांकडे पाठविली असतां चालेल. ]

शि. प्र. मंडळी
879



## श्रीराष्ट्रदेवतायै नमः



### राष्ट्रगीतम्.

[ चाल—सुंदरमुख. ]

वन्दे त्वां भूदेवीं आर्यमातरम् ।
जयतु जयतु पदयुगलं ते निरंतरम् ॥ धु० ॥
शुभ्रशरच्चन्द्रयुक्त–चारुयामिनीम् ॥
विकसित–नव–कुसुम–मृदुलदाम–शोभिनीम् ॥
मन्दस्मितयुक्तवदनमधुरभाषिणीम् ॥
सुजलां । सुफलां । तरलां । शिववरदाम् ।
चिरसुखदां । मुकुलरदां । आर्यमातरम् ॥ वन्दे० ॥ १ ॥
दशकत्रयकोटिजनकंठनादिनीम् ॥
अमितभुजां धृतसदसिं तनय-तारिणीम् ॥
हिमनगजां स्वाभिमान-बुद्धिदायिनीम् ॥
कमलां । अमलां । अतुलां । रिपुहारिणीम् ।
बलकरिणीं । धृतनलिनीं । आर्यमातरम् ॥ वन्दे० ॥ २ ॥
धर्मस्त्वं शर्म त्वं त्वं यशो बलम् ॥
शक्तिस्त्वं भक्तिस्त्वं कर्म चाखिलम् ॥
प्रतिसदनं प्रतिमा ते त्वं महाफलम् ॥
धरणीं । भरणीं । जननीं । कविप्रतिभाम् ।
नतसुलभां । जगदम्बां । राष्ट्रमातरम् ॥ वन्दे० ॥ ३ ॥

परिशिष्ट १

# महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषदेपुढें आलेल्या सूचना

प्रो. मोहिनीराज लक्ष्मण चंद्रात्रेय एल्फिन्स्टन् कॉलेज मुंबई.

**धर्मशिथिलता व तिचें पहिलें कारण.**—तरुण पिढीला धर्माचें स्वरूपच माहित नाहीं व नवीन पद्धतीचाहि पूर्ण विकास नसतो. त्यामुळें बंधनें शिथिल होऊन धर्माबद्दल वाटणारी अनास्था नसावी अशी उत्कट इच्छा असूनहि योग्य मार्ग न सुचल्यामुळें उत्पन्न झालेलें धर्माविषयीं औदासिन्य.

**दुसरें कारण व सुधारणेबद्दल एकमत.**—या अनास्थेचें दुसरें कारण हिंदुधर्म व व्यवहार यांचा परस्पर संबंध हें आहे. यांत धर्म व व्यवहार यांची सांगड घालावयाची असल्यानें धार्मिक सत्यें कायम ठेवून किरकोळ आचारविषयक बाबतींत परिस्थितिप्रमाणें फेरबदल करण्याची आवश्यकता परिस्थितीमुळें होणारी विचारक्रांति व त्यामुळें धर्मसुधारणेबद्दल ऐकमत्य, याबद्दल ऐतिहासिक पुरावा वेद, पुराण, मनुस्मृति इत्यादिकांतून स्पष्ट सांपडतो.

**त्यांत येणाऱ्या अडचणी.**—परंतु हिंदुधर्माच्या सर्व संग्राहकत्वामुळें ही सुधारणा करणें अत्यंत कठिण आहे. परिस्थितीमुळें निरनिराळे पंथ व जाति अस्तित्वांत आल्यामुळें व त्यांच्या सुधारणा-विचारबाहुल्यामुळें पसरलेला असंतोष. पूर्वीं याबद्दल विचार करण्यास सवडच नव्हती. हिंदुधर्माच्या प्राचीन स्वरूपांत जनता केवळ अनुगामी असे. सध्यां देशकाल इत्यादिकांनीं हें अनुगामित्व नाहींसें होऊन विचारस्वातंत्र्य पसरलें आहे. याची उपेक्षा

करतां येत नाहीं त्यामुळें पूर्वपरंपरा न सोडतां परिस्थित्यनुरूप बदल झालाच पाहिजे.

**ही सुधारणा आचार धर्मांतच पाहिजे व असंतोषाचें मूळ.**—यांचा विचार करतांना हिंदुधर्माची माझी व्याख्या–कोणत्याहि कोटीच्या व्यक्तीच्या धार्मिक आकांक्षेचें समाधान करणारा धर्म–त्याप्रमाणेच धार्मिक सुधारणेंचा शब्दशः अर्थ तात्त्विक सुधारणा करावयाची नसून आचारधर्माचीच सुधारणा करण्याची आहे. या किंवा असल्या प्रकारची सुधारणा झाल्यास असंतोषाचें बीज न नाहींसें होईल. व या दृष्टीनें परिषदेपुढ असलेल्या दुसऱ्या प्रश्नास पहिला प्रश्न हेंच उत्तर आहे असें मी समजतों.

**तरुण पिढीच्या विधायक ३ सूचना.**—परिषदेपुढें असलेल्या पहिल्या प्रश्नाचा विचार आम्ही तीन बाजूंनीं करतों. १ धर्मगुरु. २ धर्माचें स्वरूप कसें व कोणतें निश्चित करावें. ३ या निश्चित केलेल्या धर्माचाराची अम्मलबजावणी.

**धर्मगुरु.**—धार्मिक लोकसत्तावाद व धर्मगुरूंचा अधिकार–या अधिकाराचा मधल्या काळांत झालेला दुरुपयोग (निरुपयोग) जनतेचा धर्मगुरुची कल्पना व त्यांचें वर्तन यांचा भेद, त्यांनीं घेतलल्या संन्यासव्रताचा केवळ जनोद्धारार्थ उपयोग व गीतेचें कर्मयोग रहस्य. या पुढील धर्मगुरूंचें तरुण पिढी काढीत असलेलें कल्पनाचित्र—

**धर्माचें स्वरूप कसें व कोणतें ठरवावें**—जुने आचार विचार व परिस्थितीमुळें उत्पन्न होणारे भेद यांची निश्चितता. ह्याकरितां एखाद्या मनुस्मृतीप्रमाणे धर्मकायद्याची आवश्यकता. हा कायदा ठरविण्याची दिशा.—

धर्मविचार परिषद् तिची घटना व नियमन–जातिभेदांचा विचार न करतां प्रांत भागांतून १।२ प्रतिनिधी निवडून या मंडळास धर्मविचार परिषद् म्हणावें. यांत निरनिराळ्या पंथाच्या व मताच्या विद्वान् गृहस्थांचा समावेश करून ४००।५०० सभासद हे तील. यांनीं निरनिराळ्या पंथांच्या धर्मगुरूंच्या अध्यक्षतेखालीं निरनिराळ्या पंथसभा नेमून त्या त्या पंथाच्या आचारांत परिस्थित्यनुरूप बदल करून निरनिराळ्या पंथांचें सध्याच आचारविषयक स्वरूप निश्चित करावें. हे स्वरूप कायम झाल्यावर त्या त्या प्रांतांतील

प्रचलित भाषांत त्याबद्दल स्पष्ट व एकार्थी अशीं पुस्तकें तयार करावीं. संस्कृतांतहि पुस्तकें केल्यास हरकत नाहीं परंतु त्यांत एकार्थता व तत्त्वप्रतिपादनाची स्पष्टता याकडेच केवळ लक्ष असावें.

या स्वरूपाच्या बाबतींत स्वतः माझे कांहीं विचार आहेत ते सध्यां न सांगतां अशी धर्मविचार परिषद् अगर तशाच एखादा प्रयत्न करणारी सभा स्थापन झाल्यास त्या नवीन परिषदेपुढें मांडण्याची तयारी आहे.

**धर्मसभा स्थापना**—हें स्वरूप कायम झाल्यावर प्रत्येक गांवांतून धर्मसभा स्थापाव्या. यांत गांवांतील प्रत्येक पंथाच्या माणसाची निवड होऊन त्यांनीं गांवांतील परिस्थितीचा विचार करावा. त्यांनीं करावयाच्या कामाचें थोडक्यांत दिग्दर्शनः—

वेळोवेळीं गांवांत सभा भरवून धार्मिक विषयांची चर्चा करणें.

धार्मिक भानगडी किंवा अडचणी गांवांतील लोकांसमोर मांडून न्यायनिवाड्यास कारण होणें.

धर्मविचारपरिषदेकरितां सभासद निवडणें.

गांवांतील लहान व तरुण मुलांस योग्य रीतीनें धर्मशिक्षण देण्याची व्यवस्था करणें व याकरितां लागणाऱ्या साधनसामुग्रीवर देखरेख ठेवणें.

गांवांतील धार्मिक मंदिरांची जोपासना करून धर्मफंडांचा योग्य विनियोग करणें.

याप्रमाणेंच असणारीं इतर धार्मिक कार्यें.

**ह्याच दिशेनें इष्ट आरंभ व अडचणींचा निरास**—या धर्मसभा स्थापण्याबद्दलची अत्यंत आवश्यकता व मी सुचविलेल्या मार्गास आरंभ येथूनच होतो ह्या स्थापनेनें लोकांच्या धर्मभावना जागृत करून नंतर धर्मस्वरूपाची निश्चितता करणें हा श्लाघ्य मार्ग. या धर्मसंस्थांनीं आरंभीं फक्त नैतिक व आवश्यक असें तात्त्विक सदाचाराचें शिक्षण दिल्यास असंतोष नाहींसा होईल. परंतु या सभा गांवोगांव स्थापण्याबद्दल वरकरणी भासणारी अडचण व धर्मगुरूंच्या निष्कामकर्मामुळें तिचा निरास. लागणाऱ्या खर्चाची योजना. धर्मगुरूंचा आत्मत्याग व त्यांची आर्थीच अडेलेली तरतूद. त्यांत हिंदु लोकांच्या दाक्षिण्याची भर व दानशूरांच्या धार्मिक इच्छा.

**इतर मार्गानें इच्छित ध्येय साध्य होणार नाहीं.**—धार्मिक सनु

श्रींनीं करावयाच्या कामाची रूपरेखा हस्तपत्रकांतून आज्ञापत्रांनीं होईल. धार्मिक शिक्षणास पैशाची जरूर नाहीं. त्याकरतां गांवोगांव वाकटेबलांच्या शाळा नकोत. गांवांतील कोणत्याहि मंदिरांतून निरनिराळ्या व्यक्तींचें प्रवचन. तरुणांसच केवळ उपयोग न होतां जनतेचेंहि उन्नतिसाधन. ही गोष्ट व्यवस्थितपणानें धर्मगुरूंनीं हातांत घेतल्यास २ अगर ३ वर्षांत महाराष्ट्रांत सहज करून दाखवितां येईल.

**धर्मगुरूंचा दौरा**--वर सांगितल्याप्रमाणें धर्मसभा स्थापन करण्याकरतां जगद्गुरु व इतर धर्मगुरु यांनीं दौरा काढून लवकर सुरुवात करावी.

याशिवाय धर्मोपाध्याय वगैरे करितां प्रांतानिहाय विद्यालयें काढणें वगैरे. पण मध्या व तरुण पिढीच्या दृष्टीनें लोकांच्या धर्मभावना जागृत करणें हीच महत्वाची गोष्ट आहे. १००।२०० विद्यालयें काढल्यानें धार्मिक समाजोन्नति होईल कीं नाहीं, याबद्दल वाद आहे. याकरितां जगद्गुरु व धर्मगुरु यांनीं या दिशेनें प्रयत्न करावा अशी तरुण पिढीची अपेक्षा आहे.

## २

## भाऊ सावळाराम कोठस्थाने वांबुरी.

१ अखिलहिंदू परिषद.
२ अखिल हिंदू द्रव्यनिधि.
३ अखिल हिंदु मासिक पुस्तक.

केवळ धर्मोन्नतिसाठीं व समाजोन्नतिसाठीं श्रींनीं काय केलें पाहिजे व काय करितां येईल अगर करवून घेण्याचे शक्य तेथपर्यंत प्रयत्न केले जातील इ. साठीं हिंदू ह्मणविणाऱ्या सर्व ठिकाणचे मठाधिऱ्यांनीं श्रींनीं प्रथमतः फक्त आपले स्वतःतच सभा भरवून पुढील कार्यक्रम ठरवावेत.

वरीलप्रमाणें श्रींनीं आपले निर्णय ठरविल्यावर तालुक्यापासून तों प्रांतनिहाय ज्या त्या श्रींनीं आपले हद्दींत पोटशाखा स्थापून, त्यांतील कामकाजाचे निकाल ज्या त्या हद्दीवरील श्रींनीं द्यावा व त्यांतहि निकाल लागणें अशक्यच दिसेल तर सर्व श्रींची सभा होऊन त्यांत अखेरचा निकाल मिळावा.

**श्रींची आज्ञा मानील तोच हिंदू**-अशी हिंदूची व्याख्या असावी समाजांतील निरनिराळे जातींतील वाद मिटविण्यासाठीं व प्रेम सलोखा वाढविण्यासाठीं निदान प्रत्येक तालुक्यांत एक सभा तरी स्थापिली जाऊन सदरहू सभेस हिंदू

जातींतील सर्व जातींचे शक्य तेवढे सभासद असावेत. व त्यांतील निकाल जिल्हा, प्रांत व श्री ह्यांजकडून होऊन अखेर निकाल अखिल हिंद् परिषद व त्यावर सर्व श्रींचे सभेमार्फत व्हावा.

## ३

## गोविंद रामचंद्र राजोपाध्ये बी. ए. सातारा.

आजपर्यंत धर्म व राजकारण यांची सांगड असल्यानें नास्तिक मतवाद्यांचें कांहीं चालत नसे. आतां ती स्थिति पालटूं लागली आहे. त्यामुळें हिंदु-धर्माची धडगत दिसत नाहीं. माझ्या मतें परिषदेपुढें दोन कार्यें आहेत.

( १ ) विरुद्ध पक्षाचा कायद्याचा आश्रय घेण्याचा प्रयत्न हाणून पाडणें व ( २ ) धार्मिक मतें, धार्मिक मनोवृत्ति व धार्मिक आचरण यांचें पोषण करणें या कार्यास अनुसरून धर्मपरिषदेनें खालील प्रकारचे ठराव पास करावे व त्यांच्या अंमलबजावणीची व्यवस्था करावी असें मी नम्रपणें सुचवितों.

( १ ) आमचें ध्येय स्वराज्यप्राप्ति हें आहे तथापि तें आमची संस्कृति कायम ठेवून व ती ठेवण्याकरितां आम्हांला मिळवावयाचें आहे. याकरितां आमच्या संस्कृतीस विघातक अशा मार्गांनीं तें मिळविणें आह्मांस शक्य नाहीं व इष्टहि नाहीं.

( २ ) लोकांच्या धार्मिक व सामाजिक आचारांत हात घालण्याचीं बिलें कायदे कौन्सिलांत कोणीहि आणूं नयेत. व अशीं बिलें आणणाऱ्या सभासदांस मतदारांनीं मतें देऊं नयेत.

( ३ ) वर्णाश्रम धर्म हें हिंदु धर्माचें विशिष्ट स्वरूप असून तें कायम राखणें अत्यंत अगत्याचें आहे. याकरितां जातिवंत क्षत्रिय व वैश्य या वर्णांना व्रात्यस्तोम विधीनें संस्कृत करून त्या त्या वर्णांत स्थापित करावें. क्षत्रिय व वैश्य या वर्णांत कोण कोणाचा समावेश होतो हें पूर्वपरंपरा जाति पाहून ठरवावें.

( ४ ) गोवध न करणें व गोवधास मदत न करणें, दारू न पिणें, गोमांस न खाणें, या अटी पाळल्यास अस्पृश्याचें अस्पृश्यत्व दूर करावें.

( ५ ) ठिकठिकाणीं धार्मिक उपदेशक फिरते रहातील असे कायमचे नेमावे. व परिषदेची कायमची घटना करावी.

या शिवाय शास्त्र निश्चय करणें, धार्मिक आचरणाबद्दल निग्रहानुग्रहाची व्यवस्था करणें वगैरे महत्वाच्चीं कामें आहेत तीं क्रमाक्रमानें हातीं घ्यावीं. परंतु अगोदर वरील गोष्टांचा विचार करून त्या निर्णीत करणें अगत्याचें आहे.

४

गणेश कृष्ण बोडस नागपूर.

( १ ) हिंदु धर्माच्या उन्नतीसाठीं एक मध्यवर्ती कार्यकारी संस्था स्थापून तिच्याद्वारें हिंदु धर्माचा प्रसार करण्याकरितां उत्साही, तरुण, स्वार्थत्यागी व सत्यनिष्ठ असे प्रचारक तयार करावे व त्यांना केवळ स्वदेशांतच नव्हे तर परदेशांतहि हिंदु धर्म व आर्य संस्कृति यांचा उपदेश करण्याकरितां पाठवून द्यावें व एक मोठा धर्मफंड काढून त्या संस्थेचा खर्च त्यांमधून चालवावा.

( २ ) मागें १८९३ सालीं अमेरिकेंत शिकागो शहरीं ज्याप्रमाणें सर्व धर्म परिषद भरली होती त्याप्रमाणें पुढच्या वर्षी बनारस येथें सर्वधर्म परिषद भरवून जगांतील सर्व धर्मांच्या प्रतिनिधींना पाचारण करावें.

( ३ ) दरसाल नाताळांत राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्यावेळीं त्याच शहरीं धर्म परिषद भरविण्याची तजवीज करावी.

( ४ ) हिंदुस्थानांत धर्माच्या नांवाखालीं दरसाल जो कोटयावधि रुपयांचा चुराडा उडत असून ज्याचा तादृश कांहींच फायदा होत नाहीं, उलट दारिद्र्य व ऐदखाऊपणा यांची उत्पत्ति वाढत्या प्रमाणांत होत आहे. त्याच्या निवारणासाठीं त्या द्रव्याचा एकत्र संग्रह करून उचित अशा धर्मकार्याकडे त्याचा विनियोग करण्याची व्यवस्था करावी.

( ५ ) हिंदुस्थानांत जे जवळ जवळ पन्नास लाख साधु संन्याशी केवळ भीक मागून पोट भरण्यापलीकडे धर्माची किंवा समाजाची काडीमात्रहि सेवा न करतां निरुद्योगी, आळशी व परान्नपुष्ट बनून राहिले आहेत त्यांचा एक संघटित संघ बनवून त्याच्याद्वारें लोकशिक्षणाचें कार्य घडवून आणावें.

५

विठ्ठल विनायक तगारे राहुरी.

१ धर्मसंबंधी कामगिरीकरतां, द्रव्यनिधीची अत्यंत जरूर आहे. तो फंड,

कर व देणगी या रूपानें संचित करावा.

२ धर्माची जाणीव जनतेस करून देण्याकरतां श्रींनीं गांवोगांवीं दौरे काढून धार्मिक व्याख्यानें देणें.

३ फंडांतून प्रत्येक जिल्ह्यांत एक संस्कृत पाठशाळा काढून तींत हुषार व होतकरू विद्यार्थ्यांस संस्कृत ज्ञानाचा मोफत लाभ देणें.

४ जिल्ह्यांतील केवळ लक्ष्मीपुत्र म्हणून त्यांना आशिर्वादपत्र न देतां जे नीतीनें, आचारानें व विद्येनें श्रेष्ठ असतील त्यांनाच आशिर्वादपत्र देऊन त्यांचा श्रींनीं गौरव करणें.

५ समाजांत ऐक्य उत्पन्न होण्याकरितां विशिष्ट पक्षाचाच पुरस्कार न करितां धार्मिक आचारांस धक्का न बसेल अशा रीतीनें धर्मास वळण लावणें.

६ गांवनिहाय नच साधल्यास तालुकानिहाय एकेक धार्मिक कमेटी स्थापन करणें. पंचांनीं तालुक्यांतील किरकोळ धार्मिक वादांचा निकाल लावणें मोठ्या भानगडीचा प्रश्न श्रीशंकराचार्य यांजकडे त्यांनीं सोंपवावा.

७ निस्वार्थी अगर नच मिळाल्यास पगारी प्रचारक नेमून त्यांनीं आपापल्या भागांत वारंवार धर्माचें श्रेष्ठत्व व्याख्यानें देऊन समजावून द्यावें.

८ दरसाल अखिल महाराष्ट्रीय धर्मपरिषद श्रीशंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं भरवन तींत चालू व पुढील सर्व प्रश्नांचा विचार व्हावा.

## ६

## हरिहर सीताराम राजदेकर

आद्य श्रीशंकराचार्यांनीं धर्मोन्नतीसाठीं केलेली पण सध्यां शिथिल झालेली व्यवस्था पुनः प्रस्थापित करावी. प्रत्येक खेडेपाडीं धर्मशिक्षणाच्या शाळा काढाव्यात. श्रींनीं स्वतः संचार करून धर्मजागृति करावी. चातुर्वर्ण्यांत माजलेली बजबजपुरी सर्व जातींच्या पुढाऱ्यांची सभा भरवून मोडून टाकावी. नव्या जुन्या हिंदुधर्माभिमान्यांनीं बहुमतानें जें ठरेल तें मानावें. संकर जातीशीं तुटकपणें न वागतां प्रेमानें वागावें.

## ७

## वामन विठ्ठल कुळकर्णी एम. ए, मोरगांव.

१ सनातन वैदिक धर्मावर अधिष्ठित झालेली चातुर्वर्ण्यव्यवस्था कायम रहावी.

२ धर्माचें बहिरंग जें वर्णोचित कर्म तें शक्य तितकें पाळण्यांत येईल व धर्मबाह्य स्वैर वर्तनास आळा पडेल असा निर्बंध असावा.

३ राष्ट्रधोरणास अत्यंत उपयोगी अशीं जीं सनातन वैदिक धर्माचीं मूलतत्त्वें-दया, दाक्षिण्य, परोपकार, प्रामाणिकपणा व उज्वल नीतिमत्ता ह्यांचा क्रियारूपानें अधिकाधिक प्रसार होईल असे उपाय करणें.

**साधनें**—लेख व्याख्यानें वगैरे.

८

## महादेव बाळकृष्ण खळदकर, संपादक धर्ममार्तंड मोरगांव.

सूचना १ सध्यांच्या काळांत जगद्गुरु पीठाचीं बहुतेक आर्थिक सूत्रें ब्रह्मद्वेष करणाऱ्या सत्ताधिकाऱ्यांच्या हातीं आहेत. करितां त्या सत्तेतून पीठास त्वरित मोकळें करणें ह्मणजे पीठाधिकाऱ्यास निर्विघ्नपणें धर्मजागृतीचें कार्य करितां येईल.

सूचना २ अधर्मानें वागणाऱ्या व्यक्तीस योग्य शासन करून त्यास धर्मप्रवृत्त करण्याकरितां लागणारे सर्व प्रकारचे राजकीय अधिकार सदर पीठाधिकाऱ्यास कायदेशीर रीतीनें मिळवून द्यावेत व धार्मिक बाबीसंबंधाचा कोणताहि खटला सरकारनें न घेतां तो तत्प्रांतीय जगद्गुरुपीठापुढेंच चालवावा.

सूचना ३ सनातन वैदिकधर्मानुसार न वागणाऱ्या व आचारविचाराचा निषेध न मानणाऱ्या व्यक्तीस सदर संस्थेच्या कोणत्याहि कार्यसंघांत बिलकूल घेऊं नये.

सूचना ४ धार्मिक स्वराज्य संस्थापनेची सनदशीर भरपूर चर्चा करण्याकरितां व त्यासंबंधीं वेळोवेळीं सभा, परिषदा वगैरे भरवून सरकारकडे कायदेशीर दाद मागण्याकरितां धार्मिक विषयांचें पूर्ण ज्ञान असून आचारविचार पारंगत अशा अनेक शास्त्रीय विद्वान लोकांच्या संपादकीयत्वाखालीं केसरी पत्राएवढें एक साप्ताहिक चालू करावें.

सूचना ५. हिंदुस्थानांतील लोकांच्या धार्मिक बाबींत सरकार हात घालणार नाहीं असें अभिवचन राणीच्या जाहीरनाम्यांत आहे, परंतु सरकार हल्लीं तें कितपत पाळीत आहे याजबद्दल योग्य विचार करण्यांत यावा व त्या कामीं पीठाच्या मदतीकरितां प्रत्येक तालुक्याचे गांवीं एक धर्म-

कमिटी स्थापन करून त्या कमिटीनें आपलें कार्य योग्य रीतीनें व निःपक्षपातानें चालवावें.

सूचना ६. धर्मपरिषदा भरविणें हें सामान्य कार्य नव्हे, हें पूर्णपणें लक्षांत घेऊनच तें कार्य योग्य व अधिकारी मनुष्यांनीं हातीं घ्यावें, धर्म व आचार यांची फारकत असलेला व परकीय आचारविचारांना भाळलेला अशा प्रकारचा पदवीधर सुधारक समाज जर हें कार्य अंगीकृत करील तर कांहीं दिवसांनीं धर्म या शब्दाची व्याख्या निराळीच करावी लागेल. करितां य धर्मपरिषदेच्या कार्यांत शक्य तितक्या धार्मिक आचारविचारसंपन्न लोकांनींच भाग घ्यावा.

## ९

## श्रीकृष्ण सदाशिव घारपुरे.

१ सध्यांची बेबंदशाही मोडून सर्वत्र एकोपा करण्याकरितां जनतेला कांहीं तरी सर्व साधारण बंधन असावे.

२ रूढ असलेला मिथ्याचार काढून टाकून खऱ्या वैदिक धर्माची ओळख आबालवृद्धांस क्रियासिद्ध करून द्यावी.

३ धर्म व व्यवहार यांची सांगड घालून सामाजिक अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करावा.

४ सनातन धर्माचीं मूलतत्वें प्रत्येक शाळेंमधून शिकविलीं जावीं.

५ ईशावास्योपनिषद्‌ाचे भाषांतर मराठींत करून तें पुस्तक सध्यांच्या विषम परिस्थितींत धर्म पुस्तक म्हणून समजावें.

## १०

## कृष्णशास्त्री विष्णुशास्त्री पद्मनाभी.

( १ ) चातुर्वर्ण्य रचना कायम ठेवावी व प्रत्येक वर्णानें आपापलीं कर्में करावींत.

( २ ) सार्वत्रिक शिथिलता आल्यानें द्वेष उत्पन्न झाला आहे तरी परिस्थित्यनुरूप आचारविचार बदलावे.

( ३ ) अस्पृश्यवाद कालांतरानें आपोआप मिटेल.

( ४ ) जगद्गुरूनीं चारी वर्णीयांना समतेनें वागवावें

## ११

### गोविंद विष्णु फडके, अहमदनगर.

( १ ) समाजाचें व धर्माचें सनातन हें नांव दृढ व्हावें. हिंदू नको

( २ ) तडजोडीचें धोरण ठेवावें. प्राचीन परंपरेचा योग्य अभिमान सोडूं नये, पण दुरभिमानास फांटा दिला पाहिजे.

( ३ ) उदार धोरण ठेवलें तरच समाजाची एकवाक्यता होण्याचा कांहीं अंशीं तरी संभव आहे. आरंभीं उसळीसरसा विरोध होईल पण विचारांतीं तो विरळ होत जाईल व शेवटीं सर्वथा नाहींसा होईल.

( ४ ) दुरभिमानी विरोधकांचा ह्या पीठास फारसा पाठिंबा नाहींच, तेव्हां त्याची पर्वा करण्याचें विशेषसें प्रयोजन नाहीं. एवढच नव्हे तर हीच स्थिति इष्टसिद्धीस यथा अनुकूल आहे. ह्या परिस्थितीमुळेंच, कांहीं कार्य होईल तर पीठाकडूनच होईल असा दृढ भरंवसा आहे.

## १२

### गोविंद एकनाथ गोसावी, निफाड.

१ संन्यास, अग्निहोत्र, परदेशगमन, प्रौढ विवाह हीं निषेध सदरांतून काढून विधि सदरांत घालावींत.

२ अक्षतयोनी विधवेस पुनर्विवाहाची परवानगी द्यावी, परधर्मांत गेलेले लोक स्वधर्मांत घ्यावेत, अस्पृश्य जाति स्पृश्य समजाव्या, जातींतील दोष नाहींसे करून जातींचें रक्षण करावें. कालाला अनुसरून रहाटी बदलावी, नवे आचार अमलांत आणावें.

## १३

### बाळकृष्ण विठ्ठल शिखरे, मिरज.

( १ ) एक कायमची कौन्सिलसारखी संस्था काढून चालू कालाला अनुरूप असें धर्मजागृतीचें कार्य पीठाकडून अखंड चालावें. मठातर्फें एकादें मासिक अगर साप्ताहिक वर्तमानपत्र असावें. धर्माचा प्रसार करण्याकरितां गांवोंगांव प्रचारक नेमावें.

१४

## के. बी. जाधव वगैरे मंडळी, देवळाली.

हिंदु म्हणविणाऱ्या सहा कोटी अस्पृश्य मानलेल्या जनतेवर धर्माचे नांवाखालीं होत असलेला जुलूम दूर करून ही असमानतेची भक्कम बेडी तोडण्याचें कार्य सर्व विद्वान् पुढाऱ्यांनीं करावें, व त्याला धर्माची संमति असावी.

१५

## रा. रा. शारंगपाणी. बडोदें.

धर्माची विसकटलेली घडी पुनः नीट बसण्याकरितां अशा परिषदांची फार आवश्यकता आहे. गांवोगांव संस्था स्थापून त्या संस्थेमार्फत परिषदेकरितां प्रतिनिधी पाठवावेत व प्रांतांतील विद्वान लोकांचें एक सल्लागार मंडळ नेमावें व त्याचे मार्फत सर्व कार्य व्हावें.

१६

## रामदास दगडूशेट शिंपी, चोपडें.

पक्षाधतेमुळें धार्मिक बाबतींत येणाऱ्या अडचणीचें निराकरण करून सर्वत्र एकोपा व प्रेम वाढविण्याचे ठराव श्रीनीं स्वतः करावेत.

१७

## काशिनाथ महादेव गाडगीळ, नाशिक.

ब्राह्मण ब्राह्मणेतर हा वाद आपसांत मिटवून क्षत्रियांनीं आपलें सर्व बल गोमातेच्या रक्षणार्थ खर्चावें. भेदनीति शिकविणाऱ्या शाळांवर बहिष्कार घालावा. चहापान निषिद्ध समजावें. प्रत्येक शाळेंत एक धर्मशिक्षक नेमला जावा.

१८

## वैद्य पांडुरंग यज्ञेश्वर शास्त्री. केतकर. मुंबई.

आजपर्यंत चालत आलेली परंपरागत रूढि व आचारविचार यांमध्यें कोणताहि फेरफार करणें इष्ट नाहीं.

१९

## संध्यामंदिर, इंदूर.

" विसावे शतकांत, महाराष्ट्रीय धर्म, आचार, विचार, यांचें शैथिल्य झालें असल्यानें त्याला विरोधकारक असें निग्रहानुग्रहाचें शासनानुशासन, असाणारे असें एक, महाराष्ट्रधर्मसंस्थांच्या प्रतिनिधींचें मंडल, " महाराष्ट्र धर्म परिषद् " सभेनें नेमण्याबद्दल श्रीसंध्यामंदिर संस्था आपला अभिप्राय व्यक्त करीत असून प्रथम पुनर्विवाह, सिव्हिल म्यारेज ॲक्ट, परधर्मप्रवेश, शूद्रानीं स्वीकारलेलें वेदोक्त आचरण आणि क्रिया, जातिभेदप्रतिबंधक संस्था, यांना धर्मशास्त्र, रूढि, यांच्या आधारें, श्रीमज्जगद्गुरूनीं, निषेध करून राजकीय सभेंत, धर्मसंरक्षणाचें मत देण्याचा अधिकार संपादन करून घेण्याविषयीं, श्रीसंध्यामंदिर संस्था सुचवीत आहे.

२०

## वासुदेव गणेश तांबे. अमरावती,

धर्मोन्नति व समाजोन्नतीकरितां श्रीमज्जगद्गुरु यांचें वर्तन निर्भीड व चोख असून द्वंद्वातीत असावें. श्री आद्य आचार्यांनीं ज्याप्रमाणें पायीं प्रत्येक ठिकाणीं प्रवास करून कार्य केलें त्याप्रमाणें करावें. हल्लीं वांई येथील प्राज्ञपाठशाळेचे प्रचारक ज्याप्रमाणें निःस्वार्थ बुद्धीनें काम करून चहा वगैरे दुरुपयोगी जिनसांचा उपयोग करूं नये असा उपदेश करितात त्याप्रमाणें किंवा जसें योग्य दिसेल त्याप्रमाणें याहि पेयाचा त्याग करणेंबद्दल उपदेश करावा.

त्याचप्रमाणें श्रीक्षेत्र काशी येथील श्रीभारतधर्म महामंडलाचें काम कसें चाललें आहे त्याचेहि अनुभवाचा फायदा मिळाल्यास घ्यावा.

अलीकडे हिंदुसमाजांतील निरनिराळे जातींत वाद उत्पन्न होतात याचें कारण वर्णाश्रम धर्माची बऱ्याच लोकांना जरूरी नकोशी वाटावयास लागली आहे. कांहीं लोक तर धर्माची निवळ थट्टाच करूं लागले आहेत.व सहभोजन म्हणजे कांहींच वाटत नाहीं; तर याबद्दल आळा बसला पाहिजे.

२१

## श्री. संभाजी विष्णु देशपांडे, विटें ( सातारा. )

धर्माबद्दल आस्तिक भावना राहण्याकरितां, धर्मशिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. हिंदुधर्मीयांकडून द्रव्यसाहाय्य मिळवून जगद्गुरूंनीं हें कार्य हातीं घ्यावें ”

२२

## श्री. नारायण सदाशिव मराठे, मुंबई.

“ऋतुपर्यायात्मक वर्षाचें मान धरलेलें पंचांग तयार करवून त्याप्रमाणें जनतेनें वागावें, असा प्रयत्न श्री जगद्गुरूंनीं करावा. ”

२३

## श्री. लक्ष्मीकांत यशवंत पुरोहित, सातारा:—

१ जगद्गुरू पीठाच्या आश्रयानें धर्मशिक्षणाची सोय खेड्यापाड्यांपर्यंत करणें,

२ सांप्रतच्या परिस्थितींत जुन्या आचारांचीं बंधनें कितपत ढिलीं करणें आवश्यक आहे हें तज्ज्ञांच्या मतानें ठरवून सर्वसंमत ठरविलेलें आचार पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावें व त्या आचाराविरुद्ध कोणीं वर्तन केल्यास धर्मसभेनें त्याची चौकशी करावी.

३ तालुक्यांच्या व जिल्ह्याच्या ठिकाणीं विशिष्ट हक्क असलेलीं धर्ममंडळें स्थापणें. ”

२४

## श्री. गोविंद रामचंद्र आपटे, सांगली:—

“ वैदिक मंडळींची फार अनास्था होत आहे ती दूर होण्याबद्दल प्रयत्न करणें. ”

२५

## श्री. प्लहादराय वी मलकानी, कराची ( सिंध )

“ संस्कृत वाङ्मयाचा प्रसार होण्याविषयीं खटपट करावी. ”

२६

### रा. गोविंद विनायक केळकर, मालगुंड

विद्यमानकाळीं शिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या वैदिक धर्मानुयायांत धर्मांतराचें प्रमाण वाढत आहे. वैदिक धर्मावर ही एक आपत्ति कोसळत आहे. तिचा प्रतिकार करण्यासाठीं आचार्य पीठांकडून अत्यंत जरूरीनें योग्य दिशेनें प्रयत्न होणें अवश्य आहे. अशी श्रीचरणीं विनंति आहे. आणि त्या कार्याला उपकारक होण्यासाठीं परिषदेच्या ह्याच बैठकींत श्रींचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमून तिचे द्वारा कार्यारंभ व्हावा."

---

## परिशिष्ट २

# विशिष्ट जातींकडून आलेल्या सूचना.

१

### शंकरलाल राजाराम क्षत्रिय, त्र्यंबक.

श्री त्र्यंबकेश्वराचे देवालयांत जाऊन देवाची पूजा करण्यास सर्वांस मोकळिक असावी.

२

### दयानाथ नारायणदास, मुंबई.

अहीरशिंपी ही जात पुस्तक ग्रंथाधारे "क्षत्रिय" वर्गांत मोडण्यास हरकत नाहीं, म्हणून त्या वर्गास योग्य असें विहित कर्म-उपनयन संस्कार व वेदपठण वगैरे क्षात्र कर्मांची योजना करावी.

(१) प्रत्येक घरांत तुळशीची पूजा रोज झालीच पाहिजे. स्त्रियांनीं तुळशीस पाणी घातल्यावांचून व पूजा केल्यावांचून राहू नये.

२ अहीर शिंपी जातीचा बाणा म्हणून व ते श्रीकृष्ण भक्त आहेत असें उघड दिसावें म्हणून प्रचलित असलेली "रामराम" म्हणण्याचे ठिकाणीं परस्पर भेटींत "जय श्रीगोपाळकृष्ण" असें म्हणण्याची रूढि पाडल्यास तें विशेष बाणेदारपणाचें दृश्य होईल.

स्त्रियांना जातींत विशेष मान असावा. त्यांची कोणत्याहि रितीनें समाजांत, पक्तींत, पंचायतींत अगर इतर कोणतेहि प्रसंगीं बेअदबी होईल अथवा अपमान होईल अशी एखादी रूढि असल्यास ती बंद करावी.

मुलीचा पैसा घेणें ( कन्या विकणें ) अथवा मुलांचा हुंडा घेणें ही चाल कोठेंहि होऊं देऊं नये. कन्यादानांत वधूस देणगी व वरदक्षणा म्हणून संतोषानें दिली जाईल त्यास हरकत नसावी.

मुलामुलींचे सोयरीकीस नियमित वयोमर्यादा असावी.

स्त्रियांस थोडे बहुत तरी लिहितां वाचतां यावें हें उत्तम. निदान अवश्य लागणारें प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या सोयी व त्या देण्याची बाळपणापासून अवश्य काळजी घेण्याची पद्धत अमलांत आणण्यांत मुलीच्या मातापितरांनीं अथवा पालकांनीं आपलें कर्तव्यांत चुकूं नये.

स्त्रियांचे मानावरोवर त्यांचे शीलास पावित्र्य येईल अशी हरएक गोष्ट काळजीपूर्वक घडवून आणावी.

( १ ) गांवोगांवीं पंचायत संस्था असावी,

( अ ) आपलेप्रमाणेंच इतर जातींचे समाजोन्नतीचे कार्यास मदत करणें व त्यांचेकडून आपणांस मदत घेणें म्हणजे इतर समान जातींशीं सर्व प्रकार सहकारिता करणें. त्यांचे कार्यांत आपले प्रतिनिधि पाठविणें व आपले कार्यांत त्यांचे प्रतिनिधि बोलावणें.

( ब ) इतर जातींशीं सहकारिता करण्यास रोटीबेटी व्यवहार नसल्याची नड येऊं नये.

( क ) आपले जातींतील देवघेवीचे तंटे कोर्टांत जाऊं देऊं नयेत, व इतर तंटेहि आपसांत मिटविण्याची खटपट करीत राहावी.

( ड ) आपले जातीचा मनुष्य व इतर जातीचे मनुष्याचे दरम्यान कांहीं वाद पडला असेल, त्यास आपले जातीच्या मनुष्यामार्फत या पंचायतसभेचा सरपंच अथवा इतर दोन सभासद पंच देऊन विरुद्ध बाजूने इसमाकडून त्याचे मर्जीप्रमाणें दोन पंच घेऊन आणि त्यांत चौघांचे बहुमतानें एक त्रयस्थ सर-पंच नेमून घेऊन त्या वादाचा आपसांत निकाल लावण्याचा प्रयत्न करावा; होतां होईल तों वाद कोर्टांत जाऊं देऊं नये.

( इ ) गांवांतील सार्वजनिक कार्यांत पुढारत्व घेणें, सामील होणें, मदत करणें, आणि स्वयंसेवक नात्यानें काम करणें, हीं आपलीं कामें समजावीं.

जातीची **खानेसुमारी** ठेवण्याचे कामांत मदत करणें व त्यांत न्यूनता असेल ती भरून काढणें.

( १ ) **गांवोगांवच्या पंचायत सभेच्या** बहुमतानें एक " **महाजन-सभा** " स्थापन करावी आणि तिचे पांच पंच सरपंचासह निवड करावी.

( अ ) जातीची दरसाल **परिषद्** भरवीत जावी. या परिषदेस इतर जातीचे प्रतिनिधि बोलावण्यास हरकत नसावी परिषदेंत जातीचे व्यक्तिदोषाचे वाद बिलकूल न घेतां, जातीची धार्मिक, नैतिक, सामाजिक, औद्योगिक व अशाच सामाजिक सुधारणांच्या बाबींचा विचार होऊन जातीची उन्नति त्या दिशेनें होण्याची खटपट करावी.

( ब ) समाजहितावरोबर **देशहिताचें ध्येय** पुढें ठेवून त्या मार्गानें आपली चळवळ सदोदित चालू ठेवावी देशहिताचे इतर परिषदेंत, प्रांतिकसभेंत आपले तर्फेचे प्रतिनिधि निवडून देण्याचें कार्य करीत रहावें.

( क ) जातीचे **मुलामुलींचे प्राथमिक, शारिरिक**, नैतिक, धार्मिक, व व्यावहारिक शिक्षणाच्या सोयी करणें.

( ड ) जातीचे **अनाथ मुलांमुलीकरितां** विधवे करितां व अपंग लोकांकरितां **अनाथाश्रम** व **बोर्डिंग** काढणें.

( २ ) इतर समाजाशीं आपले समाजाचा जास्त **सलोखा** वाढेल अशा दृष्टीनें इतर जातीशीं सार्वत्रिक सहकारिता करावी, त्यांचे आणि आपले दरम्यान तंटा फिसाद होईल आणि तेढ पडेल असे प्रसंग टाळणें.

३

**आनंदराव रामजी सेक्रेटरी.** ब्राह्मण कुल समाज नेरपिंगळाई.

सर्व जातींनीं चार वर्णांत आपापले योग्यतेप्रमाणें प्रवेश केल्यावर आमचा प्रवेश कोणते वर्णांत व्हावा हा प्रश्न समाजांत उभा राहणें साहजिक आहे.

आमची उत्पत्ति ब्राह्मणबीजापासून असून क्षेत्र क्षत्रिय व वैश्य या वर्णापासून आहे. आणि गोत्र, प्रवर, आचार विचार व वृत्ति वगैरे सर्व ब्राह्मणाप्रमाणेंच चालत आहेत.

( १ ) मनुस्मृति अध्याय ९ श्लोक ३७ व १८१ ( २ ) मनुस्मृति अध्याय १० श्लोक २८, ( ३ ) महाभारत अनुशासन पर्व अध्याय ४६ श्लोक १४२, ( ४ ) मूलस्तंभ: अध्याय १३ श्लोक ५९ पासून पुढें वगैरे अनेक शास्त्रांतून व ग्रंथांतून सांगितलेले याच प्रकारचे लोक देशपरत्वें ब्राह्मणवर्णात मोडतात. वरील गोष्टींचा समाजानें पूर्ण विचार केलेला असून देशपरत्वें या ज्ञातीस, उज्जनीकडे कृष्णयजुर्वेदी, बऱ्हाणपूरकडे ब्राह्मण, दक्षिणेकडील प्रांतात अनेक शाखेचे ब्राह्मण, १ खानदेश, २ वऱ्हाड, ३ नागपूर वगैरेकडे कृष्णपक्षी विदूर वगैरे नांवें अज्ञानानें धारण केलेलीं होतीं; परंतु तीं ( १-२-३ नांवें ) त्याज्य समजून **इत:पर ब्राह्मण म्हणावें असा ठराव निरनिराळ्या प्रांतांतील समाजानें केलेला आहे**, आणि त्यास श्रींचे कृपाप्रसादानें वळ आणल्यानें अनुमोदनार्थ सेवेसीं सादर केला आहे.

४

## कृष्णराव पांडुरंग भारद्वाज ( ऊर्फ लोखंडे )

महाराष्ट्रीय ( विपंक ) ब्राह्मण परिषद् प्रचारक मूर्तिजापूर ( वऱ्हाड )

भारतीयांस हल्लींच्या अत्यंत कनिष्ठ गुलामगिरींतच समाधान मानावयास लावून परस्परांतील ज्वलत द्वेषमूल व्यवहारानें ही गुलामगिरी भारतीयांवर लादण्यास व तिची संवय होऊन तींतून मुक्त होण्याच्या संघटित प्रयत्नाकडे दुर्लक्ष करण्यास, ज्या स्वार्थ बुद्धीनें व जातिमात्सर्यानें संधि दिली व ही हीन स्थिति यावच्चंद्रदिवाकरौ कायमची करितां येण्यास व्यवस्थास ज्याची मदत होत आहे, ह्या दुर्गुणाचें मूळच आतां योग्य विभूतीच्या प्रयत्नानें उपटलें जाऊन त्या जागीं देशभक्ति व तदर्थ स्वार्थत्याग व बंधुप्रेम याचें बीज रुजणार असा बळकट भरंवसा उत्पन्न झाला आहे.

या संधीस आमचेंहि बहुतां दिवसांचें गाऱ्हाणें आपल्यापुढें उघडपणें पण नम्रतापूर्वक मांडण्यांत येत आहे, तें असें:—

( १ ) आमचे पूर्वज मूळचे निरनिराळ्या शाखेचे विद्वान ब्राह्मण असून आमचीं गोत्रें, प्रवरें, शाखा, आचारविचार व वृत्ति वगैरे सर्व त्यांच्याच चालू आहेत.

**( २ ) निरनिराळ्या कारणांनीं पुढें पुढें विपंक्त पडून निरनिराळ्या प्रदेशांत त्यांना जाऊन वसावें लागलें.**

( ३ ) पुष्कळ दिवसांच्या विपत्तीतेनें त्यांची संख्या फारच कमी झाली.

( ४ ) संख्या वाढविण्यास असल्या परिस्थितींत ब्राह्मणांच्या अनुलोम कन्या वरण्याशिवाय वेदशास्त्रसंमत असा दुसरा मार्गच उरला नाहीं. तेव्हां तो मार्ग त्यांना निरुपायानें स्वीकारणें भाग पडलं. व क्रमाक्रमानें सर्व व्यवहारहि अर्थातच ब्राह्मणांच्या अनुलोम संततीबरोबर स्वाभाविक रीतीनें चालू झाले; असें होतां होतां त्यांस योग्य मार्गदर्शक पुरोहित नसल्यानें उत्तम ब्राह्मण असतांहि सध्यांचें निर्नाम व निर्बंधन स्वरूप प्राप्त झालें आहे.

( ५ ) उपनयनादि सर्व संस्कार समाजांत रूढ आहेत.

( ६ ) कोणतेंहि विवक्षित शास्त्रसंमत नांव सध्यां या समाजास नाहीं. निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या अशास्त्र व अव्यवहार्य व तिरस्कारार्ह नांवांनीं समाजांतील लोक संबोधिले जात असल्यानें अपमानजन्य द्वेषाची दर्भमूळें परस्परांच्या अंतःकरणांत अधिकाधिक खोलच जात आहेत.

( ७ ) वेदे का संबंधानेंहि कुठें कुठें विनाकारण वाद उत्पन्न होतात.

( ८ ) आमच्याशीं व्यवहार करूं इच्छिणाऱ्या ब्राह्मणबंधूंस उघडपणें तसें करण्यास अडचणी आणल्या जातात.

( ९ ) आमचें नांव, शाखा, शिखा, सूत्र, संहिता वगैरे अवश्य गोष्टींचे निर्णय व नियमन देशकालानुरूप होऊन ब्राह्मणवर्गाशीं परस्पर व्यवहार होण्यास संमति मिळावी.

( १० ) सर्व समाजांत जागृति उत्पन्न होऊन आपले ब्राह्मण्य व तदंतर्गत सर्व संस्कार आणि हक्क यांचें संरक्षण करण्याकरितां व ते प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याकरितां योग्य सनदशीर व संघटित मार्गानें पूर्ण प्रयत्न करण्याचे सर्वतोमतानें समाजाच्या सर्व संस्थांकडून ठरविण्यांत आलें आहे.

( ११ ) वरील सर्व गोष्टींचा काल देश वर्तमानाप्रमाणें योग्य विचार होऊन आमच्या अंतःकरणांतील हें किल्मिष कायमचें दूर होऊन आमच्या सदरील ठरावास श्रींच्या कृपाप्रसादानें अनुमोदन मिळून ब्राह्मणांच्या या पोटभेदाचे सर्व व्यवहार ( कांहीं बाबतींत तरी ) सर्व ब्राह्मणवर्गाशीं माननीय रीतीनें होऊन वैदिक धर्मोन्नति व भारतीय दास्यमुक्ति या महत्वपूर्ण कार्याकडे आमच्या संघटित तनमनधनाचा उपयोग होऊन आमच्या सन्मान्य बंधुवर्गाबरोबर मुक्तांतःकरणानें सहकार्य करण्यास आमचीं मनें उत्तेजित हो-

तील अशीच श्रींची अनुमोदनाशेची अपेक्षा धरून सेवेशीं नम्रपणें विनंति केली आहे.

५

## गोविंद बापूजी सप्रे अकोला—वऱ्हाड

वर्णव्यवस्थेच्या व्यतिरिक्त ज्या ज्या जाती आहेत, त्या सर्व आपआपल्या परी आनंदानें व उल्हासवृत्तीनें वागतात. मात्र आमच्या विदूर जातीच्या दुर्भाग्यामुळें जातींचें खरें नांव—ज्या ब्राह्मणावर आमचें अस्तित्व अवलंबून आहे. त्यांनीं न दाखविल्यामुळें—व्यक्तीचेंच नांव जात म्हणून अस्तित्वांत आणलें आहे. ही जात व्यक्तीचे नांवावर प्रसिद्धीस आलेली आहे. हल्लीं जीं आमच्या जातीस ग्रंथांतरीं नांवें सांपडतात त्यांचें वर्णन:—

१ विदूर, २ कृष्णपक्षी, ३ निषाद, ४ पार्शव, ५ ब्राह्मणजे, ६ महाशूद्र, ७ सदाचरणीशूद्र, ८ द्विजबंधु या या प्रकारचीं नांवें दिलेलीं आहेत.

कोणत्याहि जातीस इतकीं नांवें नसतील, ह्मणून आम्ही कोण हेंच आसचें आह्मांस कळेना.

हल्लीं जी आमची स्थिति शूद्रापेक्षांहि नीच मानली जाते ही बाब प्रमाणाविरुद्ध आहे.

पूर्वी आमचा ब्राह्मणांशीं रोटीबेटीव्यवहार होता.

आतांपर्यंतच्या प्रमाणशीर पद्धतीवरून आम्ही ब्राह्मणवंशापासून उत्पन्न झालेले ब्राह्मण ठरत असून सर्वाधिकारी ठरतों.

आतां विज्ञप्ति कीं आह्मांस अज्ञानदशेंत ठेवून जो आमचा निसर्गहक्क लपवून टाकिला आहे तो आमचा आह्मांस मिळावा. आमची मागणी अन्यायाची नसून पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीस अनुलक्षून आहे. वेदापर्यंत सुद्धां आमच्या ब्राह्मण जातीचा प्रवेश झाला आहे.

६

## लक्ष्मण विठोबा बुरुड; सितावर्डी—नागपूर;

क्षत्रिय बुरुड ज्ञातीचे लोक इकडील प्रांतांत तेलगु व मराठे असून क्षत्रिय बुरुड अस्सल आहेत. या ज्ञातीची उत्पत्ती भृगु अंगीरस ऋषीकुलांत झालेली आहे.

.शि. प्र. मंडळी ग्रंथसंग्रह 879

पूर्वी एकाच समाजांतील लोक हीं सर्व कामें करीत असत. पुढें वर्णभेद झाला व राज्यपरिस्थितीनुरूप व शिक्षणाचे अभावीं आमच्यांत अध्ययनादिक कर्मे प्रचलित नाहींत. करितां या क्षत्रिय वुरुड ज्ञातींतील अस्सल वुरुड तेलंगे यांना क्षत्रिय धर्मप्रमाणें संस्कारादि विधि करण्यास हरकत नाही असा ठराव पास करावा. संस्कार विधि करून घेण्याचा या ज्ञातिमंडळीचा फार फार हेतु आहे. व हा हेतु पूर्ण झाल्यास या परिषदेचे फार फार आभारी आहों. ही विनंति.

७

## पुरुषोत्तम रामचंद्र वैद्य.

श्रीपाद पूज्यपाद जगद्गुरु व हिंदु धर्माभिमान्यांनों--मी आज आपली एक करुणकहाणी आपणांपुढें मांडीत आहें तिचा आपण सहानुभूतिपर विचार करून आपणांवर कोसळत असलेल्या आपत्तींतून मुक्त करण्याचा कांहीं उपाय काढाल अशी आशा आहे. सुमारें ५ वर्षांपूर्वी मी व माझा एक स्नेही वामन गद्रे असे दोघेजण कोकणांतून मुंबईस आलों. तेथें अभ्यंकर व कुलकर्णी या नांवाचे २ इसम भेटले व त्यांनीं तुमची सर्व व्यवस्था करितों असें सांगितल्यावरून आम्हीं त्यांचेबरोबर एका आश्रमाकडे गेलों. तेथें गेल्यावर रे. के. जोशी या इसमास आमची सर्व हकीकत सांगितली. तेव्हां ते म्हणाले, ऑल राइट आपणांकडे त्यांना ठेऊन घ्या. नंतर त्यांनीं आमची तेथें उत्तमप्रकारें व्यवस्था करून दिली.

दोन महिने गेल्यानंतर तेथील एका पाद्यानें आमच्या डोक्यावर पाणी शिंपडलें व सांगितलें कीं तुम्ही आतां ख्रिस्ती झालांत. नंतर आम्ही तेथून एकदम निघून गेलों.

नंतर आजचे अध्यक्ष श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य यांचे चरणीं आमच्या धर्मांतरासंबंधींचा एक अर्ज सादर केला. पुढें नागपूरच्या महाराष्ट्र पत्रकर्त्यांनीं आमची गोष्ट जाहीर चर्चेसाठीं ठेवून लोकमान्यांच्या विचारासाठीं प्रत्यक्षतः त्यांच्यापुढें मांडली, तेव्हां ते म्हणाले कीं, असली एखादी धर्मपरिषद भरवून तेथें अजाणपणामुळें येणारा धर्मांतराचा आरोप नाहींसा केला पाहिजे.

आजरोजीं लोकमान्यांच्या मनांत असलेला हा प्रश्न श्रीसारख्या धर्माधिकाऱ्यांच्या चरणीं व या परिषदेंत जमलेल्या हिंदुधर्माधिकाऱ्यांकडे विचारार्थ

पुनः ठेवीत आहोंत.

तेव्हां आपण सर्वांनीं आम्हांवर आलेलें हें धर्मांतराचें किटाळ काढून आम्हांला परत आमच्या जातींत पावन करून घ्यावें अशी आशा आहे.

८

झिपरू गोविंदशेट बात्तिसकर, पिंपरडेकर, भडगांव पूर्वखानदेश.

१ हल्लीं आपले समाजांत धर्मोन्नतीसाठीं श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य महाराज यांनीं काय उपाय योजिले पाहिजेत असा प्रथमांकीं प्रश्न आहे. धर्मोन्नति व समाजोन्नतिचे मार्ग अनादिकालापासून जनतेसाठीं खुले करून ठेवेलेले आहेत. असें असून धर्माची व समाजाची अवनति दिवसेंदिवस होत चालली आहे. याचें कारण समजुतीचा घोंटाळा व द्वेष वाढल्यानें झाली असावी. तरी श्रींनीं आह्मा अज्ञानी जनावर दयेची कृपादृष्टि फिरवून काल व परिस्थिति आणि सृष्टीचा क्रम लक्षांत आणून चातुर्वर्ण्यांनीं आपापल्या ऐपतीप्रमाणें आपापल्या सोयीकरितां धर्मबंधनांचे कायद्यांत पदरचे विचार घातले असतील ते श्रींनीं काढून समाजबंधनांचे कायदे स्वयंभू जनतेपुढें मांडावे.

२ हिंदु समाजांत निरनिराळ्या जातींत वाद उत्पन्न होतात ! याचें कारण असें कीं, समजुतीचा घोंटाळा झाल्यानें परस्परद्वेषाग्नीचा डोंम पाजळला त्या वेळेस खरी समजूत घालून ज्यांचा त्यांचा अन्याय त्याच वेळेस समाजाचे निदर्शनास न आणल्यामुळें हा द्वेषाग्नि आजतागायत तसाच पेट घेऊन सारखा पसरत आहे. तरी आतां समजूत घालून वाद मिटवावा.

शिवाय कोणत्याहि तऱ्हेचे अहीरशिंपी ज्ञातींतील बखेडे श्रींच्या कानीं आले असल्यास त्यांची विल्हेवाट श्री ज्या मार्गानें लावतील तो मार्ग आह्मांला कबूल आहे.

९

नारायण हैबती मिस्त्री पांचाळ सुतार, नाशिक.

पांचाळ सुतार सर्व जातीतर्फे—आतांपर्यंत आमचे अज्ञानामुळें आमच्या घरचे देवधर्म, श्राद्धपक्ष व इतर धर्मकृत्याच्या बाबी या सर्व गोष्टी कांहीं वर्षांपासून या भिक्षुक वर्गाकडून करवीत आहों व कांहीं वर्षांमागें आमचे पूर्वज आमचे आमच्यांत करीत होते असें आमच्या निदर्शनास आल्यावरून आम-

च्यांतील कांहीं लोक शिक्षण मिळवून या वरील गोष्टी पूर्वीप्रमाणें आमच्या आमच्यांतच कराव्या असा विचार करून त्याजबद्दल शिक्षण शिकत आहेत व कांहीं लोक भिक्षुक कर्म करीताहि आहेत. यावरून भिक्षुकवर्गांत व आमच्या पांचाळ वर्गांत कलह होण्याचा संभव आहे.

सर्व धार्मिक गोष्टी पूर्वीप्रमाणें आमच्या आम्ही कराव्या असा विचार मनांत येऊन आमचे लोक कांहीं गोष्टी करूं लागले आहेत. तरी असा अधिकार पांचाळवर्गास आहे किंवा नाहीं याचा खुलासा व्हावा.

आमच्या उभयतांचे तंट्याचें निवारण आमच्याच पित्यानें करावें. दुसऱ्यानें करूं नये, व आमचें उभयतांचें प्रेम चालत असलेलें कायम राहून श्रीनें योग्य निकाल द्यावा.

हा घरचा तंटा घरींच मिटावा व आमचे सर्व हक्क आमचे आह्माकडे राहावे ह्मणून श्रीचरणाजवळ विनंति करीत आहों.

---

## परिशिष्ट ३.

# स्त्रियांकडून आलेले निबंध.

### १

### कु. दुर्गाबाई खर्डीकर.

**श्रीमतां तत्र भवतामध्यणाक्षाणां सभासदां सनम्राः प्रणतिपरंपराः।**

धारणाद्धर्ममित्याहुः।

अस्मिन् जगति यद्यपि नानाविधधर्माः संति, तथापि तेषां ध्येयमेकमेव जगदुद्धारणरूपम्। अखिलधर्माः स्वधर्मनिष्ठान् परं स्थानं प्रापयंति। मानवानामत्युन्नतसात्विकमनोवृत्तयो जागृताः कृत्वा मनुष्यत्वस्य पूर्णावस्थां प्रापयितुं धर्मा एव समर्थाः। अंतस्तेषां नियमाः प्रगतिविरोधिनः केवलमंधश्रद्धया पालनीयास्तत्त्वरहिताश्च न भाव्याः।

सर्वधर्मेष्वार्यधर्मोऽत्युदारतत्त्वतया श्रेष्ठ इति वदंति। परं तस्मिन्नपि क्वचित् क्वचिदुन्नतिविरोधित्वं दृश्यते। कदाचित्सदोषः परिस्थित्यनुरूपं तस्मिन्यत्परिवर्तनमुचितं तस्याभावतः स्यात्

धर्मजागृतौ प्रयतमानाजना ज्ञानमहिमानं ज्ञास्यंति, ज्ञानं भजमानाः स्वातंत्र्यमहिमानं प्रतिप्रवणा भविष्यंति, स्वातंत्र्यपुरःसरं विचारयंतो नवं नवं पदार्थमाविष्कारायिष्यंति। नहि जीवात्मने स्वातंत्र्यादन्यत्किंचन रोचते। "सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम्"। सर्वात्मप्रत्यक्षोऽयं विषयः। नेदं मम नवीनं मतमस्मद्देशवासिविदुषामाशयः केवलं नम्रतया प्रकटीकृतः।

अज्ञानता सर्वानर्थानां मूलमिति सर्वैरसैर्व्यवस्थितम्। तथापि सास्मान् स्त्रीजनान् त्यक्त्वा न गता, अनेकशतवर्षेभ्यो विद्यामृतपानाद्वञ्चिता स्मः। संप्रति यत्किंचित् ज्ञानमित्यस्माभिर्गृह्यते तस्मै ज्ञानसंज्ञा न शोभते। यस्मिन् धर्मे ज्ञानेन पुरुषा उन्नतिपथमारोहन्ति तस्मिन् किं स्त्रिय आरोढुं न शक्ताः!

तदर्थो नेदं स्त्रीजन्म नेयं जन्मसार्थकताच। ईश्वरेणास्माकं या बुद्धिरात्मशक्तिश्च प्रदत्ता। तस्याः कोऽप्यपरोऽभिप्रायः। परं सोऽज्ञानेनास्माभिर्व्यर्थीकृतः।बुद्धिवैभवैर्युक्तोऽपि स्वयात्मा समुचित विनियोगरहितो न किमपि शुभं संपादयितुं कल्पते। "कार्ये शक्तेरविनियोग एव शक्तिविनाशनम्। क्रमशः साहि शक्तिरविनियुक्ता क्षीयते। तीक्ष्णाप्यसिधारा कोशे स्थापिता चिरकालमप्रयुक्ता मलिनायते नवनीतमपि छेत्तुंनालम्। यथा यथैताः शक्तयः कार्येषु विनियुज्यंते तथा तथा तासां सामर्थ्यमुपचीयते

यथा बालो भावी राष्ट्रपुरुषः समाजघटकश्च तथा कन्यकापि भावि राष्ट्रमातासमाज घटकाच राष्ट्रोन्नतिदृष्ट्या द्वावपि समानौ। भारतानुशासनपर्वे एकस्मिन्स्थले एवमभिहितमस्ति "यथैवात्मा तथापुत्रः पुत्रेण दुहिता समा"

येन सामान्यतः सामाजिकजीवनार्थं सर्वांगेण सर्वांगपूर्णं भवितुं शक्यं तच्छिक्षणम्। पूर्वपरंपरया यच्छिक्षणमलभत तदास्मिन् परिवर्तितकाले परिवर्तिन्यामवस्थायां न क्षमम्। मानवाजुभवो ज्ञानश्च यावत्प्रमाणेन वृद्धिं याति तावत्प्रमाणेन शिक्षणव्याख्यापरिवर्तनं भवति। मानवस्य प्रगत्या सहवृद्ध्या च शिक्षायां यो विवि-

यविषयाणां समावेशो भवातिसोऽपरिहार्यः। व्यवहारे यत्कार्यकारि भाविजीवनसुखेन व्यत्येतुं नवयुगेन सह स्पर्धितुं वा यदुपयुक्तं तच्छिक्षणं प्रतिदिवसं महतीं प्रापयिष्यति। अतः प्रथमे वयासि भाव्यायुष्यं यावच्छक्यमधिकं कर्तव्यप्रवणं कर्तुं शिक्षया प्राक्सिद्धता भवति। राष्ट्रोद्धारकाः स्त्रियः पुरुषाश्च निर्मातुं सुशिक्षा एकैव समर्था।

स्त्रीपुरुषयोः समाजसेवा रक्षणं च समानो जीवनोद्देशः। परं तमुद्देशं साधयितुं गुणप्रकृतिभिन्नतया तयोर्द्वयोरपि मार्गौ भिन्नौ। तयोः कर्तव्यक्षेत्रमप्यन्यतरम्।

स्त्रीपुरुषशब्दौ न केवलं लिंगभेदं दर्शयतः। अपित्वनेक गूढ पवित्रशाश्वतविशिष्ट गुणसंपत्तीनां स्वभावविशेषाणांच बोधकौ भवतः। प्रेमदयाश्रद्धाशाशुश्रूषा स्वार्थत्याग जननीत्वे त्यादीन्मानवसुस्थितिजनक गुणाधिक्यान् स्त्रीगुणसंपत्तिवदंति सा धैर्यादि पुरुषगुण संपत्तिं पूरयति। स्त्रीगुणसं पत्तिवर्द्धनायानुकूला सुंदरसुकुमारातनुः पवित्रा वृत्तिः प्रेममयहृदयं च निसर्गेण ताभ्यो दत्तम्।

सामान्यतः कन्या शिक्षाया मुख्य ध्येयं सुगृहिणीत्वमेव भवितुमर्हति। स्त्रीगुणसंपत्तिं सफलीकर्तुं गृहं कुटुंबंच क्षेत्रमावश्यकम्। तासां कर्तव्यानां गृहं केन्द्रं समाजसेवा परिघः। स्त्रीपुरुषौ स्वस्वविशिष्टक्षेत्रे परस्परेभ्यः श्रेष्ठा एव। क्षेत्रयोः परिवतनं पात्रत्वमेव सम्पादयति। समाजकार्यार्थं स्वगुणसम्पत्ति परिवर्द्धनं परस्पर संततं करणीयम्। तदेवाहितपरिणामि भवेत्। सामान्यव्यवहारेऽपि विविधकार्येषु व्यापारेषु च जनैर्यत्प्रावीण्यं संपादितं तद्विशिष्टथकरणस्यैव फलम्।

अभ्यासक्रमः प्राच्यार्वाचीन शास्त्रसंमेलनात्मको भाविजीवनोपयुक्तः स्वभाषामय एवेष्टः। कन्या शिक्षाया नवीना परिपाटी संप्रत्यस्माभिर्यदिनांगीक्रियते तर्हि पाश्चात्येभ्यो वयं ज्ञाने निकृष्टतमा भवेयुर्दीनतरांच दशां भजेमहि। इदानीमहरहस्तत्त्वज्ञा नूतनं नूतनमाविष्कारं कुर्वंति। अनेकाभिनवोदया विद्याश्चाविर्भवंति। अतस्तद्विषयक प्राथमिक ज्ञानं कन्याभ्योऽवश्यं देयम्। शास्त्रीयचिकित्सकाशिक्षया तेषामज्ञानं नश्येत।

नवीनायाः परिस्थित्या आदर्शभूताः सुगृहिणीमातृजननीभगिन्यो येन भवितुं शक्यास्तत स्त्रीशिक्षणम्।

कन्याशिक्षणे मुख्यतो गृहशिक्षणं श्रेष्ठम्। तस्मिन् गृहशिक्षणे गृह--कुटुंब-संवर्धनमारोग्यज्ञानं--आरोग्यवर्द्धकपाकशास्त्रज्ञानं--बालसंगोपनं-शुश्रूषाशास्त्रं बालशिक्षण-स्वयारोग्यं-मितव्ययता-गृहव्यवस्था एते विषया अंतर्भूता भवंति।

अद्यतनपठनविषयबाहुल्यादौदासिन्याच्च संस्कृतभाषाध्ययने कालं यापयितुं न शक्नुवंति। संस्कृतभाषाज्ञानाविना प्राचीनेतिहासः कथं ज्ञातो भवेत्। स्वपरदेशेतिहासः प्राचीनसंस्कृतिश्चेतत् द्वय कुमारीभिरवश्यमेव ज्ञातव्यम्।

विवाहसंस्कारो न केवलं स्त्रीपुरुषसुखहेतुः। किंतु निसर्गकार्य-व्रताय गृहीता निरुपमस्वार्थत्यागदीक्षैवास्तीति मन्ये।

पुराणानि सन्त्यनेकानि निदर्शनानि यानि स्त्रीणां ब्रह्मज्ञानं वेद-ज्ञानंच दर्शयंति.

यथा खलु पंचमहाभूतानि सर्वेषां सुखार्थमेव सृष्टानि तथैव वेदा अपि जगद्धितार्थमेवाविष्कृता इत्यत्र कः संदेहः। अतो यस्य कस्यापि जनस्यस्याद्बुद्धिविशेषः स एव तत्राधिक्रियते। तत्र पुरुषत्वं स्त्रीत्वमित्येतच्चाकिंचित्करम्।

स्त्रीणामपि बुद्धिर्यथाविधि विनियुक्ता सती बलिष्ठा तीक्ष्णा सूक्ष्मा सूक्ष्मातिसूक्ष्मतत्त्वावगाहिनी भवति। विधात्रा स्त्रीपुरु-षाणां बुद्धिसामर्थ्ये किमपि न्यूनाधिक्यं नोत्पादितम्। ब्रह्मचा-रिण्योऽपि स्त्रियः समाजे उत्तरोत्तरभाविन्यां प्रगत्यां स्त्रीगुणस-पत्त्या सहायिन्यो भविष्यंति।

कुतोऽप्येष बुद्धिसंस्कारोविनष्टः। परं संप्रतिसःपुनरुज्जीवितव्यः।

अतः खल्वत्र विचारशालिनां निर्णयो नितांतमपेक्ष्यते। अत्र किमनेन रूढीविपरीतेन विवादास्पदेनेतिमत्वा तत्रभवद्भिः श्रीम-द्भिर्नौदासितव्यम्॥

२

सौ. मनुताई खापर्डे.

हल्लींच्या काळीं, आपल्या आर्यलोकांनीं घालून दिलेलीं, गृहिणींचीं कर्तव्यें कोणी करीनातशा झाल्या आहेत. पूर्वीचे सर्व संस्कार बदलून त्या जागीं पा-

श्चात्य रूढी दृढ होऊं लागल्या आहेत. सर्वच समाजांत छानछोकी वाढल्या मुळें स्त्रिया स्वैर वागूं लागल्या आहेत. सध्याचा कष्टतर जीवनकलह सुखा-समाधानानें पार पाडण्या इतका शहाणपणा व पोंच हल्लींच्या स्त्रियांमध्यें राहिला नाहीं. धड संसार नाहीं, शिक्षण नाहीं, देवधर्म नाहीं अशी त्रिशंकू-प्रमाणें अवस्था झाली आहे. आपली परंपरा व आपलेपणा विसरण्यास शिकविणारें शिक्षण बदलून स्त्रियांस पूर्वीच्या गार्गी मैत्रेयीप्रमाणें विद्वान व संसार-दक्ष करणारें शिक्षण जगद्गुरुपीठकांडून मिळावें.

( १ ) पुनर्विवाह हा गौणपक्ष आहे तरी अधःपातापेक्षां पुष्कळ बरा, तरी पण त्यांत कांहीं तरी वयाची अट असावी. व तो शास्त्रानें संमत असावा.

( २ ) सती जाणें ज्याच्या त्याच्या मर्जीवर ठेवावें, तथापि ईश्वरानें दिलेलें आयुष्य असें फुकाफुकी घालविल्यानें त्याची आज्ञा मोडल्याचें पातक लागेल, यापेक्षां आयुष्याचा व्यय सद्धर्मानें वागण्यांत व आत्मप्रतिती घेऊन मोक्ष मिळविण्यांत करावा.

( ३ ) मुलींना अगदीं लहानपणापासून अशा तऱ्हेचें आध्यात्मिक शिक्षण प्रामुख्यानें द्यावें. व याचें शिक्षण देणाऱ्या सर्व संस्था धर्माध्यक्षांच्या हातीं असाव्यात.

## ३

## सौ. सहकारी भगिनी — नाशिक.

## सौ. यशोदाबाई भिडे.

( १ ) बुद्धिमान स्त्रियांना धार्मिक शिक्षण देऊन त्यांचे हस्तें बाकीच्या स्त्रीवर्गाची उन्नति करण्याकरितां गुरुकुलाप्रमाणें शहरापासून दूर अशा निरामय जागेंत मठ उघडावेत व त्या मठाचे दरवाजे सर्व दर्जाच्या स्त्रियांस सर्रास मोकळे असावे. तेथें उत्कृष्ट शिक्षण द्यावें. असें केल्यानें पुनर्विवाहाकडे प्रवृत्ति कमी होईल.

( २ ) समाजानें कांहीं विविक्षित मर्यादा ठरवून तेवढ्या वयांत जर पति निवर्तला असेल तर बालविधवांना विवाह करण्यास संमति मिळावी.

( ३ ) वयोमर्यादा उलटून गेल्यावर जर कांहीं प्रसंग गुजरला तर त्या स्त्रियांनीं केवळ संन्यस्त वृत्तीनें राहून आत्म्याचा मोक्ष गांठावा आणि इतरांसहि या भवसागरांतून तरण्यास साहाय्य करावें.

४

## श्री. काशीबाई कानिटकर, काशी.

( १ ) ब्राह्मण स्त्रियांच्या स्त्रीधनासंबंधानें कांहीं तरी व्यवस्था करून तसा निर्बंध शास्त्रांत घालावा.

( २ ) सध्यांच्या बदललेल्या कालांत स्त्रियांना शूद्राप्रमाणें गणणें गैर आहे त्यासंबंधीं औदार्ययुक्त विचार करावा.

( ३ ) पारमार्थिक मार्ग दाखविण्यास स्त्रियांना पतिशिवाय अन्य गुरु नाहीं पण पति पिता अगर ज्येष्ठ भ्राता हे जर जडवादी असतील तर तिनें कोणता मार्ग स्वीकारावा ?

( ४ ) स्त्रियांना वेदाधिकार असावा, स्त्रियांना करणें असेल तर एकाद्या स्त्रीनेंच मंत्रोपदेश द्यावा.

५

## सौ. कमलाबाईसाहेब किबे, इंदूर.

( १ ) स्त्री जातीची अवनती काढून टाकून त्यांचा बौद्धिक, मानसिक, शारिरिक दर्जा वाढवावा, त्यांचे सध्यांचें विदेशी शिक्षण बंद करून मातृभाषेंत शिक्षण द्यावें. तें शिक्षण तेजस्वी व राष्ट्रीय विचाराला पोषक असें असावें.

( २ ) मुलींकरितां एक शाळा समर्थ विद्यालयासारखी असावी. तेथील अभ्यासक्रम मुलांच्या अभ्यासक्रमापेक्षां भिन्न असावा, व्यवहार ज्ञान, समाजरचना वगैरे विविध व उपयुक्त विषय तेथें शिकविले जावेत.

( ३ ) एकपत्नी जीवंत असतां दुसरें लग्न पुरुषांनीं करूं नये, धर्माचा या गोष्टीला निर्बंध असावा तसेंच जरठ कुमारी विवाह सध्यां रूढ आहे तो ताबडतोब बंद करावा—प्रथम पत्नी मृत असून दुसरा विवाह करणेंच असेल तर वयाची मर्यादा ४० वर्षांचे आंत असावी व तत्पूर्वी जातींतील ४ पंचांमार्फत प्रथम पत्नीपासूनच्या मुलाबाळांची व्यवस्था लावावी. पुरुषांनीं फारतर २ विवाहांपेक्षां जास्त विवाह करूं नयेत.

६

## कु. दुर्गाबाई नेने.

( १ ) जालंदर येथें स्थापन झालेल्या कन्या महाविद्यालयाप्रमाणें शाळा स्थापन कराव्यात, ७ व्या वर्षापासून त्यांत मुली घ्याव्या. व ७ वर्षेपर्यंत त्यांना सर्व विषयांचे ज्ञान द्यावें.

( २ ) पुरुषांनीं स्त्रियांना टाकून देऊं नये. दोघांमधील तंट्याचा निकाल जगद्गुरुकडून करून घ्यावा. ३५ च्या पुढील विधूर पुरुषांनीं पुनर्विवाह करावेत, लहान कुमारिकेशीं लग्न करू नयेत. पुनर्विवाहासंबंधीं समाजाचीं मतें घ्यावींत त्यांत वृद्धांना मताधिकार असूं नये. केशवपनाची चाल एकदम बंद करावी व सकेशा विधवेला अपवित्र मानूं नये. स्त्रियांनीं अन्य गुरु करण्याच्या नादीं लागूं नये. व धर्मानें त्याला प्रतिबंध करावा. लग्नाची वयोमर्यादा वाढवावी. कोणी अविवाहित राहिल्यास त्याला शास्त्राची संमती असावी.

७

## श्री वारुबाई कागलकर.

( १ ) पति निधनानंतर सती जाणें कायद्यानें बंद केलें आहे म्हणून पतीच्या पश्चात् स्त्रियांनीं साधेपणानें व विरक्तवृत्तीनें राहावें. केशवपन केलें असतां नटेवपणाकडे प्रवृत्ती होत नाहीं म्हणून तें रूढ असावें.

( २ ) निवृत्तिमार्गाचें स्त्रियांना शिक्षण देणारी व केवळ स्त्रियांनीच चालविलेली अशी एक संस्था असावी, त्यांत विधवा स्त्रियांना प्रथम प्रवेश असावा. तेथें स्त्रियांनीं पूर्ण ज्ञान प्राप्त होईपर्यंत रहावें.

८

## सौ. राधाबाई जहागीरदार.

( १ ) सहगमनाचा हक्क परत मिळावा. जरठकुमारी विवाह व पुनर्विवाह बंद व्हावेत पुरुषांनीं २ लग्नें करूंनयेत. केवळ स्त्रियांच्या करितां एक धार्मिक शाळा काढावी. हुंड्याची चाल बंद करून टाकावी. विवाहाची वयोमर्यादा निश्चित करावी.

९

## एक करवीरस्थ भगिनी.

स्त्रियांना सहगमनास असलेली आडकाठी काढून टाकावी. मतलबी पुरुषांनीं उत्पन्न केलेली स्त्रियांची सुधारणा काढून टाकावी, स्त्रियांना स्त्रियांचा धर्म आचरण्यास परवानगी असावी. कुमार्गगामी पुरुषांना धर्माध्यक्षांनीं शासन करावें. भोळ्या भाबड्या बायकांना धूर्त लोकांच्या जाळ्यांतून सोडवावें.

१०

## कन्या यमू-

विधवांनीं पुनर्विवाह न करितां उरलेलें आयुष्य समाजसेवा, देशसेवा करण्यांत घालवावें, मोहापासून परावृत्त होण्याकरितां केशवपन वगैरे सर्व विधी कायम ठेवावेत. परमार्थाकडे लक्ष लावणाऱ्या स्त्रियांकरितां एक मठ स्थापावा व तेथेंच त्यांची राहण्याची सोय व्हावी.

११

## बारूबाई शेवडे, हिंगणें.

विधवेनें विवाह केला तर तो धर्मानें संमत मानला जावा. ज्याप्रमाणें पुरुषांचा द्वितीय विवाह धर्मबाह्य मानला जात नाहीं त्याचप्रमाणें आमचें स्त्रियांचेंहि असावें.

विधवांना धार्मिक कृत्यें करतां येत नाहींत; त्यांनीं जवळ जवळ अस्पृश्य वर्गाप्रमाणें राहिलें पाहिजे हा जो त्यांच्यावर धर्मानें निर्बंध घातला आहे तो योग्य नाहीं.

# परिशिष्ट ४.

## महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद् नाशिक.

### शके १८४२

आश्रयदाते, हितचिंतक, स्वागत समिती व सामान्य सभासदांचीं नांवें.

### आश्रयदाते.

| | | |
|---|---|---|
| १ रा. रा. नरहर गोपाळ शेट, | २५ | नागपूर |
| २ शेट रामनारायण रामप्रताप | २५ | चिखली |
| ३ पुंडु बाबा शेट वाणी | २५ | बेज |
| ४ सरदार रामराव लक्ष्मणराव हिंगणे | २५ | चांदोरी |
| ५ श्री. गंगाराम छबीलदास | ५१ | येवलें |
| ६ शेट विष्णुदास मोहनदास | २५ | येवलें |
| ७ रंगिलदास देवचंद शेट | ३१ | येवलें |
| ८ सौ. अवंतिकाबाई गोखले | २५ | मुंबई |
| ९ रा. रा. कृष्णाजी विनायक वझे | २५ | नाशिक |
| १० श्रीमंत राजेसाहेब संस्थान जव्हार | १०१ | जव्हार |
| ११ श्री. प्रतापशेट | २५ | अमळनेर |
| १२ रा. रा. नारायण धोंडदेव भागवत | ५० | नाशिक |

### हितचिंतक.

| | | |
|---|---|---|
| १ रा. रा. एकनाथ खेमचंद शेटे | १० | येवलें |
| २ शेट मुरलीधर नथुशेट | १० | ,, |
| ३ श्री. नारायणराव लक्ष्मणराव सुकेणकर | १० | नाशिक |
| ४ रा. रा. लक्ष्मण गोविंद घाणेकर | १० | बडोदें |
| ५ शेट गिरधारीलाल नंदराम शेट | १० | सुकेणें |
| ६ रा. ब. गणेश रामकृष्ण दातार | १० | नाशिक |
| ७ शेट भागाप्पा विठोबाप्पा गुळवे | १० | ,, |
| ८ रा. रा. अनंत सिताराम शिखरे | १० | निफाड. |
| ९ ,, नारायणराव भगवंतराव बालाजीवाले | १० | नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | रावसाहेब कानिटकर | १० | ,, |
| ११ | रा. रा. दत्तात्रेय वासुदेव निमकर | १० | ,, |
| १२ | शेट छगनलाल दामोदर सराफ | १० | ,, |
| १३ | रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर | १० | सातारा |

## स्वागत समिति सभासद.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | रा. रा. | विश्वनाथ दादा गायधनी | ५ | नाशिक |
| २ | ,, | पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन | ५ | ,, |
| ३ | ,, | त्र्यंबक बाळाजी तेलंग | ५ | ,, |
| ४ | ,, | बनारदास कळंत्री | ५ | ,, |
| ५ | ,, | व्यवस्थापक पंचराज कवेरी | ५ | ,, |
| ६ | ,, | दयानाथ नारायणदास जगताप | ५ | मुंबई |
| ७ | ,, | बी. एस् कुपखेडकर | ५ | मालेगांव |
| ८ | ,, | कृष्णाजी रंगनाथ श्रोत्रीय | ५ | नाशिक |
| ९ | ,, | गोविंद नारायण बेलगांवकर | ५ | ,, |
| १० | ,, | बाळकृष्णपंत ठाकूर | ५ | ,, |
| ११ | ,, | गंगाप्रसाद पन्नालाल | ५ | ,, |
| १२ | ,, | अनंत बळशेट चुंबळे | ५ | ,, |
| १३ | ,, | विष्णु गणेश केळकर | ५ | ,, |
| १४ | ,, | रामचंद्र त्र्यंबक चिपळूणकर | ५ | ,, |
| १५ | ,, | केशव सखाराम शिंदेकर | ५ | ,, |
| १६ | ,, | शंकर गोपाळ कांडिले | ५ | ,, |
| १७ | ,, | गोपाळ अनंत शिवदे | ५ | ,, |
| १८ | ,, | छगनलाल विठ्ठलदास | ५ | ,, |
| १९ | ,, | रामचद्र हरि तळवळकर | ५ | ,, |
| २० | ,, | नाथ माधव | ५ | ,, |
| २१ | ,, | विठ्ठल सखाराम गाढवे | ५ | ,, |
| २२ | ,, | शंकर बळवंत शौचे | ५ | ,, |
| २३ | ,, | वामन चिंतामण मुळे | ५ | पिंपळगांव |
| २४ | ,, | कृष्णराव रघुनाथ तळेकर | ५ | ,, |
| २५ | ,, | हंसराज बुधाजी मिस्त्रि | ५ | लासलगांव |
| २६ | ,, | रंगनाथ नागेश शिरवाडकर | ५ | पिंपळगांव |
| २७ | ,, | कन्हय्यालाल वंकटलाल मिस्त्री | ५ | लासलगांव |
| २८ | ,, | मुरलीधर रामचंद्र मिस्त्री | ५ | ,, |
| २९ | ,, | नरसिंगदास चतुर्भुज | ५ | ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | ,, हिरजी पालजी गुजराथी | ५ | ,, |
| ३१ | ,, रामनाथ नारायण शेट | ५ | सायखेड |
| ३२ | ,, गुलाबचंद रामचंद शेट | ५ | ,, |
| ३३ | ,, किसन विठ्ठलसा शेट | ५ | ,, |
| ३४ | ,, भिकचंद रतनचंद शेट मारवाडी | ५ | चांदोरी |
| ३५ | ,, शंकर श्रीधर कोठेकर | ५ | नाशिक |
| ३६ | ,, निलकंठ पाडुरंग पाटणकर | ५ | नाशिक |
| ३७ | रा. रा. पंढरीनाथ विनायक साठे. | ५ | नाशिक |
| ३८ | ,, वासुदेव बापुजी अकूत | ५ | नाशिक |
| ३९ | ,, श्रीधर अबाजी देशपांडे | ५ | सिन्नर |
| ४० | ,, बाळाजी दाजी दावके | ५ | सिन्नर |
| ४१ | ,, अनंत रावजी कावळे | ५ | सिन्नर |
| ४२ | रा.सा. शंकर प्रभाकर जोशी | ५ | मालेगांव |
| ४३ | रा. रा. रामचंद्र गोविंद काशीकर | ५ | मालेगांव |
| ४४ | ,, लक्ष्मणराव पोफळे | ५ | मालेगांव |
| ४५ | ,, गणेश सखाराम हिंगे | ५ | मालेगांव |
| ४६ | ,, गोपाळ लक्ष्मण टिपरे | ५ | मालेगांव |
| ४७ | ,, गंगाधर हरी कुलकर्णी | ५ | पढेगांव |
| ४८ | ,, वसंतराव नारायणराव सुकेणकर | ५ | नाशिक |
| ४९ | ,, शंकर धुंडिराज वाघ | ५ | येवलें |
| ५० | ,, रामचंद्र भिकाजी झेंडे | ५ | येवलें |
| ५१ | ,, विनायक गोविंद वैद्य मुन्सफ | ५ | येवलें |
| ५२ | रावसाहेब ठकार | ५ | येवलें |
| ५३ | रा. रा. सदाशिव अण्णाजी जोशी | ५ | येवलें |
| ५४ | ,, शंकर गणेश झेंडे | ५ | येवलें |
| ५५ | ,, दत्तात्रय बळवंत थत्ते | ५ | येवलें |
| ५६ | वे. शा. सं. वामन केशव शास्त्री दातार | ५ | येवलें |
| ५७ | शेट खेमचंद रूपचंद | ५ | येवलें |
| ५८ | ,, नथुभाऊ बाळाराम शेट | ५ | येवलें |

| | | | |
|---|---|---|---|
| | रा. रा. नारायण गोविंद साठे | ५ | येवलें |
| ६० | ,, विष्णु मुरलीधर शेट | ५ | येवलें |
| ६१ | ,, वैजनाथ जिवाजी कुलकर्णी | ५ | नांदगांव |
| ६२ | त्र्यंबक गोपाळशेट | ५ | येवलें |
| ६३ | ,, बापु पुंजुशेट | ५ | नांदगांव |
| ६४ | ,, प्रल्हाद छोटुलालजी | ५ | नांदगांव |
| ६५ | ,, एकनाथ खेमचंदशेट व्यंकटीदास | ५ | येवलें |
| ६६ | ,, सदाशिव दामोदर बर्वे | ७ | येवलें |
| ६७ | ,, लक्ष्मण रामचंद्र सातभाई | ५ | येवलें |
| ६८ | ,, दामोदर बापुसा | ५ | येवलें |
| ६९ | ,, कृष्णाजी बळवंत महाबळ | ५ | नाशिक |
| ७० | श्री. मथुबाई जयवंतराव देशमुख | ५ | मुल्हेर |
| ७१ | रा. रा. नारायण कृष्ण आगाशे | ५ | सतारा |
| ७२ | ,, संपादक कर्मयोगी | ७ | धुळे |
| ७३ | ,, विश्वनाथ गंगाधर केतकर | ५ | नाशिक |
| ७४ | ,, नारायण सदाशिव शेट | ५ | गंगापूर |
| ७५ | ,, विनायक नारायण राजेंद्र | ५ | नाशिक |
| ७६ | रा. रा. त्रिंबक कृष्ण बुरकुले | ५ | नाशिक |
| ७७ | ,, महादेव यशवंत डोळे | ५ | नाशिक |
| ७८ | ,, रघुनाथ हरि गद्रे | ५ | ,, |
| ७९ | ,, लक्ष्मण गणेश नांदुरकर | ५ | ,, |
| ८० | डॉ. प्रल्हाद विष्णु काळे | ५ | ,, |
| ८१ | रा. रा. विठ्ठल पांडुरंग उपाध्ये | ५ | ,, |
| ८२ | ,, गोपाळ सीताराम ठाकूर | ५ | ,, |
| ८३ | ,, पद्माकर श्रीधर दीक्षित | ५ | पंचवटी |
| ८४ | ,, जनार्दन पांडुरंग अभ्यंकर | ५ | नाशिक |
| ८५ | ,, शंकर रामचंद्र श्रोत्रीय | ५ | ,, |
| ८६ | शेट किसनलाल चक्रपाणी | ५ | ,, |
| ८७ | रा. रा. महादेव नारायण सराफ | ५ | ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| ८८ | ,, सदाशिव बाबाजी शेट सोनार | ५ | नाशिक |
| ८९ | ,, माधव सीताराम भोंडे | ५ | ,, |
| ९० | ,, श्रीनिवास त्र्यंबक गोसावी | ५ | ,, |
| ९१ | ,, वे. शा. सं. सीतारामशास्त्री महाशब्दे | ५ | ,, |
| ९२ | श्री. सौ. सुंदराबाई भगवंतराव राजेबहादुर | ५ | ,, |
| ९३ | वे. शा. सं. वासुदेवशास्त्री हिरवडेकर | ५ | ,, |
| ९४ | रा. रा. श्रीधर दिक्षित खेडकर | ५ | ,, |
| ९५ | ,, पळणिटकर वकील | ५ | ,, |
| ९६ | रा. रा. शंकर गोपाळ कडिंले | ५ | नाशिक |
| ९७ | ,, महादेव अनंत जोशी | ५ | ,, |
| ९८ | श्री. राधाबाई काणे | ५ | ,, |
| ९९ | ,, राधाबाई काळे | ५ | ,, |
| १०० | वे. शा. सं. विठ्ठल रामचंद्र फडके | ५ | अलीबाग |
| १०१ | ,, रामनारायण शास्त्री गौड | ५ | नाशिक |
| १०२ | रा. रा. सुब्राव व्यंकटेश उडपीकर | ५ | नाशिक |
| १०३ | ,, वामन गंगाधर कर्वे | ५ | ,, |
| १०४ | ,, नारायण रामजी गुंजाळ | ५ | पुणें |
| १०५ | ,, भालचंद्र केशव शास्त्री पाटणकर | ५ | त्र्यंबक |
| १०६ | ,, त्र्यंबक महादेव शास्त्री | ५ | ,, |
| १०७ | ,, हरि शंकर वर्वे | ५ | नाशिक |
| १०८ | ,, नारायणराव लक्ष्मण | ५ | ,, |
| १०९ | ,, ओक वकील | ५ | नाशिक |
| ११० | ,, कमलाकर रावजी शास्त्री | ५ | त्र्यंबक |
| १११ | ,, रामचंद्र गणेश प्रधान | ५ | नाशिक |
| ११२ | ,, त्र्यंबक मोरेश्वर वाड | ५ | ,, |
| ११३ | ,, गोपीनाथ वैजनाथ शास्त्री | ५ | ,, |
| ११४ | ,, गोविंदराव शौचे | ५ | ,, |
| ११५ | ,, शंकर गणेश दातार | ५ | ,, |
| ११६ | रा. रा. नारायण कृष्ण पेंडसे | ५ | नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| ११७ | रा. रा. गणपत विठोबा मोरे | | मुंबई |
| ११८ | ,, जगन्नाथ गणपत शेट ढवण | ५ | मुंबई |
| ११९ | ,, फत्तेलाल चुनीलाल शेट | ५ | नाशिक |
| १२० | ,, विश्वनाथ विनायक वर्वे | ५ | ,, |
| १२१ | ,, गोविंद रामचंद्र टकले | ५ | पंचवटी |

## सामान्य सभासद.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रा. रा. शंकर बळवंत देशमूख | ३ | पिंपळनेर |
| २ | ,, बापु दत्तात्रय इजरीकर | ३ | नाशिक |
| ३ | ,, गजानन वासुदेव साने | ३ | ,, |
| ४ | ,, दत्तात्रय त्र्यंबक तेलंग | ३ | ,, |
| ५ | ,, विश्वनाथ त्र्यंबक तेलंग | ३ | ,, |
| ६ | ,, कृष्णाजी काशिनाथ आठवले | ३ | ,, |
| ७ | ,, शंकर गोविंद तेंडुलकर | ३ | ,, |
| ८ | ,, महादेव दत्तो देसाई | ३ | ,, |
| ९ | ,, दत्तात्रेय नारायण गोखले | ३ | ,, |
| १० | ,, गोविंद गोपाळ जोग | ३ | ,, |
| ११ | ,, अण्णा हरि साळुंखे | ३ | ,, |
| १२ | ,, गणपत गंगाराम शिंदे | ३ | ,, |
| १३ | ,, विष्णुपुरी ( दसनामी आखाडा ) | ३ | ,, |
| १४ | ,, अच्युत भगवंत कचोळे | ३ | ,, |
| १५ | ,, शंकर रंगनाथ चंद्रात्रे | ३ | ,, |
| १६ | बाळकृष्ण गंगाधर घोटीकर | ३ | ,, |
| १७ | ,, अनंत माधवराव बाभुळगांवकर | ३ | ,, |
| १८ | ,, दत्तात्रय गोविंद देव | ३ | ,, |
| १९ | ,, माधव अनंत मिस्त्री | ३ | ,, |
| १० | ,, दत्तात्रय तुकाराम क्षीरसागर | ३ | ,, |
| २१ | ,, गोविंद गंगाधर सर्वे | ३ | ,, |
| २२ | ,, विश्वनाथ सखाराम निरंतर | ३ | ,, |
| २ | ,, खुशालसिंह नारायणसिंह | ३ | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | ,, | वामन नारायण देशपांडे | ३ | नाशिक |
| २५ | ,, | जीवनदास रामजी | ३ | ,, |
| २६ | ,, | शिवराम बाळशेट काळे | ३ | ,, |
| २७ | ,, | रामकृष्ण बाळशेट शिंपी | ३ | ,, |
| २८ | ,, | रामचंद्र त्र्यंबक चांदे | ३ | पिंपळगांव |
| २९ | ,, | त्र्यंबक रंगूजी भावसार | ३ | लासलगांव |
| ३० | ,, | शिवराम रामरतनशेट | ३ | सायखेडे |
| ३१ | ,, | गणेश प्रभाकर दीक्षित | ३ | ,, |
| ३२ | ,, | राधाकिसन मुकुंदराम | ३ | ,, |
| ३३ | ,, | बाजी वामन फाटक | ३ | ,, |
| ३४ | ,, | गोविंद सिताराम जोशी | ३ | ,, |
| ३५ | ,, | त्र्यंबक महादेव हातयळगे | ३ | ,, |
| ३६ | ,, | पुरुषोत्तम हरि गद्रे | ३ | नाशिक |
| ३७ | ,, | शिवराम मोहिनीराज आढेकर | ३ | ,, |
| ३८ | ,, | बळवंत रामकृष्ण वैद्य | ३ | सिन्नर |
| ३९ | ,, | गोविंद वामन प्रधान | ३ | ,, |
| ४० | ,, | कृष्णराव गोविंद काळे | ३ | ,, |
| ४१ | ,, | बळवंत हरि शिखरे | ३ | मालेगांव |
| ४२ | ,, | नारायण दादाजी कित्तूर | ३ | ,, |
| ४३ | ,, | द्रवीड | ३ | ,, |
| ४४ | ,, | नारायण जनार्दन देसाई | ३ | ,, |
| ४५ | ,, | विनायक दामोदर आपटे | ३ | ,, |
| ४६ | ,, | एच्. ए. भडभडे | ३ | ,, |
| ४७ | ,, | मनोहर रामचंद्र हिंगे | ३ | ,, |
| ४८ | ,, | भाऊ हरिशेट | ३ | ,, |
| ४९ | ,, | शंकर गोविंद कापसे | ३ | ,, |
| ५० | ,, | विश्वनाथ जयराम गुप्ते | ३ | ,, |
| ५१ | ,, | रामचंद्र बाजी सवजज्ञ | ३ | ,, |
| ५२ | ,, | भार्गव भिकाजी मुळे | ३ | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ | ,, | गणेश सखाराम गुप्ते | ३ | मालेगांव |
| ५४ | ,, | महादेव विठ्ठल खरे | ३ | ,, |
| ५५ | ,, | यशवंत नारायण पाटील | ३ | ,, |
| ५६ | ,, | नरहर शंकर धांदे | ३ | येवलें |
| ५७ | ,, | गोविंद वासुदेव दाणी | ३ | ,, |
| ५८ | ,, | त्र्यंबक हरि गोगटे | ३ | ,, |
| ५९ | ,, | श्रीधर गोविंद जोशी | ३ | ,, |
| ६० | ,, | हरि गोविंद जोशी | ३ | नांदगांव |
| ६१ | ,, | विष्णु विठ्ठल मुंगी | ३ | ,, |
| ६२ | ,, | एकनाथदास खुशालदास शेट | ३ | येवलें |
| ६३ | ,, | विठोबा बाळशेट तोडकरे | ३ | ,, |
| ६४ | ,, | केशव कृष्णशेट खेळेकर | ३ | ,, |
| ६५ | ,, | रामचंद्र अवाजी साठे | ३ | नाशिक |
| ६६ | ,, | कृष्णाजी महादेव लिमये | ३ | ,, |
| ६७ | ,, | गणपत बाळाजी कासार | ३ | ,, |
| ६८ | ,, | आत्माराम आनंदराव कुलकर्णी | ३ | ,, |
| ६९ | ,, | रघुनाथ हरि फडके | ३ | ,, |
| ७० | ,, | दत्तात्रय गंगाधर बेलगांवकर | ३ | ,, |
| ७१ | ,, | श्रीधर रामचंद्र जोशी | ३ | ,, |
| ७२ | ,, | गोविंदराव ठाकूर | ३ | ,, |
| ७३ | ,, | वामन सखाराम खरे | ३ | ,, |
| ७४ | ,, | नारायण महादेव परांजपे | ३ | ,, |
| ७५ | ,, | प्रोफेसर माणिकराव | ३ | बडोदें |
| ७६ | शेट | जगजीवनदास त्रिभुवनदास | ३ | नाशिक |
| ७७ | ,, | करसनदास जेठाभाई | ३ | ,, |
| ७८ | रा. रा. | वामन रामकृष्ण जानोरकर | ३ | ,, |
| ७९ | ,, | लक्ष्मण पुंडुब्रह्म क्षात्रिय | ३ | ,, |
| ८० | ,, | कोपीकरसाहेब | ३ | ,, |
| ८१ | ,, | वासुदेव गंगाधर पुरोहित | ३ | ,, |
| ८२ | ,, | नरहर भगवंत परांजपे | ३ | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८३ | ,, | व्ही. बी. गणपुले | ३ | नाशिक |
| ८४ | ,, | गोविंद हरि ठाकुर | ३ | ,, |
| ८५ | ,, | त्र्यंबक हरि देशपांडे | ३ | ,, |
| ८६ | ,, | श्रीपाद सोमाजी जहागीरदार | ३ | ,, |
| ८७ | ,, | परशराम भगीरथ आपटे | ३ | मुंबई |
| ८८ | ,, | गंगाधर बाजी कोतवाल | ३ | नाशिक |
| ८९ | ,, | अनंत रघुनाथ वेलदे | ३ | ,, |
| ९० | ,, | त्र्यंबक नारायण पुजारी | ३ | ,, |
| ९१ | ,, | मुरलीधर गणेश जोशी | ३ | ,, |
| ९२ | ,, | महादेव बळवंत गाडगीळ | ३ | ,, |
| ९३ | ,, | श्रीधर सदाशिव शिरके | ३ | ,, |
| ९४ | ,, | दिवाकर दामोदर बापट | ३ | उमरावती |
| ९५ | ,, | किसन शिवाजी रायतोष्णी | ३ | नाशिक |
| ९६ | ,, | नारायण हैबती पांचाळ | ३ | ,, |
| ९७ | ,, | वामन रामकृष्ण शास्त्री | ३ | ,, |
| ९८ | ,, | केशव रामचंद्र वैशंपायन | ३ | ,, |
| ९९ | ,, | पुंजाजी मताजी तेली | ३ | ,, |
| १०० | कु. | दुर्गाबाई नेने | ३ | ,, |
| १०१ | ,, | दुर्गाबाई खर्डीकर | ३ | ,, |
| १०२ | सौ. | राधाबाई जहागीरदार | ३ | ,, |
| १०३ | रा. रा. | भास्कराचार्य ज्योतिषी | ३ | बेळगांव |
| १०४ | ,, | सीताराम भिकाजी घोलप | ३ | नाशिक |
| १०५ | ,, | करमरकर शास्त्री | ३ | ,, |
| १०६ | ,, | गोविंद पांडुरंग पायकर | ३ | ,, |
| १०७ | श्री. | लक्ष्मीबाई पाथरकर | ३ | ,, |
| १०८ | सौ. | यशोदाबाई भिडे | ३ | ,, |
| १०९ | ,, | रेवतीबाई कर्वे | ३ | ,, |
| ११० | ,,श्री | रमाबाई साठे | ३ | नाशिक |
| १११ | ,, | तान्हुबाई | ३ | .. |
| ११२ | .. | कृष्णाजी रघुनाथ यार्दी | ३ | .. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११३ | रा. रा. सखाराम लक्ष्मण कुळकर्णी | ३ | नाशिक |
| ११४ | ,, शंकर त्र्यंबक वडवे | ३ | येवलें |
| ११५ | ,, शामराव यशवंतराव खंडाळकर | ३ | ,, |
| ११६ | ,, चिंतामण बाळकृष्ण जोशी | ३ | नाशिक |
| ११७ | ,, अप्पाजी रावजी कुलकर्णी | ३ | पिंपळस |
| ११८ | ,, तात्याजी शंकर भार्गव | ३ | शिंगवे |
| ११९ | ,, गोविंद गंगाधर गायधनी | ३ | नाशिक |
| १२० | ,, रघुनाथ बेळे गाडगीळ | ३ | ,, |
| १२१ | ,, हरि अं ाजी मराठे | ३ | त्र्यंबक |
| १२२ | ,, वासुदेव कृष्ण मांडवगणे | ३ | नाशिक |
| १२३ | डॉ. बाळकृष्ण काशीनाथ | ३ | ,, |
| १२४ | रा. रा. नारायण सीतारामं खेडकर | ३ | ,, |
| १२५ | ,, नारायणराव भागवत | ३ | ,, |
| १२६ | ,, पुरुषोत्तम सीताराम टकले | ३ | ,, |
| १२७ | ,, भास्कर लक्ष्मण जोशी | ३ | ,, |
| १२८ | ,, गोपाळराव कर्वे | ३ | ,, |
| १२९ | वे. शा. सं. महादेव शास्त्री दिवेकर | ३ | वाई |
| १३० | रा. रा. लक्ष्मण केरूशेट | ३ | नाशिक |
| १३१ | ,, नारायण पद्माकर मोरे | ३ | ,, |
| १३२ | रा. रा. लक्ष्मण नारायण चंद्रात्रे | ३ | नाशिक |
| १३३ | ,, मोहोनीराज लक्ष्मण चंद्रात्रे | ३ | ,, |
| १३४ | ,, महादेव त्र्यंबक क्षेमकल्याणी | ३ | ,, |
| १३५ | ,, लक्ष्मण विठ्ठल अकोलकर | ३ | ,, |
| १३६ | ,, महादेव नीलकंठ सिंत्रे | ३ | ,, |
| १३७ | ,, लक्ष्मण जगन्नाथ अकूत | ३ | ,, |
| १३८ | ,, पांडुरंग रामचंद्र मठपती | ३ | ,, |
| १३९ | ,, बापु बाळाजी गाडगीळ | ३ | ,, |
| १४० | ,, गंगाधर बळवंत ओक | ३ | ,, |
| १४१ | ,, के. बी. जोशी आणि कं. | ३ | मुंबई |
| १४२ | ,, त्र्यंबक रघुनाथ शेटे | ३ | भाळे |

# परिशिष्ट ५.

## महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेच्या जमाखर्चांचें टिपण

| जमा | खर्च |
| --- | --- |
| ४३३ परिषदेचे आश्रयदाते यांजकडून. | ७८१८६ आफिस खर्च, छपाई, स्टेशनरी, पगार वगैरे इतर. |
| १८० हितचिंतक यांजकडून. | ४२२८११८९ भोजनखर्च, व राहण्याचे सोईसंबंधीं झालेला खर्च. |
| ७९२ स्वागत मंडळाचे सभासद यांजकडून. | ७२८२ थिएटरकडील खर्च. |
| ५६९८४ सामान्य सभासद यांजकडून. | ९५८३८६ व्हालंटीयरचे पट्टे व फुले करविलेबद्दल खर्च. |
| ६०४ थिएटरमध्यें प्रेक्षकांस तिकिटें विकल्याबद्दलचें उत्पन्न. | ४४९८८३ प्रवास खर्च व इतर किरकोळ खर्च. |
| २४४ नाटक कंपनीनें एका खेळाचें उत्पन्न दिल्याबद्दल. | ५० आडव्हान्स रिपोर्ट छापणेकरितां. |
| १७८१३ भोजन कमेटीतील व आफिस उपयोगापैकीं शिल्लक सामान विक्रीचें उत्पन्न. | १६७० ८७ ८६ |
| ६१ भोजन कमिटींत जेवणाचीं तिकिटें विक्री जाहलेबद्दल. | १०२९ ८९८६ शिल्लक श्रीमत् जगद्गुरु यांजकडे. |
| २९००८१ | २९०० ८१ |

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.**

खजिनजार म. हिं. प. प. नाशिक.

शि. प्र. मंडळी
879

## ...तांपर्यंत जे जे विषय व सूचना मांडल्या गेल्या ...ार करून कोणती निश्चित योजना करावयाची ...ील परिषदेच्या आंत ठरवून पुढील परिषदेपुढे मांडण्यासाठीं नेमलेलें मंडळ.

87

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे | अमरावती |
| उपाध्यक्ष | श्री. नरसिंह चिंतामण केळकर | पुणें |
| ,, | रा.ब. गणेश रामकृष्ण दातार | नाशीक |
| सभासद | श्री. माधवराव अणे | यवतमाळ |
| ,, | डॉ. बा. शि. मुंजे | नागपूर |
| ,, | रा. ना. रा. बामणगांवकर | अमरावती |
| ,, | प्रो. शिवराम महादेव परांजपे | पुणें |
| ,, | श्री. जनार्दन सखाराम करंदीकर | पुणें |
| ,, | श्री. त्र्यंबक हरी आवटे | पुणें |
| ,, | श्री. श्रीधरशास्त्री पाठक | ,, |
| ,, | श्री. नारायणशास्त्री मराठे | वाई |
| ,, | श्री. हरीशास्त्री गर्गे | नाशीक |
| ,, | श्री. सितारामशास्त्री महाशद्बे | ,, |
| ,, | ,, वामनशास्त्री दातार | ,, |
| ,, | श्री. वासुदेव बापुजी अकूत | ,, |
| ,, | श्री. रघुनाथ पांडुरंग करंदीकर | सातारा |
| ,, | श्री. गंगाधर बाळकृष्ण देशपांडे | बेळगांव |
| ,, | डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर | मुंबई |
| ,, | रा. जगन्नाथ गणपत ढवण | ,, |
| ,, | श्री. नारायणराव गुंजाळ | पुणें. |
| ,, | श्री. मोतीलाल माणेकचंद | अमळनेर |
| ,, | शे. वल्लभदास | येवलें |
| ,, | शे. जम्नालाल बचराज | वर्धा |
| ,, | रा. गंगाधर विश्वनाथ गोखले | पुणें } चिटणीस. |
| ,, | रा. रामकृष्ण गोपाळ भिडे | पुणें } |

---

